म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३९२

# चार लहरी

REFBK-0006381

वा. म. जोशी.
एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणें.

# विचारलहरी

५२३७
५१५९

लेखक

वा. म. जोशी

REFBK-0006381

मूल्य २। रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणें २

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी.ए., एल्‌एल्. बी.

१ पुढील आवृत्तीचे व उतारे वगैरे घेण्याचे हक्क श्री. गणेश वामन जोशी यांच्याकडे आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. डी. डी. दलाल यांचें आहे, व त्या चित्रासंबंधीं हक्क चित्रकाराकडे आहेत.

क्रमांक ४३
२० ऑगस्ट

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

# विचारलहरी

वा. म. जोशी

### वि. स. खांडेकर

फुलें आणि दगड | सायंकाल
घरट्याबाहेर | अविनाश
पहिलें प्रेम | मंदाकिनी
जळलेला मोहर | सहा भाषणें
क्रौंचवध | कलिका

### ग. त्र्यं. माडखोलकर

अवशेष | माझी नभोवाणी
नागकन्या | नवे संसार ( जप्त )
चंदनवाडी

### ना. धों. ताम्हनकर

तात्या भा. १ ला | निवाडे भा. १ ला
तात्या भा. २ रा | चकमकी

### साने गुरुजी

पुनर्जन्म | आस्तिक

### चिं. वि. जोशी

आणखी चिमणराव
नवें भारूड | स्टेशनमास्तर

### दत्तु बांदेकर

सख्या हरी | नवी आघाडी

### द. र. कवठेकर

अपुरा डाव | रेशमाच्या गांठी

---

नवें जग ?–पु. य. देशपांडे
रॉयचरित्र–भाई बेके
काव्यज्योति–प्र. ले. वि. स. खांडेकर
पारंब्या–आनंदीबाई जयवंत
ढासळलेले बुरूज–लक्ष्मण० सरदेसाई
व्यक्तिचित्रें–प्रो. वि. ह. कुलकर्णी
स्मृति-लहरी–वा. म. जोशी
फसगत–ना. ह. आपटे
साखरपुडा–प्र. के. अत्रे
मीनाक्षीचें जीवन–कृष्णाबाई मोटे
चलती नाणीं–र. गो. सरदेसाई
सौंदर्यशोध आणि आनंदबोध-रा.श्री.जोग
हितपत्रें–ना. म. पटवर्धन
बेबीची बहीण–वि. वि. बोकील

## आमचीं प्रकाशनें

## पुढील प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

अश्रु | छाया भाग १-२
बुद्ध आणि हिटलर | वालुका
चल ये राणी | कालचीं स्वप्नें
विसावें शतक | चारभिंती
तिसरी भूक | मंजिऱ्या
वर्षाकाल

### ग. त्र्यं. माडखोलकर

तीन दिवस
व्यक्तिरेखा
ऋणभार
माझे आवडते कवी
चक्रवर्ती उदयन
उर्वशी

### चिं. वि. जोशी

गुंड्या भाऊ

### अनंत काणेकर

उघड्या खिडक्या
काळे आणि पांढरे
धुक्यांतून लाल ताऱ्याकडे

### ना. धों. ताम्हनकर

निवाडे भा. २ रा
गुजाताई

### कृष्णाबाई मोटे

मवाली | कलाक्षेत्रांत

### काकासाहेब कालेलकर

ब्रह्मदेशाचा प्रवास | स्मरण यात्रा

---

ग्रह आणि तारे | सत्यग्राही
आपुलकीची झळ–द. र. कवठेकर
स्टॅलिन–वि. म. भुस्कुटे

६२३ ६३८ सं. निबंध ७८८ ता. ८/१०/२३ ठा. जे. ८७०८

# अंजलि

एकाद्या कल्पक चित्रकारानें काळपुरुषाचें यथार्थ चित्र काढलें आहे कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. पण मला नेहमीं वाटतें कीं न्यायदेवतेप्रमाणें काळपुरुष हाहि प्रतिभाशाली चित्रकाराच्या कलेचा विषय आहे. एका हातांत तराजू आणि दुसऱ्या हातांत न्यायदंड घेतलेली पण डोळ्यावर पट्टी बांधून गांधारीप्रमाणें आंधळी झालेली न्यायदेवतेची मूर्ति पाहतांच जगावर फुलें उधळणारा येशू ख्रिस्त खिळे ठोकून वधस्तंभावर कां लटकविला गेला याचा उलगडा होतो, घरोघर आपल्या ज्ञानामृताचें सिंचन करणाऱ्या सॉक्रेटिसाला विषाचा प्याला कां प्यावा लागला याच्यावर प्रकाश पडतो आणि सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा ऐकल्यावर ' या न्यायदेवतेपेक्षां श्रेष्ठ अशी जी शक्ति आहे तिच्या दृष्टीनें मी पूर्ण निर्दोषी आहे ', असे धीरगंभीर उद्गार लोकमान्यांच्या मुखांतून कां बाहेर पडले याचीही उत्कट जाणीव होते.

प्रतिभाशाली चित्रकार न्यायदेवतेच्याप्रमाणें काळपुरुषाच्या चित्राची अशीच कांहींतरी कल्पना करील कीं काय कुणाला ठाऊक ! पण जेव्हां जेव्हां या पुराण-पुरुषाच्या विचित्र लीलेचा प्रत्यय येतो तेव्हां तेव्हां पाऊस आणि विजा यांचा एकाचवेळीं पृथ्वीवर वर्षाव करणाऱ्या आषाढांतल्या काळ्याकुट्ट आकाशाची मला आठवण होते. काळपुरुष हा एक कादंबरीकार आहे असें मानलें तर विस्मयाचें तंत्र वापरण्यांत तो अतिशय कुशल आहे हें कुणालाही कबूल करावें लागेल. नाहीं तर कोंडाण्यावर भगवा झेंडा फडकूं लागतो न लागतो तोंच तानाजीच्या रक्ताचा सडा गडावर पडला नसता ! थोरले माधवराव आणि धाकटे चिपळूणकर यांच्या-सारख्या नररत्नांना यशाच्या शिखरावरून क्षणार्धांत अदृश्य करून तरी काळानें दुसरें काय साधलें ? भावबंधन नाटकाचा शेवटचा प्रवेश लिहिल्यानंतर अवघ्या तीन तासांच्या आंत गडकऱ्यांचा अंत व्हावा ही घटनासुद्धां अशीच चमत्कृतिजनक नाहीं का ? आणि अवघ्या एक महिन्यापूर्वी वामनराव जोशी गेले तेही त्यांच्या एकसष्ठीच्या समारंभाचीं भाषणें लोकांच्या कानांत घुमत असतांना, त्यांच्या गळ्यांतले गौरवाचे हार कोमेजले सुद्धां नसतांना, त्यांचे स्वतःचे पुढचे संकल्प आणि त्यांच्या चहात्यांच्या त्यांच्याविषयींच्या अपेक्षा पुऱ्यापुऱ्या उच्चारल्यासुद्धां गेल्या नसतांना !

ता. ११ जुलै रोजीं मी व माझे स्नेही श्री. वामनराव ढवळे मुंबईला वामन-रावांना भेटायला गेलों त्यावेळीं ते आजारी होते. त्यांची प्रकृती मला क्षीण

झालेली दिसली. त्यांचे बंधु श्री. नारायणराव जोशी यांनीं "तुम्हीं हवं तेवढं बोला, पण वामनरावांना फार बोलूं देऊं नका" असें जें आम्हांला सुचविलें तें अगदीं योग्य आहे असेंच मला आरंभीं वाटलें. वामनरावही प्रथम अंथरुणावर पडून हळु हळु बोलत होते. पण लवकरच ते उठून बसले आणि मग विविध विषयांवरच्या गप्पांना नेहमीप्रमाणें असा रंग चढला कीं वामनराव आजारी आहेत ही गोष्टच आम्ही सारे विसरून गेलों. मे मध्यें पुण्याला मी त्यांना भेटलों होतों. त्यानंतरच्या मधल्या दोन महिन्यांतल्या अनेक गमतीच्या गोष्टी आणि त्यादिवशींच्या वर्तमानपत्रांतल्या निरनिराळ्या बातम्या यांच्या अनुषंगानें ते जें जें बोलले त्यांत त्यांचें वैशिष्ट्य पूर्णपणें प्रतिबिंबित झालें होतें. मध्यंतरींच्या एका समारंभांतल्या आपल्या भाषणाची हकीकत सांगतांना "तोंड देखली निर्भेळ स्तुति आमच्या हातून कशी होणार ? पण–परंतु, जरी–तरी, वगैरे घालूनच जें बोलावयाचें तें मी बोललों" हे हंसत हंसत त्यांनीं काढलेले उद्गार, 'कांहीं तरी नवीन कुस्पट काढलें नाहीं तर–मग आपल्याला टीकाकार कोण म्हणेल असं या लोकांना वाटतं' ही एका चार ओळींच्या वाङ्मयवार्तेवर त्यांनीं केलेली टीका, ज्ञानप्रकाशांत 'दुसरी बायको' प्रकरणासंबंधी आलेल्या एका पत्राविषयीं बोलतांना "असल्या लग्नांना खूप नाजुक कारणं असतात. तीं सगळीं कांहीं आपल्याला कळत नाहींत. समाजानं अशा बाबतींत क्षमाशील झालं पाहिजे' हा त्यांनीं व्यक्त केलेला अभिप्राय–त्या दिवशींच्या संभाषणांतल्या शब्दाशब्दांतून आमचे नेहमींचे वामनरावच आम्हांला दिसत होते ! त्यामुळें त्यांचा निरोप घेतांना आमचे वामनराव आतां आमचे राहिले नाहींत ही दारुण कुशंका क्षणभरही माझ्या अगर ढवळ्यांच्या मनाला शिवली नाहीं. आम्हीं उठून त्यांना नमस्कार केला, 'मी पुन्हां लवकरच मुंबईला येणार आहे. तेव्हां तुम्हांला भेटेनच' म्हणून मीं त्यांना सांगितलें, वामनरावांनींही नेहमींचें मंदमधुर स्मित करून नमस्कारपूर्वक आम्हांला निरोप दिला.

तत्त्वज्ञान आणि काव्य यांच्या मधुर संगमांतून निर्माण झालेल्या त्या निर्मळ स्मिताचें यापुढें आपल्याला दर्शन होणार नाहीं ही गोष्ट ता. २० जुलै रोजीं साऱ्या महाराष्ट्राला कळली ! त्या दिवशीं नुसत्या येरंडवणें–हिंगण्याच्या मुलीच ढळढळा रडल्या नाहींत. वामनरावांच्या हाताखालीं शिकण्याचें भाग्य लाभलेल्या शेंकडों विद्यार्थिनींनीं आणि त्यांच्या कादंबऱ्यांतून सात्त्विक समाधान आणि उदात्त शिकवण मिळालेल्या हजारों गृहिणींनीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अश्रु ढाळले. वामनरावांच्या

मृत्यूनें महर्षि कर्व्यांसारख्या त्यांच्या सहकाऱ्यांना जेवढें दुःख झालें तेवढेंच तात्यासाहेब केळकरांसारख्या साहित्यिकांनाही झालें. बुद्धीनें चिकित्सक पण स्वभावानें रसिक, वयानें वृद्ध पण मनानें बाल, कीर्तीनें थोर पण अहंकारापासून अलिप्त अशा या साधुतुल्य साहित्यिकाच्या सुमधुर सहवासाला, मार्मिक संभाषणाला आणि गोड मार्गदर्शनाला आपण कायमचे मुकलों या जाणिवेनें लहानथोर मराठी रसिकांचीं मनें त्या दिवशीं सुन्न होऊन गेलीं.

पण ध्येयनिष्ठ साहित्यिकाचा पार्थिव देह दृष्टीआड झाला तरी त्याचा आत्मा आपल्या कार्यक्षेत्रांतच वावरत असतो ! 'इंदु काळे आणि सरला भोळे' सहज उघडून शेवटच्या पानावर नजर टाकली कीं " लौकिक दृष्टीहून उच्चतर अशी एक दृष्टि आहे. लौकिकदृष्ट्या ध्येयें म्हणजे दुःखें; पण या दुःखांतच उच्च व सात्त्विक आनंद भरलेला आहे, " हीं वाक्यें दृष्टीला पडतात. तीं वाचतांना वामनराव आपलें जीवितविषयक तत्त्वज्ञान सांगत असल्याचा भास होतो. ' स्मृतिलहरी ' उघडून ' संदेश ' हा लेख वाचूं लागलें कीं ' हे लेकाचे साहित्यसंमेलन भरवितात आणि वर्तमानपत्रांत त्यांचा मोठा गाजावाजा होतो ' या पहिल्या वाक्यापासून ( लेकाचा हा शब्द वामनरावांच्या बोलण्यांत अभावितपणें अनेकदां येत असे. अवखळ मुलाविषयीं आईनं पोरटं—किंवहुना कारटं हा शब्द वापरावा तसा तो एक कौतुकाचा आवडता उद्गार होता ! ) " मुलं गेल्यावर एक खवचट पण मार्मिक साहित्यिक मला चिडविण्याकरितां म्हणाला, ' अहो, नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां तुम्हीं आतां संदेश सांगितलाच कीं ! ' मीं उत्तर दिलं, ' सांगितला असेल कदाचित् ! पण ' Consistency is the virtue of asses ' " या शेवटच्या वाक्यापर्यंत वामनरावच आपल्याशीं बोलत आहेत असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

आणि म्हणूनच निरनिराळ्या वेळीं विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले वामनरावांचे कांहीं स्फुट लेख " विचारलहरी " या पुस्तकाच्या द्वारानें प्रकाशित करून श्री. देशमुख महाराष्ट्रीय वाचकांना त्यांच्या सहवाससुखाचा आनंदच देत आहेत असें म्हणायला हरकत नाहीं. ' लेखकाचा खरा संदेश त्याच्या जीवनांत असतो, त्याच्या पुस्तकांत प्रतिबिंबित झालेल्या त्याच्या मनांत असतो ' हें वामनरावांचें विधान सर्व साहित्यिकांना लागूं पडेल असें नाहीं. तें फक्त जीवनाशीं प्रामाणिक असणाऱ्या लेखकांच्या बाबतींतच खरें ठरेल. वामनराव हे अशा तत्त्वनिष्ठ लेखकांचे अग्रणी होते. त्यांनीं नुसतें तत्त्वज्ञान शिकविलें नाहीं; तें आचरणांत आणलें. तार-

ण्यांत काव्याप्रमाणें त्यागाचीही बहुतेकांना लहर येते. पण पंचविशींतल्या स्वप्नाळु कवींची मजल स, ला, तूं, संध्याकाळ, फुलास वगैरे विषयापलीकडे जशी सहसा जात नाहीं, तशी त्यांच्या त्यागाची धांवही पांचपंचवीस व्याख्यानें झालीं आणि चारदोन महिने खादी वापरली कीं कुंठित होते ! त्याग हें सतीचें वाण आहे याची कल्पना नसल्यामुळें उग्र राजकीय चळवळींत उडी घेणारे व तिथले फुललेले निखारे पाहतांच पाठीला पाय लावून पळत सुटलेले वाचिवीर आणि पर्यंकपंडित पाहिले म्हणजे वामनरावांनीं आमरण आचरलेल्या व्रतनिष्ठेचें अलौकिकत्व पटतें.

तीस वर्षांपूर्वीं सुखाची सरकारी नोकरी पदवीधरांना कितीतरी सुलभ होती. पण ती विषवत् मानून वामनराव विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याला मिळाले. आयुष्य हा महाल नाहीं, तें मंदिर आहे, जीवन ही क्रीडा नाहीं, ती सेवा आहे, संसार ही विलासभूमि नाहीं, ती कर्मभूमि आहे, ही वामनरावांची श्रद्धा संकटांनीं कधींही ढळली नाहीं किंवा दारिद्र्यानें क्षणभरही विचलित झाली नाहीं. घरांतल्या लहान मुलाच्या तोंडांतसुद्धां दुधाचा थेंब पडूं नये अशा परिस्थितींत त्यांचे मधले कांहीं दिवस गेले होते. दुसऱ्या कुणाच्याही मनांत हा कडवट अनुभव जन्मभर घोळत राहिला असता, मानवतेवरली त्याची श्रद्धा उडून गेली असती. पण वामनराव असल्या अनुभवांनीं अधिक अंतर्मुख झाले. जगांत दुःख फार आहे आणि तें कमी करण्याचा प्रत्येकानें शक्य तो प्रयत्न केला पाहिजे याची असल्या प्रसंगांनीं माणसाला जाणीव होते असें ते नेहमींच हंसत म्हणत.

'विश्ववृत्ताच्या' खटल्यांत ऐन पंचविशींत वामनरावांना तब्बल तीन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. आपण सहसंपादक म्हणून सर्व जबाबदारी पतकरली तर संपादक विजापूरकर यांना शिक्षा होणार नाहीं असा सल्ला दिला गेल्यामुळें ते आपणहून आनंदानें योग्य अधिकाऱ्यांपुढें हजर झाले होते. त्याग हेंच वामनरावांचें जीवनसूत्र होतें. हें त्या प्रसंगानें ढळढळीतपणें सिद्ध केलें. विजापूरकरांसारखा कार्यकर्ता मोकळा रहावा म्हणून वामनरावांनीं केलेला हा त्याग त्या दृष्टीनें सफल झाला नाहीं हें खरें. पण वामनरावांच्या त्या तीन वर्षांच्या तुरुंगवासानें मराठी साहित्यांतली विचारसंपदा वाढवायला मदत केली यांत मात्र शंका नाहीं. वामनरावांच्या मूळच्याच चिंतनशील स्वभावाचा तुरुंगांतल्या वातावरणांत आणि एकांतांत विकास झाला असल्यास त्यांत नवल कसलें ? 'मनुष्य स्वभावतः दुष्ट नाहीं. तो अज्ञानी आहे. जगांतलीं पुष्कळ दुःखें अज्ञानांतून उत्पन्न होतात,

गैरसमजांतून निर्माण होतात, दुष्टपणांतून नाहीं ' हा त्यांनीं वारंवार उच्चारून दाखविलेला बहुमोल विचार प्रथमतः त्यांना तुरुंगांतच सुचला असावा. त्यांच्यावर पहारेकरी म्हणून तुरुंगांत जो पठाण कैदी होता त्याचा बाह्य क्रूरपणा आणि आंतरिक ओलावा पाहूनच 'मनुष्य स्वभावतः दुष्ट नाहीं' या श्रद्धेचा उदय त्यांच्या मनांत झाला असावा असें वाटतें. या पठाणाचा उल्लेख त्यांच्या वाङ्मयांत वारंवार सहृदयतेनें केलेला आढळतो. हें एकच वर्णन पहा—

'मी तुरुंगांत असतांना रोज ४० पौंड, म्हणजे रॉकेलचा मोठा डबा भरून कांहीं उरतील एवढे जोंधळे कांहीं दिवस मला दळण्याकरितां देत असत. माझें जातें खराब होतें म्हणून माझ्या हातून ते दळून होत नसत. पण माझ्यावर पहारा करण्याकरितां ठेवलेला कैदी पहारेकरी ( Convict overseer ) जो होता तो बलुची मुसलमान होता. त्यानें आपल्या बायकोचा खून रागाच्या भरांत केला होता. पण तो फार सज्जन होता.'

'बायकोचा खून करणारा सज्जन ! चांगलं आहे !' विमल मधेंच म्हणाली.

'हो सज्जन' मी उत्तरलों–'तुम्हांला नाहीं समजायचं तें. तो अतिशय धर्मवेडा होता. पण त्याच्या रमजानच्या कां कसल्या, महिनाभर चालणाऱ्या रोज्याच्या दिवसांत तो दिवसा तोंडांत पाण्याचा थेंब घालीत नसे. त्याच्या अंगांत अगदीं त्राण नव्हतं. पण पोटांत अन्नपाणी नसतांना देखील तो मला चक्की पिसण्यांत मदत करीत असे. मी त्याला नको म्हणत असें. कारण मदत करतांना त्याला कोणीं पाहिलें असतें तर त्याची 'पिवळी पगडी' गेली असती. ( म्हणजे ओव्हरसीअरच्या अधिकारावरून पदच्युत होऊन तो पुन्हा साधा कैदी झाला असता आणि त्यालाच चक्की पिसण्याचें काम करावें लागलें असतें, ) चक्की पिसतांना तो अगदीं धापा टाकीत असे आणि आतां यालाच घेरी येते कीं काय अशी मला भीति वाटत असे. पण तो आपला हट्ट सोडीत नसे. भत्त्याच्या वेळीं मला भाकरी मिळे आणि तो ओव्हरसीअर म्हणून त्याला पोळ्या मिळत. त्यांतली एक तो मला देत असे. हें देखील हुकमाच्या विरुद्ध होतें. जर जेलरनें किंवा सुपरिंटेंडेंटनें हें पाहिलें असतें तर त्याची पिवळी पगडी गेली असती. पण त्याला नको नको म्हटलें तरी तो ऐकत नसे आणि मला पोळी खायला लावीत असे. त्याच्या अशा कितीतरी गोष्टी सांगतां येतील.' ( स्मृतिलहरी, पृष्ठ ६३ ).

वामनरावांच्या असल्या सहृदय चिंतनशीलतेला अभिजात व्यासंगाची, भोंवतालच्या सामाजिक जीवनाच्या सहानुभूतिपूर्ण निरीक्षणाची आणि समतोल बुद्धीनें

केलेल्या मननांची जोड मिळाल्यामुळें त्यांतून निर्माण झालेलें वाङ्मय एखाद्या सुंदर देवघरासारखें वाटतें. जागा तशी मोठी नाहीं ! पण ती किती निर्मळ. खोलींत डोळे दिपविणारा विद्युद्दीप नाहीं. पण देव्हाऱ्याजवळचा पांच वातींचा नंदादीप किती शांत नि किती प्रसन्न प्रकाश देणारा ! हारतुरे, अत्तरगुलाब यांचा घमघमाट इथें नाहीं. पण देवाला वाहिलेल्या फुलांचा नि सुवास उधळीत स्वतःला जाळून घेणाऱ्या उदबत्तीचा मंद सुगंध किती मोहक ! इथें बाजाची पेटी नाहीं, दिलरुबा नाहीं, कांहीं नाहीं; फक्त प्रार्थनेला साथ करणारी एक एकतारी तेवढी आहे.

वामनरावांची इतर मोठ्या लेखकांशीं तुलना करतांना त्यांचें हें वैशिष्ट्य विसरून चालणार नाहीं. ते मराठींतले एक श्रेष्ठ कादंबरीकार असले तरी हरिभाऊ आपट्यांच्या प्रमाणें मोठमोठ्या कथानकांच्या सात मजली सुंदर इमारती उठविणें किंवा प्रो. फडक्यांच्या सारखे सुटसुटीत कथांचे नीटनीटके टुमदार बंगले बांधणें त्यांना कधींच साधलें नाहीं. मनोविश्लेषण हा त्यांच्या कादंबऱ्यांचा गाभा, विचारप्रवर्तकता ही त्यांच्या कथांची शक्ति ! हरिभाऊंचीं पात्रें भोंवतालच्या वास्तव जगांतलीं वाटतात, फडक्यांच्या भूमिका कल्पनारम्य सृष्टींतल्या भासतात, पण वामनरावांची भय्यासाहेब, आनंदराव, सुनंदा, विनायकराव भोळे, नारायणराव पाठक इत्यादि पुरुष मंडळी काय किंवा उत्तरा, सुशीला, सरला इत्यादि महिलामंडळी काय, सारीं ध्येयसृष्टींतलीं आहेत ! कादंबरींत अमुक–अमुक लज्जतदार किंवा गरमागरम मालमसाला असावा अशा प्रकारचे जे कांहीं रूढ संकेत आहेत–त्यांचा कस लावला तर वामनरावांच्या ललितकृती सामान्य ठरतील. ध्येयदर्शित्वाचा ( Vision ) अभाव असलेलीं राष्ट्रें काय किंवा वाङ्मयकृती काय लवकर विलयाला जातात हा सिद्धांत खरा असेल तर आजकालच्या तथाकथित अमरकृतीपेक्षां वामनरावांच्या कादंबऱ्याच अधिककाळ विचारवंत महाराष्ट्राच्या आवडत्या राहतील.

'विचारलहरी' हा वामनरावांचा स्फुट लेखांचा संग्रह असला तरी अगदीं साध्या शब्दांत व्यक्त होणाऱ्या सुंदर व समतोल तत्त्वज्ञानानें वाचकाला अंकित करण्याचें त्यांचें हें सामर्थ्य या छोट्या लेखांतूनही प्रत्ययाला येतें. नदीला काढलेल्या कालव्यांत तिच्या प्रवाहाच्या वेगाचें किंवा पात्राच्या विस्ताराचें दर्शन होत नाहीं. पण तिच्या निर्मळ जीवनपोषक जलाचा लाभ त्या कालव्यांतूनही होतोच. या स्फुट लेखांचेंही तसेंच आहे. 'नीतिशास्त्रप्रवेशां'तले, 'विचारविलासां'तले किंवा 'इंदु काळे व सरला भोळे' मधले वामनराव इथें संपूर्णपणें दिसणार नाहींत. पण 'जगांत कोठें चिरंतनत्व असेल तर तें सद्बुद्धींत व सत्कार्यांत आहे,'

सं. नं. ता.

' लौकिक व्यवहारांत रममाण होण्याची बाब तो उत्साहानें आणि निपुणतेनें करण्याची पात्रता ध्येयवादित्वामुळें येते, ' ' मनःस्थैर्य येण्यास ध्येयनिष्ठेशिवाय मार्ग नाहीं. मनोधैर्यही ध्येयनिष्ठेशिवाय शक्य नाहीं, ' ' चिकित्सकवृत्ति ही कल्पनानिर्मितीला थोडीतरी बाधक होते,' ' मराठींत धंदेवाईक विदूषकाचं सोंग घेतलं तरच सामान्यतः विनोद ओळखूं येतो असं दिसतं, ' ' मानवी जीवित म्हणजे गमतीचा खेळ नव्हे किंवा गमतीचें खेळ पहाणें नव्हे ! ' ' मुलें अंगाशीं बिलगून त्रास देऊं लागलीं म्हणजे तीं नकोशीं वाटतात. पण तीं घरांत नसलीं तर चैन पडत नाहीं. तसेंच पात्रांचेंही आहे, ' ' जग हें वाईट माणसांनीं भरलेलं आहे असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात व तंटेभांडणें उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच—दुष्टपणा पण आहे. परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे ' अशीं वाक्यें मधूनमधून भेटलीं कीं कुठलाही वाचक निःशंकपणानें स्वतःशींच म्हणेल ' हे वामनरावच बोलताहेत हं ! '

चिंतनशीलता, विचारप्रवर्तकता, कुठल्याही गोष्टीची दुसरी बाजू आपलेपणानें पहाण्याची संवय, ( वामनराव वकील झाले असते तर त्यांनीं नेहमीं विरुद्ध पक्षाचें काम सुलभ करून ठेवलें असतें यांत शंका नाहीं ) पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा वगैरे वैचारिक गुणांबरोबर अवडंबर न माजवितां कुठलीही गोष्ट सांगण्याची शैली, एखाद्या मार्मिक उपमेनें किंवा दृष्टांतानें विषय विशद करण्याची कला, साध्यासुध्या अनुभवांतून अगर लहानसहान गोष्टींतून विनोद निर्माण करण्याची पद्धती इत्यादि वामनरावांचे वाङ्मयविशेषही या लेखसंग्रहांत वाचकांना रंजवितील.

' विचारलहरीं 'तील व्यक्तिविषयक लेखांपैकीं विजापूरकरांवरील लेख त्यांतल्या जिव्हाळ्यामुळें व कर्वे यांच्यावरील लेख त्यांतल्या चिकित्सेमुळें वाचकांना आवडेल. विजापूरकरांवरील लेख वामनरावांनीं ' आजन्म जिज्ञासु ' या टोपण नांवानें ( या टोपण नांवातसुद्धां वामनरावांचें स्वभाववैशिष्ट्य व्यक्त होतच आहे म्हणा ! ) लिहिला होता. लेखांत स्वतःविषयीं जे उल्लेख त्यांनीं केले आहेत ते किती संयमपूर्ण वाटतात ! ( टोपण नांवें हीं आत्मस्तुतीकरतां किंवा प्रतिस्पर्ध्यांच्या खोट्यानाट्या निंदेकरितां घ्यायचीं असतात ही अद्यावत् कल्पना वामनरावांना कुठून असणार ? ) विजापूरकरां-विषयीं अत्यादर असूनही स्वदेशीच्या बाबतींतल्या त्यांच्या दुराग्रहावर वामनरावांनीं केलेली टीका पाहिली म्हणजे त्यांच्या सत्यनिष्ठेची वाचकांना चटकन् कल्पना येते.

रँग्लर परांजपे यांच्यावरला लेख मात्र थोडा निराळा वाटतो. तो परांजप्यांच्या एकसष्टीच्या वेळीं लिहिला गेला असल्यामुळें त्यांतले गुणवर्णनपर उद्गार योग्यच

आहेत. पण हास्यास्पद व मूर्खपणाच्या कल्पनांना, विचारांना व आचारांना कवटाळून राहणाऱ्या सामान्य लोकांशीं परांजपे विशेष समरस होऊं शकत नाहींत आणि म्हणून अर्थात् ते त्यांचे पुढारीही होऊं शकत नाहींत, अशी मीमांसा करून फार बुद्धिवादी व विवेकी असल्यामुळें परांजपे महाराष्ट्राचे पुढारी झाले नाहींत, त्यांचे हे गुणच त्यांच्या पुढारीपणाच्या आड आले, असें जें वामनराव सूचित करतात तें मनाला पटत नाहीं. रँग्लर परांजपे यांनीं विलायतेंत गणिताच्या परीक्षेंत अपूर्व यश मिळविलें आणि मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरीचा मोह लाथाडून फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल होण्यांत अतुल स्वार्थत्याग केला याबद्दल कधींच दुमत होणार नाहीं. त्यांच्या हाताखालीं शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांना ते नेहमींच आदरणीय वाटतील. पण एवढ्यावरूनच ते महाराष्ट्राचे पुढारी होण्याला पात्र होते असें म्हणणें मात्र धाडसाचें होईल. ज्या नेमस्त संप्रदायाचा परांजपे अभिमान बाळगतात त्याचा तरी त्यांनीं कितीशा हिरीरीनें पुरस्कार केला आहे? त्यांच्या रक्तांत राजकारण असतें तर फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्त होतांच ते आपल्या गुरूंच्या भारत–सेवक–समाजाला मिळाले असते! त्यांनीं तसें केलें नाहीं याचा अर्थ उघड आहे! राजकारण हा जसा टिळक–गोखले, गांधी–जवाहरलाल किंवा अणे–सावरकर यांच्या आयुष्याचा आत्मा आहे तसा तो परांजप्यांच्या जीवनक्रमाचा महत्त्वाचा भाग कधींच झाला नाहीं! गुडघाभर पाण्यांत खेळून राजकारणाच्या प्रवाहाला कुणीही वळण लावूं शकत नाहीं. तें काम करायला त्या प्रवाहांत उडीच घ्यायला हवी. परांजप्यांच्या इतकेच सावरकरही बुद्धिवादी आहेत. परांजप्यांनीं देवाला मिस्टर गॉड म्हणून संबोधूनच काय तीं लोकांचीं मनें दुखविलीं असतील! पण सावरकरांनीं जुन्या रूढीवर आणि अंधश्रद्धेवर एकसारखे कोरडे उडविले आहेत! असें असूनही ज्या समाजाच्या पाठीवर सावरकरांनीं हे कोरडे उडविले तोच राजकारणांत त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जात आहे. याचें कारण एकच आहे. ज्या वीरवृत्तीनें सावरकरांनीं फ्रान्सच्या किनाऱ्यापाशीं बोटींतून समुद्रांत उडी टाकण्याचें धाडस केलें, ज्या निधड्या छातीनें त्यांनीं अंदमानांतल्या शिक्षेला आणि हालअपेष्टांना तोंड दिलें, तीच वीर वृत्ती आणि तीच निधडी छाती तुरुंगांतून बाहेर पडल्यावर आपल्याला पटणाऱ्या राजकारणाचा प्रसार करतांना त्यांनीं दर्शविली. राजकारण हा शूरांचा खेळ आहे; नुसत्या बुद्धिवंतांचा नव्हे हेंच खरें.

‘ विद्यार्थी व राजकारण ’ या लेखांतही वामनरावांचा नेहमींचा समतोलपणा कमी आढळतो. तो लेख अपुरा तर वाटतोच! पण त्यांत व्यक्त झालेल्या विचार-सरणींत वामनरावांच्या दोन्ही बाजू पाहणाऱ्या मनाचें पूर्ण प्रतिबिंब पडलें आहे असें

वाटत नाहीं. परांजप्यांच्या–वरील लेखांत शिक्षकाच्या कमी पगाराविषयीं बोलतांना त्यांनीं मंडईतील हमालांचा दाखला देऊन लोकांचीं मनें उगीच दुखविलीं, मनुष्याचें वेतन हें मागणी आणि पुरवठा या न्यायानें ठरत असतें हा सिद्धांत दुसरा चांगला दाखला देऊन परांजप्यांना श्रोत्यांच्या गळीं उतरवितां आला असता अशी वामनरावांनीं टीका केली आहे. ती त्यांच्या या लेखालाही लागू पडते. गांधी—जवाहरलाल यांना राजकीय डॉक्टर मानून हिंदुस्थानला जडलेल्या रोगाचें निदान व त्याच्यावर करायची योजना या गोष्टी आम्हीं त्यांच्यावर सोपविल्या आहेत, असें म्हणणाऱ्या विद्यार्थ्याला 'पण कोणता डॉक्टर केव्हां आणावा, शस्त्रक्रिया कोणाकडून करून घ्यावी, हें तरी आपण विचार करून ठरवतोंच ना ? शस्त्रक्रिया करण्यासाठीं कुणी न्हाव्याला आणीत नाहीं !' हें उत्तर देणें म्हणजे आपला पराभव कबूल करण्यासारखेंच आहे ! राजकारणांत पडायच्या आधीं विद्यार्थ्यांनीं सर्व संभवनीय संकटांचा विचार केलेला असावा या दृष्टीनें वामनरावांनीं ही शुद्ध विरोधी भूमिका पतकरली असेल ! पण ती फारशी यशस्वी झालेली दिसत नाहीं. राजकारणांत काय किंवा प्रेमांत काय तरुण तरुणी पूर्ण विचार करून पडत नाहींत. क्षुब्ध प्रवाहाच्या वेगांत तीं वाहून जातात. त्यांचें उसळणारें रक्त त्यांना स्वस्थ बसूंच देत नाहीं, उलट थंड रक्ताची वडील मंडळी मायेनें आंधळी झालेली असतात. आपल्या मुलांमुलींना या महापुरांत उड्या टाकतांना मोठा आनंद होत आहे हें त्यांना दिसतच नाहीं. त्यांना एकच भीति वाटते. आपल्या मुलाची किंवा मुलीची उडी चुकून एखाद्या खडकावर पडली तर ? तो किंवा ती एखाद्या भोंवऱ्यांत सांपडून पोहतां पोहतां गळून गेली तर ? वामनरावांनीं आपल्या लेखांत या मुद्यावर बोट ठेवलें आहे; नाहीं असें नाहीं. पण गेल्या फेब्रुवारींत हिप्परगें येथें माझ्याशीं बोलतांना त्यांच्या तोंडून "एकेकदा वाटतं, जीं कांहीं पांच दहा वर्षे उरलीं आहेत तीं उगीच रखडत काढण्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षां देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेऊन तीं तुरुंगांत काढावीं लागलीं तर अधिक बरं !" असे जे सहज उद्गार निघाले होते ते लक्षांत घेतां हा लेख वामनरावांनीं सविस्तर लिहिला असता तर त्यांच्या प्रतिपादनाचा रोख अगदीं निराळा झाला असता असें वाटतें.

गेल्या फेब्रुवारींत हिप्परग्याच्या 'खाजगी शाळा' या राष्ट्रीय शिक्षणसंस्थेच्या उत्सवाकरितां तात्यासाहेब केळकर, वामनराव, यशवंतराव पेंढरकर, चित्रकार दलाल आणि मी गेलों होतों. आमचे ते चार दिवस मोठ्या आनंदांत गेले. सकाळच्या हुरड्याच्या कार्यक्रमापासून रात्रींच्या गप्पांच्या कार्यक्रमापर्यंत साऱ्याच गोष्टींना रंग भरत असे. त्यावेळीं संभाषणाच्या भरांत वामनरावांना 'तुम्ही एक लहानसें आत्म-

चरित्र लिहाच ' असा मीं आग्रह केला त्यावेळीं ते उत्तरले, ' आत्मचरित्र लिहिण्यापेक्षां कादंबरी लिहिणं सोपं ? ' थोड्या सत्य, कांहीं अर्धवट असत्य व कांहीं पूर्ण असत्य गोष्टी एकत्रित करून आत्मप्रौढीकरितां रचलीं गेलेलीं आत्मचरित्रें पाहिलीं म्हणजे वामनरावांच्या या उत्तराचें मर्म ध्यानांत येतें. ' आत्मचरित्र नाहीं तर नाहीं, निदान आयुष्यांतल्या संस्कारांच्या व जीवनविकासाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा आठवणी तुम्ही लिहा ' ही माझी सूचना त्यांनीं अर्धवट मान्य केली. आतां त्या मान्यतेचा कांहींच उपयोग नाहीं. पण ' तुरुंगांतल्या आठवणी ' आणि ' माझ्या अनुभवांचें व विचारांचें सार ' हे या संग्रहांतील, दोन्ही आत्मवृत्तपर लेख वामनरावांचें अशा प्रकारचें पुस्तक किती आकर्षक आणि मार्गदर्शक झालें असतें याची कल्पना आणून देतील. पूर्णपणें बुद्धिवादी असूनही ' माणुसकी ही निराळीच चीज आहे. ' किंवा ' यापुढें युद्धें व्हायचींच असलीं तर ती धर्मयुद्धं ( म्हणजे तत्त्वासाठीं झालेलीं युद्धं ) असूं देत. धार्मिक ( अर्थ हाच चालू युगाचा धर्म असल्यामुळें पूर्वीचीं धार्मिक म्हणजे आजचीं आर्थिक ) युद्धें नकोत ! ' असे उद्गार वामनरावांनीं या लेखांत अगदीं स्पष्टपणें काढले आहेत.

आयुष्याचें सिंहावलोकन करण्यांत जेवढी मौज असते, तेवढीच भविष्यकालाचें निरीक्षण करण्यांतही असते. ' मी जेव्हां भविष्यकालांत नजर टाकतों ' हा त्यांचा लेख या दृष्टीनें वाचनीय आहे. हा लेख म्हणजे विचारी वामनराव आणि द्रष्टे वामनराव यांच्यांतला एक गमतीदार वादविवादच वाटतो. ' गांधीयुग संपत आलें आहे ' हें त्यांचें या लेखांतले भविष्य राजकारणाच्या दृष्टीनें जसें खरें ठरलें नाहीं, तशी ' ऐतखाऊ मध्यमवर्ग लयाला जाईल; पण त्यामुळं आपण उच्च संस्कृतीला मुकण्याचा संभव आहे ' ही त्यांची भीतिही खरी ठरणार नाहीं ! धर्मभेद, जातिभेद, वर्गभेद इत्यादि भेदांवर उभारलेली, समाजांतल्या मूठभर लोकांना पिढ्यान् पिढ्या सुखवस्तुपणा लाभल्यामुळें त्यांच्या बौद्धिक क्रीडेंतून उत्पन्न झालेली जुनी उच्च संस्कृति यापुढें फार दिवस टिकणार नाहीं हें उघड आहे ! आणि हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त होऊन सध्यांची भयंकर आर्थिक विषमता दूर करणारी आणि देशांतल्या प्रत्येक मनुष्याला जीवनविकासाची संधि देणारी समाजरचना रूढ होईपर्यंत नवी उच्च संस्कृति निर्माण होणार नाहीं हेंही तितकेंच खरें ! पण उद्यांच्या या नव्या संस्कृतींत पोटांत अन्नाचा कण नसल्यामुळें कलकत्त्यासारख्या शहरांत भुकेनें तडफडून मरण्याचें किंवा तीं मरणारीं माणसें पाहण्याचें दुर्दैव कुणाच्याही वांट्याला येणार नाहीं आणि अशीं मरणोन्मुख माणसें दारांत आल्यावर ' हे रोगी नाहींत '

म्हणून आपलीं दारें बंद करून घेणारीं इस्पितळें औषधालाही आढळणार नाहींत. उद्यांच्या सुखी हिंदी समाजांत राजकीय, सामाजिक, किंवा धार्मिक गुलामगिरी बिलकुल असणार नाहीं. शेती आणि कारखाने, शिक्षण व जीवन, व्यक्तिसुख आणि राष्ट्रहित, कष्ट व कला, श्रम आणि दाम इत्यादिकांची सुंदर सांगड त्यांत घातली जाईल. अशा उच्च समाजाच्या सेवेकरितां आणि समाधानाकरितां जें सामर्थ्यशाली साहित्य लिहिलें जाईल, त्या काळांतल्या कलांमध्यें जें नवें सौंदर्य फुलविलें जाईल, त्यांतूनच नवी उच्च संस्कृति निर्माण होईल.

आतांपर्यंत उल्लेखिलेल्या या सर्व लेखांपेक्षांही 'विवाहित स्त्रियांचीं कांहीं कर्तव्यें', 'मला आलेलीं पत्रें', 'मी आणि माझीं पुस्तकें', व 'माझ्या आयुष्याचा माझ्या लेखनावर परिणाम' हे चार लेख वाचकांना अधिक आवडतील. आधुनिक तरुणीचें जीवन वामनरावांना जितक्या जवळून पहायला मिळालें, तिच्या अंतःकरणांतल्या आशा-आकांक्षांचा त्यांना जेवढा कानोसा घेतां आला तेवढा गेल्या वीस वर्षांत दुसऱ्या कुणालाही घेतां आला नाहीं. अनेक लेखकांनीं आधुनिक स्त्री रंगविण्याचा प्रयत्न केला. पण तिची केशभूषा आणि वेषभूषा यांचें चित्रण जरी पुष्कळांना साधलें तरी तिचा जीवनविकास वामनरावांच्या इतका दुसऱ्या कुणालाच चित्रित करतां आला नाहीं. अशा वामनरावांनीं विवाहित स्त्रीच्या जीवनाची केलेली चर्चा कुणाला सनातनीपणाची वाटेल, कुणाला 'हेंही खरें आहे नि तेंही खरें आहे' असा संदिग्धपणा तिच्यांत असल्याचा भास होईल. पण ती त्रुटित असली तरी मार्मिक आहे. संसाराची गोडी नुसत्या जोडींत नाहीं, ती तडजोडींत आहे, हें वामनरावांनीं पुरेपूर ओळखलें आहे. 'नवऱ्याला मुठींत ठेवायचें असेल तर त्याला नेहमीं सुग्रास खायला मिळेल याची काळजी घ्या' हा त्यांचा उपदेशही मधुचंद्र संपतांच 'पाकशास्त्र' काढून त्यांत 'भाकरी कशी भाजावी'? हें प्रकरण शोधणाऱ्या अनेक नवगृहिणींनीं अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे.

'मला आलेलीं पत्रें' हा वामनरावांचा लेख लघुनिबंधाचें जें कांहीं तंत्र असेल त्याच्या चौकटींत कदाचित् बरोबर बसणार नाहीं. पण 'स्मृतिलहरी' प्रमाणें याही लेखांत वामनराव अगदीं रंगांत येऊन आपल्या अंतरंगांतल्या गोष्टी वाचकांना सांगत आहेत असा गोड भास होतो.

'मी आणि माझीं पुस्तकें' व 'माझ्या आयुष्याचा माझ्या लेखनावर परिणाम' हे दोन्ही लेख त्यांच्या साहित्याच्या अभ्यासाला नेहमींच उपयोगी पडतील. लेखक स्वतःच्या कृतीविषयीं बोलूं लागला कीं आपल्या दोषांचें लंगडें समर्थन कर-

ण्याचा मोह त्याला अनावर होतो, नाविन्यामुळें ग्रंथनिर्मितीच्या वेळीं कुणीतरी केलेली एवढी तेवढीशी स्तुतीसुद्धां तिच्यावरल्या चक्रवाढव्याजासह पुढच्या पिढीच्या माथीं मारल्याशिवाय त्याला चैनच पडत नाहीं. आरशापुढें उभें राहूनसुद्धां तारुण्यांतलें आपलें रूप कोमेजून गेल्याची प्रौढ स्त्रीची जशी खात्री होत नाहीं, तशी कीर्तीच्या उतरणीवर लागलेल्या लेखकांचीही स्थिति होते. पण वामनरावांच्या आत्मपरीक्षणांत यांपैकीं कुठलाही दोष नाहीं. देवापुढें उभें राहून एखाद्या लहान मुलानें आपली चूक कबूल करावी, तसे त्यांनीं आपल्या निर्मितींतले दोष दाखविले आहेत. त्यामुळें हे लेख वाचून संपवितांना मन एका शंकेनें अगदीं व्याकुळ होऊन जातें. मराठी साहित्यावर सौंदर्याचा साज चढविणारे अनेक कलावंत झाले आहेत व पुढें होतील. मराठी भाषेचें सामर्थ्य वाढविणारे अनेक धुरंधर लेखक होऊन गेले आहेत, पुढेंही निर्माण होतील. पण...पण...तिच्या साधुत्वाची पताका फडकविणारे साहित्यिक पूर्वींही फार कमी झाले. आणि आतां पुढें ? वामनरावांची जागा लवकर भरून निघेल का ?

गेल्या फेब्रुवारींत हिप्परग्याला चार दिवस एकत्रित मोठ्या आनंदांत काढल्या-नंतर वामनराव, यशवंतराव व मी सोलापूरवरून परतलों. सोलापूरपासून कुर्डुवाडी-पर्यंत खिडकीजवळ ठेवलेल्या माझ्या ट्रंकेवर बसून सिगारेटमागून सिगारेट ओढीत वामनराव आम्हांला तुरुंगांतल्या कडूगोड आठवणी सांगत होते, संसारांतल्या नि कॉलेजांतल्या गंमती वर्णन करीत होते, जातां जातां जीवनविषयक सुंदर तत्त्वज्ञान बोलत होते. त्या ' काव्यशास्त्रविनोदां 'त दोन तास केव्हां गेले हें कुणालाच कळलें नाहीं. कोल्हापूरला येण्याकरितां मी कुर्डूवाडीला उतरलों. तिथें मला गाडी बदलायची होती. ' उगीच कशाला उतरतां ? ' असें मीं वामनरावांना म्हटलें. पण ते माझ्या मागोमाग उतरले. मी नको नको म्हणत असतांनाही हमालाच्या डोक्यावर ट्रंक ठेवण्याकरितां त्यांनीं तिला हात लावला. निरोप घेतांना वामनराव म्हणाले " बराय् ! आतां पुन्हां गांठ ? "

" पुण्याला " मीं हंसत उत्तर दिलें.

पण आतां पुण्यांत—

गेल्या वीस तारखेला वामनरावच तांब्यांनीं ' गाडी बदलली ' या कवितेंत वर्णन केलेल्या त्या दुसऱ्या गाडींत जाऊन बसले. ती आठवण होतांच माझें मन व्याकुळ होऊन म्हणतें ' बराय् वामनराव ! आतां पुन्हा गांठ ? '

पुर्नजन्माची कल्पना खरी असेल का ?

छेः ! आतां वामनरावांची गांठ एकाच ठिकाणीं पडणार. त्यांच्या 'रागिणी'च्या घरीं, त्यांच्या 'सुशीले'च्या घरीं किंवा 'विचारलहरी' सारखें त्यांचें पुस्तक वाचतांना.

१६–८–४३ वि. स. खांडेकर

# प्रो. विजापूरकर १

*कांहीं आठवणी व विचार*

कल्पित नव्हे तर अगदीं खरी गोष्ट आहे कीं एका मुलानें परीक्षेच्या पेपरांत "तो जन्मला आणि मेला" एवढेंच श्रीसमर्थ रामदासांचें चरित्र दिलें होतें ! त्या मुलाला वेळ मिळाला नाहीं म्हणून त्यानें असें लिहिलें का त्याला अधिक कांहीं येतच नव्हतें म्हणून त्याला असें लिहावें लागलें, का तिसराच कांहीं प्रकार होता, या प्रश्नाचा निर्णय करण्याचें येथें कारण नाहीं. एवढें मात्र खरें, कीं या मुलाचें हें एकवाक्यात्मक चरित्र पुष्कळ माणसांचें चरित्र लिहितांना उपयोगी पडेल. मुलाला ज्याचें चरित्र परीक्षेकरितां लिहावयाचें होतें त्या श्रीसमर्थ रामदासांचें, किंवा समर्थ–भक्त प्रो. विजापूरकर यांचें चरित्र इतक्या आटोपशीर रीतीनें लिहितां येण्यासारखें नसलें तरी त्या मुलाच्या शीघ्र चरित्रलेखनपद्धतीचें थोडेंसें अवलंबन करून अण्णासाहेब विजापूरकर किंवा–अण्णा विजापूरकरच म्हणूं या–यांच्या चरित्राची प्रथम स्थूल रूपरेषा काढून मागाहून त्यांत जागजागीं थोडेबहुत रंग भरूं या.

जन्म श्रावण शु॥ १२, शके १७८५ (ऑगस्ट १८६३), बालपण इतरांसारखेंच. राजाराम व डेक्कन कॉलेजमध्यें शिक्षण; १८८७ मध्यें बी. ए.; डेक्कन कॉलेजमध्यें फेलो; एम्. ए. १८९०; कोल्हापुरास लेक्चरर; प्रो. शिवराम बापूजी परांजपे यांच्या मरणानंतर राजाराम कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर; 'ग्रंथमाला' सुरू केली; 'समर्थ' छापखाना व वर्तमानपत्र काढलें; कांहीं पुस्तकें भाषान्तरित केलीं, कांहीं लोकांकडून लिहून घेतलीं; 'वेदोक्त' प्रकरणांत ब्राह्मणेतरांचा त्यांजवर रोष; १९०३–४–५ ची कर्झनशाहीच्या वेळची राजकीय धामधूम व वावटळ आणि त्याच सुमारास निघालेली 'स्वदेशी'ची व 'बहिष्कारा'ची चळवळ; अण्णांची 'स्वदेशी'बद्दलची प्रीति, कोल्हापूर सरकारची या चळवळीसंबंधीं विरोधात्मक नसली

तरी संशयात्मक वृत्ति, ‘ वेदोक्त ’ प्रकरणामुळें अण्णांबद्दल या सरकारची अप्रीति, वातावरण कर्झनशाहीचें, मग काय, कॉलेजमधल्या मुलांनीं परीक्षेकरितां स्वदेशी का विदेशी कागद वापरावयाचे अशासारख्या क्षुल्लक निमित्तावरून उत्पन्न झालेला कांटा नायटयाचें स्वरूप पावला ! प्रोफेसरशिप गेली ( १९०५ ); ‘ स्वदेशी ’च्या व ‘ बहिष्कारा ’च्या सांगतेप्रीत्यर्थ ‘ राष्ट्रीय शिक्षणा ’च्या पुरस्कारास प्रारंभ; १९०६ जूनमध्यें कोल्हापुरासच अण्णांनीं ‘ समर्थविद्यालय ’ व ‘ विश्ववृत्त ’ मासिक काढलें. १९०६ च्या डिसेंबरांतील कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत महर्षि दादाभाई नौरोजींनीं ‘ स्वराज्या ’चा मंत्रोपदेश केला; याच सभेंत टिळक, अरविंद घोस इत्यादिकांनीं अकांड–तांडव करून ‘ स्वदेशी ’च्या ठरावांत ‘ Even at a sacrifice हे शब्द घालण्यास लावले व राष्ट्रीय पक्षास यांतच धन्यता वाटलीशी दिसली; ‘ बहिष्कारा ’-च्या ठरावांत या चळवळीला बंगालपुरतीच अर्धवट व संदिग्ध मान्यता बिपिनचंद्र पाल, टिळक वगैरे मंडळींनीं ‘ मवाळां ’कडून मिळविली होती. पण ठरावावर भाषण करतांना बिपिनबाबूंनीं आपल्या वक्तृत्वाच्या भरांत The boycott movement या शब्दसमूहांतील movement शब्दावर कोटि करून “ The boycott movement, moving from place to place, village to village, district to district and province to province ” इत्यादि प्रकारचें भाष्य करून इतर प्रान्तांचीहि या चळवळीला मान्यता आहे असें सुचविलें आणि सभेला जणूं काय विद्युदाघात दिले; लगेच कैलासवासी गोपाळराव गोखले रागारागानें उठले व त्यांनीं मूळ ठरावांतील शब्दांकडे लक्ष वेधून It is a question of English, the words are so & so ” अशा आशयाचें आवेशपूर्ण भाषण केलें. ‘ Even at a sacrifice ’ हे शब्द काय किंवा The boycott movement यांतील movement शब्दावरची कोटि काय, यासंबंधीं शहाण्यासुरत्या लोकांत रणें कां पडावीं हें वीस वर्षांनंतरच्या आतांच्या लोकांस गूढ पडेल, पण त्यावेळीं असल्या शाब्दिक रणांतील जयापजयामुळें लोकांना धन्यता किंवा अधन्यता वाटावयाची ही गोष्ट खरी !

या १९०६ च्याच सभेंत ‘राष्ट्रीय शिक्षणा’वर जो ठराव पास झाला त्यावर महाराष्ट्रातर्फे अण्णांचेंच अर्थात् भाषण झालें. १९०७ मध्यें ‘समर्थविद्यालया’नें कोल्हापुराहून निघून तळेगांवास येण्याकरितां मिरजेस तेथील अधिपतींच्या कृष्णा-कांठच्या वाड्यांत प्रस्थान ठेवलें; ४ महिने तेथें राहून १९०८ मध्यें समर्थविद्यालय

तळेगांवास गांवांत राहण्यास गेलें व नंतर लवकरच आपल्या स्वतःच्या मालकीच्या जागेंत–झोंपड्यांत कां होईना, पण स्वतःच्या जागेंत व स्वतःच्या मालकीच्या झोंपड्यांत–राहण्यास गेलें. इकडे महाराष्ट्रांत किंबहुना सर्व देशभर राजकीय खटल्यांचें सत्र सुरू झालें. टिळक, शिवरामपंत परांजपे यांजवर खटले होऊन ते तुरुंगांत गेले. ऑगस्टमध्यें अण्णांची पाळी आली. त्यांजबरोबर वामन मल्हार जोशी ( विश्ववृत्ताचे सह–संपादक म्हणून ) व विनायकराव जोशीराव ( मुद्रक म्हणून ) यांच्यावरहि आरोप ठेवण्यांत आले. खटल्याचा निकाल १९०९ जानेवारींत होऊन अण्णांना तीन वर्षें साधी कैद, वामनराव जोश्यांना ३ वर्षें सक्त मजुरी व विनायकराव जोशीरावांना १॥ वर्ष सक्त मजुरी अशा सजा देण्यांत आल्या.

सजा झाल्यावर या त्रिवर्ग कैद्यांना दोनएक महिने कोल्हापूर जेलमध्यें, नंतर दोन महिने पन्हाळा किल्ल्यावर व मग पुनः कोल्हापुरासच पण पोलिसांच्या पहाऱ्यांत नव्हे, तर त्याहून कडक शिस्तीच्या फौजी पहाऱ्यामध्यें, ठेवण्यांत आलें. अशी ही धिंड पुरेशी न वाटल्यामुळेंच कीं काय, त्यांना मग कोल्हापूर संस्थानच्या बाहेर, पण निरनिराळ्या कैदखान्यांत पाठविण्यांत आलें. अण्णांची रवानगी साबरमतीस झाली; पुढील सजा त्यांनीं तेथेंच भोगिली व ते १९१२ जानेवारींत सुटून आले. या अवधींत इकडे तळेगांवचें समर्थविद्यालय १९१० सालींच सरकारी हुकुमानें बंद करण्यांत आलें होतें. कै. जनार्दन विनायक ओक, जनार्दन सखाराम करंदीकर, राजाराम दामोदर देसाई वगैरे समर्थ विद्यालयाची अभिमानी मंडळी सरकारचा गैरसमज दूर करण्याच्या खटपटींत होतीच. पण त्यांना त्यांत यश आलें नाहीं. अण्णांनीं हीच खटपट पुनः सुरू केली व नामदार चौबळांच्या सहानुभूतीनें १९२० सालीं १० वर्षें बंद राहिलेलें विद्यालय पुनरुज्जीवित करून ‘ नवीन समर्थ विद्यालय ’ असें त्याचें दुसऱ्या अवतारांतील नांव ठेवून ‘राष्ट्रीय शिक्षणा’चें काम पुनः सुरू केलें. पुढें टिळक वारल्यावर ‘ गांधीयुग ’ सुरू होऊन असहकारितेच्या चढत्या लाटेचे सुमारास टिळक युनिव्हर्सिटीची स्थापना झाली व यासंबंधांत अण्णांची सहानुभूति आहे, इतकेंच नव्हे तर त्यांनीं या युनिव्हर्सिटीच्या पुणें येथील कॉलेजांत संस्कृतविषयाच्या प्रोफेसराचें काम करण्याचें अभिवचन दिलें आहे असें प्रसिद्ध झाल्यावरून व इतर कांहीं कारणांमुळें चौबळांनीं समर्थविद्यालयाशीं अण्णांच्या स्नेहाखातर जुळलेला आपला संबंध तोडला. तथापि अण्णांनीं आपल्या आवडत्या विद्यालयाचें काम धीर न सोडतां चालू ठेवलें. १९२२

नंतर ते अशक्तपणामुळें वर्गणीकरितां वगैरे फारसे बाहेर हिंडले नाहींत; तळेगांवासच राहून थोडेंसें अध्यापन करून संस्थेचें सामान्य धोरण आपण योजिलेल्या मार्गापासून च्युत होत नाहीं एवढेंच ते पहात असत. कालांतरानें अध्यापनाचें कामहि करणें अशक्तपणामुळें अशक्य होऊं लागलें. संस्थेच्या आजन्म सेवक मंडळींशींहि अण्णांचा मतभेद होऊं लागला, अशा स्थितींत अण्णांना किती दुःख झालें असेल याची कल्पना कल्पनाशक्तीनेंच करावी, लेखणीनें या बाबतींत एक शब्दहि लिहूं नये.

अखेर अखेर तर वर उल्लेख केलेला मतभेद तीव्र स्वरूपाचा झाला व तो विकोपाला जाऊन भलताच कांहीं तरी परिणाम होतो कीं काय अशी भीति वाटण्यापर्यंत पाळी आली. या नाजूक परिस्थितींत अण्णांची आधींच खालावलेली प्रकृति अत्यन्त क्षीण झाली आणि अखेर रविवार ता. १ ऑगस्ट रोजीं दुपारीं १२–१ वाजण्याच्या सुमारास कर्मभूमींतील त्यांचें अवतारकृत्य संपलें ! ‘ तळेगांवास समर्थ विद्यालयाकरितां माझा देह झिजावा व तेथेंच तो पडावा ’ अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या इतर सदिच्छांकडे कानाडोळा करणाऱ्या जगन्नियंत्या शक्तीनें ही एवढी तरी त्यांची इच्छा पूर्ण केली व तळेगांवासच इंद्रायणीच्या कांठीं–तुकोबानें पुनीत केलेल्या इन्द्रायणीच्या कांठीं, समर्थ विद्यालयांतील बालगोपालांनीं व अध्यापकांनीं अनेकवार स्नानसंध्या केल्यामुळें अण्णांना प्रिय झालेल्या इन्द्रायणीच्या कांठीं, तळेगांवास आल्यापासून उतारवयापर्यंत स्वतःच्या स्नानसंध्येचें स्थान म्हणून अण्णांना अत्यन्त पावन व आनंददायी वाटणाऱ्या इन्द्रायणीच्या कांठीं–त्यांच्या देहाला अन्त्य संस्कार झाले व त्यांची रक्षा त्या नदीच्या पावनोदकांत पडली, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट आहे म्हणावयाची ! देहाची रक्षा इन्द्रायणीशीं एकरूप झाली, पण त्यांचा आत्मा स्व स्वरूपांत विलीन न होतां मर्त्य जगांतील गोष्टींचें चिन्तन करीत जगतीतलावर जर कोठें वावरत असेल तर तो इन्द्रायणीच्या कांठीं समर्थ विद्यालयाच्या आसपास कोठें तरी वावरत असेल यांत शंका नाहीं !

* * *

अण्णांच्या सार्वजनिक संसारांतील कांहीं आठवणी देण्यापूर्वी त्यांच्या जवळच्या आप्तेष्टांसंबंधीं त्यांचें वर्तन कसें होतें हें पाहूं गेलें असतां ‘ विवेकपूर्ण प्रेमळपणा ’ जिकडे तिकडे दिसून येईल. आईबाप, आत्या, बायको, बहीण, भाऊ, मुलगा, पुतण्या, सून, इत्यादिकांवरचा त्यांचा अनुराग भडक रंगांत विशेष कधीं दिसला

दा. क्र. ६३९

नाहीं; 'वाचेच्या द्वारें त्यानें आपल्या अस्तित्वाची टिमकी वाजविली नाहीं; नाचरेपणाच्या येरझाऱ्यांनीं किंवा खटाटोपांनीं लोकांचें लक्ष आपल्याकडे वेधण्याचाहि त्यानें प्रयत्न केला नाहीं; तथापि डोळ्यांतील तेजाप्रमाणें, शरीरांतील आरोग्याप्रमाणें, मनाच्या समाधानवृत्तीप्रमाणें किंवा आत्म्याच्या शान्तीप्रमाणें त्या अनुरागाचें अस्तित्व गाजावाजाशिवाय पहाणाऱ्याच्या प्रत्ययाला येत असे. त्यांचा मुलगा माधव ( बंड्ड ) हा समर्थ विद्यालयांत असतां त्याच्याकडे त्यांचें विशेष लक्ष होतें असें कधीं दिसलें नाहीं. इतर मुलांच्याबद्दल ते हजार चौकशा करीत, पण बंड्ड हा त्यांचा मुलगा हें समर्थ विद्यालयांत महिना महिना रहाणाऱ्यांच्या देखील ध्यानांत येणें कठीण पडे, इतका तो बंड्ड इतर मुलांमध्यें मिळून जाई व अण्णाहि इतके त्याविषयीं " अविशेषा " नें वागत. प्रत्यक्ष बायकोवरचें प्रेमहि लोकांमध्यें विशेष उत्कट तऱ्हेनें दिसून आलें नाहीं. कोल्हापुरास राजाराम कॉलेजांत प्रोफेसर असतांना हे विद्याव्यासंगी गृहस्थ एक दोन वर्षे सकाळीं, दुपारीं, रात्रीं, कॉलेजमध्येंच अध्ययन-अध्यापनाकरितां रहावयाचे, जेवणखाणाकरितां वगैरे फार थोडा वेळ घरीं रहावयाचे, म्हणून कांहीं जणांना त्यांच्या पश्चात् त्यांची कुचेष्टा देखील करावीशी वाटे. ते घराबद्दल बेफिकीर दिसत. त्यांची आत्या, बहीण, मेव्हणा, पुतण्या, भाच्या, इत्यादि सर्वांवर त्यांचें प्रेम असे, पण तें दृष्टीच्या द्वारें, ' मिताक्षरा ' वाचेच्या द्वारें व त्या त्या व्यक्तीचें कल्याण व्हावें अशा सदिच्छेनें प्रेरित झालेल्या कृतींच्या द्वारें व्यक्त होईल तेवढेंच. त्यांची एक आत्या होती, ती जरा स्वभावानें कठोर किंबहुना कर्कश असे,— किंवा दिसे; पण अण्णा मोठेपणीं देखील तिला लागेल असें कठोर भाषण करीत नसत, तर सौम्यपणानें हो हो करून वेळ मारून नेत. त्यांचे बंधु वासुनाना यांच्यासंबंधानेंहि असेंच. हे प्रथम प्रथम अण्णांच्या ध्येयैकदर्शी अव्यावहारिक दृष्टीची कुचेष्टा प्रेमबुद्धीनें, किंबहुना आदरपूर्ण कौतुकानेंच, अण्णांच्या तोंडावर करीत असत. पण अण्णांची शांत वृत्ति कधीं ढळली नाहीं व वासुनानांवरच्या प्रेमांत कधीं अंतर पडलें नाहीं. विनायकराव जोशीराव हे त्यांचे नातलग नव्हेत, पण अनेक वर्षे दोघांचा संबंध जडलेला होता म्हणून त्यांच्याविषयींहि येथें जी गोष्ट आठवली आहे ती देण्यास हरकत नाहीं. असें सांगतात कीं, कोल्हापुरास 'फौजी पहाऱ्या'खालीं अण्णा, विनायकराव व वामनराव जोशी हे कैदी असतां विनायकराव अण्णांशीं वाद करून समर्थ विद्यालय काढण्यांत अण्णांनीं मोठी चूक केली व फसलेल्या मुलांचें, अण्णांनीं आपल्या स्वतःचें, विनायकरावांचें व वामनरावांचें जन्माचें नुकसान केलें असें

सिद्ध करूं पहात. अण्णा हरतऱ्हेचे युक्तिवाद करून आपलें समर्थन करीत, पण विनायकराव वादांत कांहीं कमी कुशल नव्हते आणि शिवाय थोडीबहुत कुचेष्टा करून व अण्णांना थोडेंसें चिडवून कसा तरी कैदेंतला वेळ कंठावयाचा या हेतूनें ते हार न जातां अधिकच कुचेष्टा करीत. मास्तरांशीं उगाच वाद करणाऱ्या वितंडवादी शिष्यांच्यासारखाच हा प्रकार होता. ( विनायकराव हे अण्णांचे शिष्य होतेच. ) पण अण्णांना उगाच कांहीं तरी बोलून वंद्य वस्तु अवंद्य ठरविणें, पूज्य वस्तूची टवाळी करणें, हें खपत नसे. असें सांगतात कीं, अण्णांनीं अखेर विनायकरावांशीं वाद करण्याचें सोडून दिलें, पण त्यांना कठोर शब्द उच्चारून दटावलें किंवा दाबलें नाहीं. विनायकराव काय, मग वामनरावांशीं वाद घालूं लागले. दोघेहि कुणीकडून तरी वेळ घालवावयाचा म्हणून वाद करूं लागले. एकमेकांना पेंच घालून, कोंडींत पकडून, विनोदी गोष्टींनीं एकमेकांचा युक्तिवाद हास्यास्पद ठरवून, ते कालक्रमणा करीत असतां अण्णांना ही पूज्यवस्तूबद्दलची अपूज्यबुद्धीची चर्चा आवडली नाहीं, पण ते कांहीं विनायकरावांना किंवा वामनरावांनाहि कठोरपणें बोलले नाहींत. विनायकरावांना तर समर्थ विद्यालयाची कुचेष्टा करण्याचा चेव आल्यासारखें होऊन ते भलभलते आरोप अण्णांवर व त्या विद्यालयाच्या चालकांवर करूं लागले. अण्णांना हे कांहीं ऐकवेनात म्हणतात.

पण एकाच खोलींत तिघांना कोंडलेलें, तेव्हां करतात काय ? ऐकल्याशिवाय गत्यन्तर नव्हतें. तरी पण अखेर कुचेष्टेचा हा प्रकार त्यांच्या कानांना ऐकवेना व डोळ्यांना पहावेना, म्हणून त्यांनीं घोंगडी डोकीवरून घेऊन तोंड झांकून टाकलें व कानांवर शब्द येऊंच नयेत अशी योजना करण्याचा प्रयत्न केला पण तो साध्य कसा होणार ?

विनायकरावांच्या अंगांत त्या वेळीं कलि शिरला होता कीं काय कोणास ठाऊक, त्यांनीं अण्णांच्या या प्रयत्नासंबंधीं एक हास्यकारक व अश्लील परंतु अगदीं लागू पडणारी व मर्मभेदक अशी गोष्ट सांगितली. विनायकराव का वामनराव, यांपैकीं कोणाकडून तरी ही गोष्ट या लेखकानें ऐकिली आहे; व एकंदर हा प्रकार त्यांच्याकडूनच कळलेला आहे. या प्रसंगीं अण्णांवरतीं अत्यन्त मर्मभेदक अशा रीतीनें विनायकरावांनीं बाजू उलटविली असतां अण्णांची जी अवस्था झाली ती विनायकराव व वामनराव यांच्याकडूनच ऐकावी. तथापि सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, या प्रसंगीं देखील, रागाचें इतकें प्रबळ कारण असतांना देखील, अण्णांनीं आपली शांति

स. ता.

ढळूं दिली नाहीं, व याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विनायकरावांवरचें प्रेम कमी होऊं दिलें नाहीं. तिसरी गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, विनायकरावांचा अण्णांबद्दल आदर कमी नव्हताच, पण या प्रसंगानंतर तो अधिकच वाढला. अंगांत संचारलेल्या कलीनें प्रयाण केल्यानंतर हा आदर उचित प्रसंगीं उचित रीतीनें व्यक्त होऊं लागलाच.

❧ ❧ ❧

अण्णांचा साधेपणा हा त्यांच्या वर्तनांतला दुसरा विशेष होय. पोषाख तर अगदींच साधा असे. साधा कोट, आंत बंडी, बिनजरीचा रुमाल, साधें धोतर आणि उपर्णें असा त्यांचा थाट होता. बंडी, धोतर, उपर्णें वगैरे ते बहुधा म्हातारपणीं देखील हातांनीं धुवावयाचे. सुपारीचें देखील व्यसन नाहीं. बोलणें चालणें देखील साधेपणाचेंच. बाकी बोलणें अगदीं साधें नव्हतें हें येथें नमूद केलें पाहिजे. संस्कृतचे ते प्रोफेसर होते म्हणून त्यांची भाषा संस्कृतप्रचुर होती असें येथें सांगावयाचें नाहीं, तर त्यांचें बाह्यतः साधें दिसणारें बोलणें तसें नसे, तर त्यांत खोंचा असत हें सुचवावयाचें आहे. बोलणें गोड; प्रतिपक्ष्याचें मन न दुखेल असा प्रयत्न; साक्षात् कटु लागेल असें बोलावयाचें नाहीं असा निर्धार; पण आपलें म्हणणें त्यांनीं कधीं सोडलें आहे असें व्हायचें नाहीं. दुसऱ्याचें म्हणणें ते शांतपणानें ऐकून घेत, त्याच्यांतला ग्राह्यांश घेत, परंतु शेवटीं आपलें तें खरें अशी त्यांची बोलण्याची पद्धत होती. प्रतिपक्ष्याचें म्हणणें झाल्यावर "तेंच कीं" असें म्हणून त्याचें म्हणणें सगळें आपण कबूल करीत आहों असें ते दाखवीत, पण अखेर 'तें असें नाहीं' असा त्यांच्या बोलण्याचा निष्कर्ष निघे! "तेंच कीं" यापासून प्रारंभ झालेल्या भाषणाचा "तें तसें अगदीं नाहीं" असा शेवट झालेला पाहून प्रस्तुत लेखकाला कितीदां तरी हंसूं आलें आहे. पण या हास्यविषय विरोधाच्या मुळाशीं दुसऱ्याचें मन सहसा दुखवावयाचें नाहीं, त्याच्याशीं मिळतें घेऊन त्याला आपल्या बाजूला वळवावयाचा, अशा प्रकारची वृत्ति असल्यामुळें त्यांचा राग येत नसे.

❧ ❧ ❧

त्यांचा '**स्वधर्म-स्वदेश-स्वभाषाभिमान**' हा तर लोकविश्रुतच आहे. भाषेच्या बाबतींत संस्कृतचा त्यांना अभिमान होताच व संस्कृतला 'मृत' भाषा कोणीं म्हटलें तर त्यांना तें अगदीं खपत नसे. त्यांच्या मराठी लेखांत व भाषणांत क्वचित् बोजड संस्कृत शब्द आढळत हें कोणालाहि कबूल करावें लागेल.

Co-operation बद्दल " संभूय-समुत्थान," किंवा ' परिस्थिती 'बद्दल 'उपाधि' अशा प्रकारचे शब्द त्यांनीं योजिले कीं कुचेष्टेला तो एक विषयच होई. पण असले कांहीं थोडे शब्द सोडले तर त्यांची भाषा चांगली प्रौढ व सुसंस्कृत वाटे. बोलण्यांतल्याप्रमाणानें लेखनांत त्यांच्या खोंचा विशेष नसत. चटकदारपणाकडे लक्ष अगदींच बेताचें. पुढें पुढें त्यांचा व्यासंग संस्कृत ग्रंथांपेक्षां दासबोधादि ' समर्थ ' ग्रंथांचा विशेष होऊं लागला व त्यांच्या भाषेंत एक प्रकारचें निराळें ' सामर्थ्य ' येऊं लागलें. अगदीं प्रथमपासूनच त्यांना संस्कृतप्रमाणेंच मराठीचा अभिमान होता, पण पुढेंपुढें मराठीचा अभिमान विशेष दृग्गोचर होऊं लागला इतकेंच. अशी एक गोष्ट त्यांच्यासंबंधानें ऐकण्यांत येते कीं, कोल्हापुरास त्यांनीं प्रथम जें व्याख्यान दिलें त्याचा विषय ' कष्ट ' असा होता. उद्योगशीलता, वगैरे संस्कृत शब्द सोडून मुद्दाम ' कष्ट ' शब्द निवडल्यावरून त्यांचा पहिल्यापासूनचा प्राकृताभिमान स्पष्ट दिसून येतो, पण त्या वेळच्या कोल्हापुरच्या विनोदप्रवीण लोकांनीं ' कष्ट ' हा विषय ऐकून ' कष्ट, कष्ट ' असे उद्गार काढले असा या गोष्टीचा उत्तरार्ध ऐकला, म्हणजे त्यांच्या भाषेंत प्रथम प्रथम बोजड संस्कृत शब्द जसे क्वचित् येत असत तसे क्वचित् रसभंग करणारे प्राकृत शब्दहि येत असत असें कबूल करणें प्राप्त होतें. कालान्तरानें हा अल्पसा दोष नष्टप्राय झाला हें त्यांच्या शेवटच्या शेवटच्या लेखांवरून व पत्रांवरून वगैरे स्पष्टच दिसतें, तेव्हां त्याचा विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. मराठीचा त्यांना इतका अभिमान होता कीं ते खासगी पत्रव्यवहारांत इंग्रजीचा सहसा उपयोग करीत नसत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' इंग्रजालाच पत्र लिहावयाचें झालें तर गोष्ट वेगळी, पण मराठी जाणणाऱ्याला इंग्रजींत कां पत्र लिहावयाचें असें त्यांचें म्हणणें असे. संभाषणांत वगैरे इंग्रजी शब्द ते वापरीत नसत असें नाहीं—कालाच्या ओघाबाहेर ते तरी किती जाणार ?—पण होतां होई तों मराठीच शब्द वापरावयाचे अशी त्यांची प्रवृत्ति होती. कोठलाहि इंग्रजी शब्द आला, तरी त्याचा अर्थ कमी अधिक शब्दांच्या द्वारे मराठींत चांगल्या तऱ्हेनें व्यक्त करतां येईल यांत शंका नाहींच, पण पर्यायवाचक ठसठशीत, सुटसुटीत शब्दहि पुष्कळ वेळां सांपडेल किंवा बनवितां येईल अशी त्यांची ठाम समजूत होती. या संबंधांत त्यांचें आव्हान असें कीं, ज्याचा अर्थ मराठींत कमी अधिक शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं असा इंग्रजी शब्द दाखवा.

स्वभाषेप्रमाणें स्वधर्माच्या बाबतींत देखील त्यांचें असें आव्हान असें कीं " लोकाभ्युदयकारक किंवा मोक्षसाधनीभूत अशी कोणतीहि गोष्ट तुम्ही सांगा, शास्त्र कांहीं त्याच्या आड येत नाहीं असें मी दाखवून देतों. " लोकांच्या मोक्षाच्या किंवा अभ्युदयाच्या आड शास्त्र येईल कसें, असें ते म्हणत. शास्त्राची प्रवृत्तिच जर जनहित साधण्याकरितां आहे, तर जनहिताला शास्त्र कसें विरोध करील ! आतां एवढीमात्र गोष्ट खरी, कीं चैनबाजीच्या आड शास्त्र येईल, केवळ शरीरपूजाच ज्यांना करावयाची आहे त्यांना शास्त्र जाचक होईल, लोकव्यवस्थेकरितां देखील ज्यांना कांहीं देखील निर्बंध नको अशांना शास्त्र जुलमी वाटेल, पण खरोखर लोकहित ज्यामध्यें आहे, अशी सुधारणा केव्हांहि शास्त्रसंमतच असणार. एखाद्या ग्रंथांत अशा एखाद्या सुधारणेबद्दल विरुद्ध वचन असलें तरी तें वचन एखाद्या विशेष परिस्थितीला अनुलक्षून असतें व त्याच ग्रंथांत " देशकालवर्तमान पाहून शिष्ट परिषदेनें त्या त्या परिस्थितीला अनुरूप असे इष्ट ते आचार ठरवावेत " अशा आशयाचीं वचनें असतात, असें ते नेहमीं सांगत.

* * *

स्वदेशाभिमान तर त्यांचा इतका होता कीं आपला देश पूर्वी जसा सर्व विश्वाला वंद्य व आदर्शभूत होता तसा तो अजूनहि होईल असें त्यांना वाटे. बोलावें कसें, चालावें कसें, वागावें कसें, अशा प्रकारचा प्रश्न जगांत कोठेंहि कोणालाहि पडला तर त्यानें आपल्या या आर्यावर्ताकडे दृष्टि वळवावी व येथें शिष्ट गणलेले लोक जसें बोलतात, चालतात, वागतात त्याप्रमाणें त्यानें वागावें अशी आर्यावर्ताची पूर्वी महती होती असें सांगून मनुस्मृतींतील

**अस्मद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥**

हा श्लोक ते स्वमतसमर्थनार्थ म्हणून दाखवीत. अशा प्रकारची महनीय स्थिति आपल्या देशाला प्राप्त व्हावी अशी त्यांची दूरविसर्पी आकांक्षा होती आणि ती सफल व्हावी म्हणून त्यांची अहर्निश खटपट होती. ध्येयसृष्टींत दिसून येणारें स्वदेशाचें रम्य चित्र सत्य-सृष्टींत जिवंत स्वरूपांत पाहावयास मिळावें एतदर्थ 'स्वदेशी', 'राष्ट्रीय शिक्षण', 'स्वराज्य' या साधनांची त्यांना आवश्यकता भासूं लागली. 'स्वदेशी' व्रत पटल्यावर तें त्यांनीं स्वतःच्या वर्तनांत आणिलें. कापड

तर स्वदेशी असावयाचेंच, पण छत्री देखील स्वदेशीच पाहिजे असा त्यांचा आग्रह. स्वदेशी छत्री चांगली मिळत नव्हती तेव्हां कांहीं वर्षें छत्रीच वापरण्याचें त्यांनीं सोडलें व पावसांत पर्जन्यनिवारणार्थ घोंगडीचाच ते उपयोग करीत ! स्वदेशी साखर, स्वदेशी कागद, जो जो पदार्थ स्वदेशांत मिळेल तो तो वापरावयाचा मग तो कितीका ओबडधोबड असेना, अशी त्यांची वृत्ति होती. 'आधीं केलें मग सांगितलें' अशा त्यांच्या वर्तनक्रमामुळें त्यांचा स्वदेशीबद्दलचा उपदेश व आग्रह केव्हांहि आदरणीयच वाटे, हें सांगायला नकोच.

❧ ❧ ❧

' राष्ट्रीय शिक्षण ' म्हणजे राष्ट्रांतील लोकांच्या ताब्यांत असलेलें व राष्ट्राला उपकारक असें शिक्षण अशा प्रकारची त्यांची व्याख्या होती. राष्ट्राच्या सध्यांच्या परिस्थितीला व्यापारी व औद्योगिक शिक्षणाची विशेष आवश्यकता आहे असें त्यांचें मत होतें आणि तें बरोबर नाहीं का ? वाङ्मयविषयक शिक्षण नको असें नाहीं,–अण्णांसारखे संस्कृताभिमानी लोक असें मत कधीं प्रतिपादितील हें शक्यच नाहीं–पण सर्वच मुलांनी बौद्धिक शिक्षण घ्यावें आणि व्यापार व उद्योगधंदे परकीयांवर सोंपवावेत हें इष्ट नाहीं अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती आणि म्हणूनच त्यांच्या हातून राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य एवढ्या चिकाटीनें झालें. जनार्दन सखाराम करंदीकर व राजाराम दामोदर देसाई आरंभापासूनच समर्थ विद्यालयाला लाभले. नंतर वामन मल्हार जोशी, नंतर जनार्दन विनायक ओक, पेणचे करंदीकर, परांडेकर, मोडक, कोतवाल ही अशी मंडळी त्यांच्या समर्थ विद्यालयाला मिळाली असतां ' समर्थ–विद्यालय ' चालूं नये व एका कार्यसूत्रानें निबद्ध झालेला हा मणिगण सरकारच्या रोषानें दहा दिशांना पांगला जावा, हें दैवदुर्विलसित नव्हे तर काय ? तात्या करंदीकरांसारखा निरलस निरभिमान तत्त्वनिष्ठ तपस्वी, बापू देसाईसारखा उत्साही स्वार्थत्यागी कर्मवीर, नाना ओकांसारखा अत्यन्त विद्वान् राष्ट्रभक्त, ' रागिणी ' व ' नीतिशास्त्रप्रवेश'कर्ते वामनराव जोशी, पेणच्या करंदीकरांसारखा ध्येयवादी पण व्यवहारकुशल स्वार्थत्यागी उत्साही निरभिमान कर्मयोगी, " मुलांचा महाराष्ट्र " लिहिणारे मोडक, इत्यादि मंडळी अध्यापकवर्गांत, महादेवशास्त्री दिवेकर व दिनकरशास्त्री कानडे यांच्यासारखे उत्साही तरुण त्यावेळीं " प्रौढ–विद्यार्थिवर्गांत, " असा तो देखावा कल्पनाचक्षूंसमोर आला म्हणजे अजूनदेखील ही मंडळी विस्खळित करून अज्ञेय जगच्चालक शक्तीनें कोणतें जगाचें

कल्याण साधलें हें गूढ पडतें व ही जगच्चालक शक्ति रसिक नसावी असें वाटूं लागतें. अण्णा विजापूरकरांचा व त्यांच्या सहकारी मित्रांचा कांहींच दोष नाहीं काय, असा प्रश्न येथें उत्पन्न होणारच. तेव्हां त्याचा आतां विचार करूं या.

* * *

"समर्थ विद्यालय" सरकारनें बंद केलें ही वस्तुस्थिति कोणीहि नाकबूल करणार नाहीं. सरकारचें करणें योग्य होतें किंवा नाहीं एवढाच काय तो प्रश्न. कांहीं अधिकाऱ्यांची त्या वेळीं १९०६–७–८ सालीं राजकारणांत किती संशयी वृत्ति होती, राजकीय 'सर्पसत्र' त्यावेळीं कसें चाललें होतें, हें सर्वविश्रुतच आहे. पण समर्थविद्यालयासंबंधानें एक लहानच गोष्ट सांगितली म्हणजे कांहीं अधिकाऱ्यांचें संशयी धोरण कसें चुकीचें होतें हें समजेल. १९०८ मध्यें समर्थ विद्यालयांतील बापू देसाई यांच्यावर जो एक खटला भरण्यांत आला, त्याचा निकाल देतांना मॅजिस्ट्रेट आपल्या निकालांत तळेगांवच्या समर्थ विद्यालयाच्या व कांचशाळेच्या चालकांच्या सद्धेतूंबद्दल पुढील आशयाच्या वाक्यानें संशय व्यक्त करतात. "Strangely enough this activity takes the form of glass–factories and match–factories." (यांच्या देशभिमानाला व्यक्त स्वरूप आग–काड्या व कांच यांचे कारखाने काढण्यांत मिळतें हें आश्चर्य होय.) यांतील ध्वनि असा होता काय कीं आगकाड्यांचे कारखाने आग लावण्याकरितां असावेत आणि कांच कारखाने बॉंबसारखे कांहीं तरी पदार्थ तयार करण्याकरितां असावेत ? असा ध्वनि असल्यास तो किती प्रमादजन्य होता पहा. आधीं तळेगांवांत आगकाड्यांचा कारखानाच नाहीं व केव्हांहि नव्हता. आसपासहि त्यावेळीं कोठें नव्हता, किंवा इतरहि कोठें तळेगांवांतील समर्थविद्यालयांतील मंडळीशीं किंवा त्यांतील कोणत्याहि एका व्यक्तीशीं दूरान्वित संबंध असलेलाहि आगकाड्यांचा कारखाना नव्हता ! दुसरें असें कीं ज्याला आगच लावायची आहे त्याला काय बाजारांत थोड्या आगपेटचा मिळत होत्या ? बरें, कांचकारखान्यासंबंधानें पाहिलें तर तळेगांवास कांचकारखाने नव्हते, तर एकच लहानसा कारखाना होता. तो सोंवळा होता व आहे, हें सरकारी अधिकाऱ्यांनीं–गव्हर्नरापर्यंतच्या अधिकाऱ्यांनीं या कारखान्याबद्दल जें धोरण स्वीकारलें आहे त्यावरून दिसतें. अर्थात् स्वतःच्या कल्पनासृष्टींतच असलेल्या आगकाड्यांच्या कारखान्यासंबंधानें व या कांचकारखान्यासंबंधानें मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं जें आपलें मत करून घेतलें होतें आणि बापू देसाई यांचा या काल्पनिक व खऱ्या कारखान्यांशीं

त्यांनीं जो बादरायण संबंध लावला होता तो वृथासंशयजन्य व पूर्वग्रहदूषित होता असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होईल ? समर्थविद्यालयांतील मुलें ड्रिल शिकत, डोंगरावर चढत व धिंगामस्तीचे खेळ खेळत, देहूसारख्या ठिकाणीं स्वयंसेवकाचें काम करून व्यवस्था ठेवण्याचें काम यात्रादिक प्रसंगीं करीत, हीं तरी संशय घेण्याला व या संशयावरून शाळेचा चालकवर्ग 'बेकायदेशीर मंडळी' म्हणून ठरविण्याला पुरेशीं कारणें आहेत ? आतां समर्थविद्यालयांतल्या एखाद्याचा एखादा बॉंबशीं दूरन्वित कां होईना पण जो संबंध नाशिक केसमध्यें जोडला गेला त्यासंबंधानें एवढेंच म्हणतां येईल कीं सरकारी हायस्कुलांतील व बिनसरकारी हायस्कुलांतील मुलांशीं दूरान्वितच नव्हे तर साक्षात् संबंध सिद्ध झालेला आहे; मग हीं हायस्कुलें चालविणारी मंडळी बेकायदेशीर कां ठरविली गेली नाहींत ? तात्पर्य काय तर संशयपिशाचिकेचा नाच त्यावेळीं चालला होता आणि समर्थविद्यालय त्या नाचांत पायाखालीं तुडविलें गेलें, झालें; त्याबद्दल आतां सरकारला, सरकारी अधिकाऱ्यांना किंवा दुसऱ्या कोणालाहि दोष देण्यांत अर्थ नाहीं.

आपण आतां 'विश्ववृत्ता'संबंधीं जो खटला झाला व ज्यांत त्यांना तीन वर्षांची सजा झाली त्यांत किती न्याय होता हें पाहूं. आधीं मुख्य आक्षेप–विषय लेख श्रीपाद दामोदर सातवळेकरांनीं लिहिलेला. ते कधीं राजकारणांत पडले नव्हते. विषय "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता." वेदाचा प्रचलित राजकारणाशीं संबंध काय ? बरें, प्रतिपादनांत तरी राजकारण भरलें होतें काय ? फक्त एक वाक्य प्रचलित राजकारणाशीं साक्षात् रीतीनें संबंध असें खुद्द फिर्यादीपक्षाचें म्हणणें. न्यायाधीश आपल्या जजमेंटमध्येंच कबूल करतात कीं हा लेख या काळीं–या विशिष्ट परिस्थितींत, या राजकीय चळवळीच्या प्रसंगीं–लिहिला गेला म्हणून दूषणीय; इतर परिस्थितींत लिहिला गेला असता तर त्यांत दूषणीय कांहीं नाहीं. म्हणजे राजकीय वातावरण खवळलेलें असल्यामुळें अनाक्षेपणीय लेख आक्षेपार्ह झाला ! राजकीय वातावरण खवळविण्याचें पाप लेखकानें किंवा विश्ववृत्ताच्या संपादकांनीं केलें होतें काय ? नाहीं. सौम्य शुद्ध लेख कां असेना, तो भलत्या वेळीं प्रसिद्ध केला हा एवढा फार तर गुन्हा. बरें, अशा परिस्थितींतच लेख मुद्दाम प्रसिद्ध करावा असा लेखकाचा किंवा संपादकाचा हेतु होता काय ? दुष्टबुद्धीनें ही गोष्ट झाली होती काय ? नाहीं, फिर्यादीतर्फे पुरावा याबाबत मुळींच नाहीं. उलट अण्णा विजापूरकरांनीं हा

लेख पाहिलाहि नव्हता हें वामनराव जोशी यांच्या कबूलीजबावावरून स्पष्ट झालेलें. मग अमक्या वेळींच, अमक्या दुष्टबुद्धीनें तो प्रसिद्ध करावा अशी अण्णांची इच्छा होती या म्हणण्यांत अर्थ काय ? आतां, कायदेशीर रीतीनें ते जबाबदार होते व चुकून कां होईना, न कळतां कां होईना, शुद्ध स्वरूपाचा लेख भलत्या वेळीं त्यांच्या मासिकांत प्रसिद्ध झाला, याबद्दल ते कायदेशीररीत्या जबाबदार धरिले पाहिजेत. 'कायदा' असा आहे हें कबूल. पण "The law is an ass" असें जें म्हणण्यांत येतें तेंच येथें म्हणावेंसें वाटतें. आणि "भलत्या काळीं प्रसिद्ध झालें" याविषयीं सुद्धां असें म्हणावेंसें वाटतें कीं, बाबांनो "भलत्या काळीं" प्रसिद्ध झाला हें तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे, कारण त्या तशाच काळीं अशा शुद्ध स्वरूपाच्या "वैदिक" लेखाबद्दल तीन वर्षांची सजा मिळणें शक्य होतें !

❧ ❧ ❧

विजापूरकरांचा खटला केव्हांच निकालांत निघाला, सजा भोगून झाली, विजापूरकरहि वारले. तेव्हां आतां हा काळा कोळसा न उगाळतां त्यांच्या चरित्रापासून बोध काय घ्यावयाचा इकडे आपण पुनः वळूं या. त्यांची ध्येयनिष्ठा ही जगप्रसिद्धच आहे. सुटून आल्यानंतर मानापमान वगैरे गुंडाळून, नामदार चौबळ वगैरे वजनदार गृहस्थांचे उंबरठे झिजवून, त्यांची सहानुभूति संपादन करून त्यांच्या साहाय्यानें त्यांनीं 'नवीन समर्थ विद्यालय' "पुनश्च हरिः ओम्" या न्यायानें काढलें, यांत त्यांच्या चिकाटीबरोबर निरभिमानताहि चांगलीच दिसून येते.

हें आवर्तन करतांना त्यांना कोणत्याहि पक्षाची किंवा पुढाऱ्याची विशेष उत्साहाची व कळकळीची सहानुभूति नव्हती ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे. प्रागतिक पक्ष समर्थ विद्यालयाबद्दल प्रथमपासूनच उदासीन आणि 'राष्ट्रीय' पक्ष अण्णांनीं नामदार गोखल्यांच्या मरणाचे आधीं टिळकांचा व त्यांचा (गोखल्यांचा) जो वाद सुरू होता त्यांत गोखल्यांच्या बाजूनें एक पत्र प्रसिद्ध केलें म्हणून त्यांच्यावर रुष्ट झालेला, निदान रुसलेला, निदान अनुत्साही तरी खास झालेला. अशा परिस्थितींतहि अण्णांनीं धीर खचूं दिला नाहीं. **'सुधां विना न प्रययुर्विरामं'** या आपल्या आवडत्या वचनाला अनुसरून राष्ट्रीय शिक्षणात्मक सुधेप्रीत्यर्थ अहर्निश अविश्रान्त श्रम चालू ठेवले यांतच त्यांचें 'अण्णात्व' व 'समर्थ' शिष्यत्व आहे !

❧ ❧ ❧

हें वर उल्लेखिलेलें टिळक–गोखले प्रकरण काय होतें व त्यांत विजापूरकरांचा संबंध

कसा आला हें नवीन पिढीला ठाऊक नसेल म्हणून येथें थोडक्यांत देतों. कॉंग्रेसचें धोरण कसें असावें, 'राष्ट्रीय' पक्षाला आंत घ्यावें किंवा नाहीं, घ्यावयाचें असल्यास कोणत्या अटींवर याबद्दल १९१५ सालीं मोठा वाद चालला होता. पुढारी लोकांचा खाजगी पत्रव्यवहार चालला होता व खलबतें होत होतीं. अशा वेळीं मिसेस ॲनी बेझंटबाई मध्यस्थी करण्याचें योजून नामदार गोखले यांच्याशीं विचारविनिमय करण्याकरितां सर्व्हंट्स ऑफ इन्डिया सोसायटी-मध्यें उतरल्या होत्या. गोखले त्या वेळेस अत्यवस्थ आजारी–आसन्नमरणा-वस्थेंतच–होते. टिळक हेहि ॲनी बेझंटबाईंना भेटण्याकरितां म्हणून सर्व्हंट्स ऑफ इंडियामध्यें गेले व तेथें गेल्यावर अत्यवस्थ स्थितींत असलेल्या गोख-ल्यांच्या समाचाराकरितां गेले. तेथें त्यांचें, गोखल्यांचें व ॲनी बेझंट बाईचें केव्हां काय बोलणें झालें हें प्रस्तुत लेखकाला माहीत नाहीं. पण या बोलण्या-चालण्याचे प्रकरणांत व गोखल्यांनीं आपल्या एका पुढारी मित्राला लिहिलेल्या पत्राचे प्रकरणांत एक लहानसा वाद निघून त्या बाबतींत विजापूरकरांनीं सर्व्हंट्स ऑफ् इन्डिआंत त्याच सुमारास आपण होतों व आपली माहिती अशाप्रकारची आहे, अशा प्रकारचें पत्र प्रसिद्ध करून गोखल्यांची बाजू सांवरून धरली होती. टिळकांना हें न खपल्यामुळें त्यांच्या 'केसरीं' त अण्णा विजापूरकरांनीं गोखले व टिळक यांच्या प्रकरणांत '**बीचमें मेरा चांदभाई**' प्रमाणें वागून आप-ल्याला हास्यापद करून घेऊं नये असें सुचविलें होतें. आतां खरोखर पाहिलें असतां गोखले व विजापूरकर यांचा अनेक वर्षांचा स्नेहसंबंध, गोखल्यांच्या सर्व्हंट्स ऑफ् इंडिआमध्यें विजापूरकर त्यावेळीं गेलेले व त्यांना तेथें कांहीं गोष्टी कळलेल्या, गोखले मृत्युशय्येवर पडलेले, अशा स्थितींत गोखल्यांवर एखाद्या गोष्टीबाबत नाहक हल्ला होत आहे असें वाटून त्यांनीं आपल्याला प्रामाणिकपणानें जी गोष्ट खरी माहीत होती ती पत्रद्वारें जगाला कळविली व इहलोक सोडण्याच्या मार्गाला लागलेल्या–"ओंकारेश्वरावर गोंवऱ्या ज्याच्या गेल्या आहेत" अशा–अनेक वर्षांच्या ऋणानुबंध असलेल्या आपल्या मित्राला, जो थोर सत्पुरुष आहे असें त्यांना मनापासून वाटत होतें त्याला, आपल्या परीनें साहाय्य करण्यास ते धांवले तर यांत हास्यास्पद असें काय आहे? यांत चांदभाई बीचमें आला म्हणावें का स्नेह कर्तव्यकर्माला जागला म्हणावें? बरें टिळकांना तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे? लढाईला जो उभा राहिला त्यानें आडवा येईल त्याला कापलेंच

पाहिजे असें त्यांच्या बाजूनें म्हणतां नाहीं का येणार ? या प्रकरणांत दोषांची कमीअधिक वांटणी करण्यांत व्यर्थ वेळ न दवडतां एवढें म्हटलें म्हणजे पुरे आहे कीं राजकारण हें असें धकाधकीचें आहे,–तें असें असावें का नाहीं हा प्रश्न सोडविणें कठीण आहे, निदान तो सध्यांतरी अप्रस्तुत व अनावश्यक आहे.

* * *

इतका वेळ अण्णांचा स्तुतिपाठ आपण गाइला, पण ते म्हणजे अगदीं निर्दोष होते, त्यांच्या हातून कांहीं चुका झाल्या नाहींत, असें समजण्याचें कारण नाहीं. दोष कोणांत नाहींत ? चंद्रावरच नव्हे तर सूर्यावरदेखील डाग आहेत. अण्णांचा दोष म्हणजे गुणातिरेक ! माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं कांहीं गुणांचा अतिरेक झाला म्हणजे ते दोषस्वरूप होऊं लागतात. उदाहरणार्थ, समर्थविद्यालयांत केंस ठेवणें वगैरे सुधारकी प्रकार चालूं न देणें चांगलें असेल व होतां होईतों आपल्या चालीरीतींना धरून शिक्षण द्यावयाचें हा एक हेतु धरून काढलेल्या संस्थेंत अशा प्रकारचें धोरण असलें तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. परंतु एखाद्या केंस ठेवलेल्या मुलाला बळजबरीनें केंस काढावयास लावणें हें कसेंसेंच वाटतें. विदेशी माल तुम्ही घेऊं नका, पण एकाद्या पालकाला आपल्या आजारी मुलाला कॉडलिव्हर ऑईल द्यावेसें वाटलें तर त्याबद्दल विशेष आग्रहाची हरकत घेणें हा तरी दुराग्रहच. आपल्या बंधूंवर प्रेम असणें चांगलें, त्यांच्यावर विशेष विश्वास असणें चांगलें, पण या बंधु–प्रेमांत इतरांनीं भागीदार व्हावें, झालेंच पाहिजे अशा आग्रहपूर्वक इच्छेला ‘ दुराग्रह ’ असें सुटसुटीत नांव दिलें तर काय चूक ? वरील दोष सत्यकथनाच्या दृष्टीनें सांगितले खरे; पण सत्यकथनाची दृष्टीच लेखणीला पुढें जाऊं न देतां लेखकाला सांगते कीं, “ आपल्या प्रामाणिक मतांप्रमाणें वागणें याला दोष म्हणणारे तुम्ही कोण ? ज्यानें त्यानें आपल्या मताप्रमाणें वागावें, आपल्या शक्तीप्रमाणें कार्य करावें, असाच जर धर्माचा सिद्धान्त आहे, तर स्वमतानुसार वागणाऱ्याला व स्वशक्तीची पराकाष्ठा करून ध्येयसिद्ध्यर्थ सोत्साह व साग्रह परिश्रम करणाऱ्याला तुम्ही दोष कां देतां ? ”

अगदीं खरें आहे. अण्णांसारख्यांचे गुण हे कित्येक वेळां दोषस्वरूप होत हें म्हणणें व्यर्थ आहे. जगांत ज्यानें त्यानें आपलें ध्येय निश्चित करून तन्निष्ठ रहावें व यथामति यथाशक्ति तत्सिद्ध्यर्थ कार्य करीत रहावें, हाच धर्मशास्त्राचा अन्तिम सिद्धान्त. अण्णांसारख्यांचें स्मरण आपणांस पुनीत करतें, त्यांचीं चरित्रें

आपणांस " दुःखांना भितां काय ? दुःखें येतील आणि जातील; प्राण देखील जावयाचे आहेत, मग सुखदुःखांचें काय ? जगांत कोठें चिरंतनत्व असेल तर तें सद्‌बुद्धींत व सत्कार्यांत आहे " असें सांगतात व आपलें अंगीकृत कार्य उत्साहानें, नेटानें, चिकाटीनें, संकटांना धैर्यानें तोंड देऊन, नैराश्याला कधीं बळी न पडतां, शांतपणें, धिम्मेपणानें, निरभिमानपूर्वक, चंद्रसूर्यांप्रमाणें " Without haste, without rest " करीत रहावें असें बजावतात, तेव्हां हा उपदेश वंद्य समजून स्वीकृत उचित कार्याला लागावें हें बरें.

# रँग्लर परांजपे  २

*यांच्या एकदोन गुणदोषांची मीमांसा*

महाराष्ट्रांत इंग्रजी शिक्षणाचा फैलाव झाल्यानंतर लोकहितवादी, जोतीबा फुले, भांडारकर, विष्णुशास्त्री पंडित, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, गोपाळराव गोखले, हरिभाऊ आपटे इत्यादिकांनीं महाराष्ट्राच्या बुद्धींत व वृत्तींत बदल घडवून आणला. हे सर्व प्रागतिक व (आकुंचित अर्थानें नव्हे, तर सुधारणा करूं इच्छिणारे या अर्थानें) 'सुधारक' होते. परंतु त्यांपैकीं आगरकरांशिवाय व गोखल्यांशिवाय नवीन विचारात्मक क्रान्ति कोणत्या स्वरूपाची आहे किंवा असावी याविषयीं इतरांना स्पष्ट कल्पना नव्हती. भांडारकरांना सुधारणा पाहिजे होती, 'विवेका' ला (Reason ला) ते मान देत होते, पण विशिष्ट मर्यादेपर्यंतच विवेकवादाला ते जाऊं देत. त्यांना 'पुराणांतील शिमगा' नको होता, पण उपनिषदांतील तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्यांचा 'विवेक' किंचित् अंध होई. टिळक हे हाडानें विवेकवादी (Rationalist) होते, निदान प्रथम प्रथम तरी होते. पण पुढें पुढें (दूरदृष्टीचें धोरण म्हणून म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा) ते सनातनी दृष्टीला व वृत्तीला न दुखवितां जितकी सुधारणा करतां येईल तितकी करावी अशा धोरणाचे बनले व विवेकाला (Reason) त्यांनीं दुय्यम स्थान दिलें. इतरांचें असेंच. सासरीं जाणारी मुलगी माहेर सोडतांना अश्रु ढाळते, तिचें पाऊल उचलत नाहीं, पण हें थोडा कालपर्यंतच. पुढें पुढें ती माहेराला विसरली नसली तरी सासरच्या हितानहिताच्या विचारांत पूर्णपणें निमग्न असते. भांडारकरादि सुधारकांना सनातनी माहेरचा मोह जन्मभर सोडवला नाहीं, विवेक-श्वशुराच्या घरीं राहावयाचें, पण कष्टानें, अगतिक म्हणून; खरा ओढा 'सनातनाकडे.' एक आगरकर मात्र असे होते कीं, त्यांनीं

हा ‘ सनातना ’ चा मोह फारसा बळवत्तर होऊं दिला नाहीं. आपणांला ‘ विवेक ’— गृहांत रहावयाचें आहे, विवेकाशीं आपण स्वयंवर केलें आहे, आपणांस विवेक—सहधर्मधारी व्हावयाचें आहे, विवेकाशीं एकनिष्ठेनें वागावयाचें आहे, ‘ विवेका ’ च्या आड येणाऱ्या गोष्टी पूर्वाश्रमीं कितीहि प्रिय व त्या काळीं कितीहि योग्य असल्या तरी आतां बाजूला सारण्यास पाहिजेत, अशा प्रकारची त्यांची निःसंदेह वृत्ति होती. आगरकरांच्या मागून अशी निःसंदेह वृत्ति कोणाची असेल तर ती रँग्लर परांजपे यांची आणि याच दृष्टीनें त्यांचें मी महाराष्ट्राच्या विचारेतिहासांत फार महत्त्व समजतों.

‘ इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार ’ हें ब्रीदवाक्य दणदणीत आवाजांत आगरकरांनींच सांगितलें आणि त्यांनीं त्याप्रमाणें आचरणहि केलें. रँग्लर परांजपे यांनींहि तेंच केलें. आणि यांतच त्यांच्या यशस्वितेचें आणि अयशस्वितेचेंहि बीज आहे. ‘ विवेका ’चें साम्राज्य जगांत पसरावें असें ज्यांना वाटतें त्यांच्या व्यापक व दूरदृष्टीनें पाहतां रँग्लर परांजपे यांनीं हें साम्राज्य येण्याचा काळ कांहीं अंशांनीं तरी जवळ आणला यांत शंका नाहीं. पण लौकिक, तात्कालिक व आकुंचित दृष्टीनें पाहतां त्यांना महाराष्ट्रांत ज्या मानानें पुढारीपण मिळावयास पाहिजे होतें तें मिळालें नाहीं आणि ‘ लोकमान्य ’ होऊन जें लोकहित करतां येतें तें करतां आलें नाहीं हेंहि खरें आहे.

परांजपे यांनीं चुका केल्या नसत्या तर त्यांना सध्यां मिळालें आहे त्यापेक्षां अधिक यश मिळालें असतें हेंहि मान्य केलें पाहिजे. विवेकवादी ( Rationalist ) मनुष्यानें भावनांचें महत्त्व ओळखूं नये असें नाहीं. भौतिक सृष्टीवर मार्ग आक्रमण करतांना समुद्र, नद्या, ओढे वगैरेंचें अस्तित्व विसरून चालत नाहीं, त्याप्रमाणेंच समाजांत मार्गक्रमण करीत असतां भावनासमुद्राचें व पूर्वग्रहप्रवाहांचें अस्तित्व विसरून चालावयाचें नाहीं. Mr. God म्हणून देवाचा उल्लेख परांजपे यांनीं केला अशी जी दंतकथा आहे ती जर खरी असेल तर या दृष्टीनें पाहतां परांजपे यांनीं लोकांच्या भावना दुखविल्या हा दोष समजला पाहिजे. ( परंतु विचाराच्या दृष्टीनें निद्रिस्त झालेल्या लोकांना धक्का देऊन जागें करण्याचें काम कोणीं तरी केलेंच पाहिजे आणि हें काम करणाराकडे वाईटपणा आला तरी दूरदृष्टीनें पाहतां त्यानें समाजहित साधलेलें असतें हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे. ) परांजपे धुळें येथें (किंवा तिकडच्या अशाच एका गांवीं) मतें मिळविण्याकरितां गेले असतां प्राथमिक

शिक्षकांना कमी पगार देण्यांत येतो या प्रश्नाबाबत त्यांनीं मंडईतील हमालांचा दाखला देऊन मनुष्याचें वेतन हें मागणी व पुरवठा या न्यायानें ठरत असतें हा अर्थशास्त्रांतला सिद्धान्त सांगितला. हा सिद्धान्त मर्यादित क्षेत्रांत खरा आहे; शैक्षणिक क्षेत्रांतहि तो लागू पडतो ( लागू पडावा किंवा नाहीं ही गोष्ट वेगळी ). पण या सिद्धान्ताचें विवरण करतांना शिक्षकांना हमालांच्या पंक्तीला बसविण्याचा आभास परांजप्यांच्या दाखल्यानें उत्पन्न केला. तेव्हां हा दाखला सदोष होता यांत शंकाच नाहीं. परांजपे यांना आपला भावार्थ दुसरे दाखले देऊन सांगतां आला असता आणि त्यांवर उत्तर देणें कोणालाहि कठिण पडलें असतें. कारण आपले विचार कितीहि उच्च असले आणि शिक्षणाबद्दल व शिक्षकांबद्दल आपणाला कितीहि आस्था असली तरी आपल्या जवळचा पैसा आणि शिक्षकांचा पुरवठा, यांवरच त्यांचा पगार अवलंबून राहतो व राहणार. ( समाजाची रचना व घटना अजिबात बदलली तर गोष्ट निराळी. पण तोंपर्यंत वरील विधान खरें आहे. ) सामान्य लोकांना दाखल्याकडे दाखला या दृष्टीनें पहावयाचें असतें हें समजत असलें तरी शिक्षकाबद्दल बोलतांना हमालांचा दाखला देणें त्यांना प्रशस्त वाटत नाहीं आणि त्यांतले लुच्चे लोक या लहानशा चुकीचा फायदा घेऊन भलताच बोभाट आणि कांगावा करतात आणि स्वतःचा डाव साधतात. अशा लुच्चा लोकांना गैरसावधपणें संधि देण्यांत परांजपे यांची चूक झाली हें कबूल केलें पाहिजे.

परांजपे यांनीं १५–१६ वर्षांपूर्वी सोलापूरच्या राजकीय परिषदेमध्यें प्रागतिकांना कॉंग्रेसचे जनक म्हटलें होतें आणि प्रागतिक हे खऱ्या अर्थानें कॉंग्रेसमेन आहेत असें प्रतिपादिलें होतें. त्या वेळेसहि त्यांनीं धार्मिक संदर्भ आणून पित्याचा जो दाखला दिला त्याचा सुप्रसिद्ध वक्ते डॉ. सावरकर यांनीं फायदा घेऊन व ‘ बापास बाप न म्हणे ’ इत्यादि मोरोपंतांची आर्या म्हणून परांजपे यांना हास्यास्पद केलें आणि क्षणभर कां होईना, भाषणानें सभा जिंकली. या गोष्टीची येथें आठवण होते. वास्तविक परांजप्यांचा युक्तिवाद बरोबर होता. परंतु त्यांच्यासारख्या विवेकवादी गृहस्थानें धार्मिक क्षेत्रांतला दाखला द्यावयाचा नाहीं तो दिला. त्याबरोबर डॉ. सावरकरांसारख्या वक्त्याचें चांगलेंच फावलें. हे लोक युक्तिवादांतील न्याय–अन्याय पाहत नाहींत, तर लोकांच्या भावना आपणांला कशा अनुकूल करून घेतां येतील हें पाहतात, आणि ते तात्कालिक तरी जय मिळवितात. परांजप्यांसारख्यांनीं लोकांच्या भावनांचा असा फायदा घेऊं नये, पण जरूर नसतां त्यांच्या भावना आपल्या

दाखल्यांनीं दुखविल्या जातील किंवा काय, आपण दिलेले दाखले आपल्या बाण्याला व वृत्तीला न शोभण्यासारखे असल्यामुळें त्याचा आपले प्रतिपक्षी फायदा घेतील किंवा काय, याचा जेवढा विचार करावयास पाहिजे होता तेवढा विचार न झाल्यामुळें परांजप्यांना तात्कालिक दृष्टीनें तरी अपयश आलें यांत शंका नाहीं.

भावना व विवेक यांचा विचार करतां मला एक मौजेची गोष्ट लक्षांत येते, ही कीं टिळक हे प्रकृतीनें, स्वभावानें शान्त व भावनांना वश न होणारे होते, पण ते भावनांचें महत्त्व ओळखीत होते ! गोखले हे जात्या भावनावश, पण राजकारणांत व समाजकारणांत ते विवेकाला प्राधान्य देत ! परांजपे हे प्रकृतिधर्मानें कसे आहेत हें मला निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण ते धोरणांत तसेच स्वभावांतहि विवेकप्रधान असावेसें वाटतें.

विवेकप्रधान असोत किंवा नसोत, त्यांच्या लिखाणांत विनोद-बुद्धि पुष्कळ वेळां प्रकट होते हें सांगण्यासारखें आहे. बुवाबाजीवरचा त्यांचा लेख, तसेंच जातवार नोकऱ्या देण्याबद्दलच्या घातुक धोरणाबद्दलचा त्यांचा लेख, हे याक्षणीं माझ्या मनश्चक्षूंसमोर येत आहेत. ( हे लेख प्रस्तुत पुस्तकांत छापावेत अशी माझी सूचना आहे. ) या लेखांतील भाषा, वातावरण, विनोद, विचारांतील निर्भीडपणा इत्यादि गुणांमुळें ते वाङ्मयदृष्ट्याहि संग्रहणीय कलाकृती आहेत असें वाटतें.

त्यांचा विवेक नेहमीं जागृत असतो आणि हास्यास्पद गोष्टींतील हास्यास्पदता विसरून जाण्याची कला त्यांच्यामध्यें नाहीं. म्हणून हास्यास्पद व मूर्खपणाच्या कल्पनांना, विचारांना व आचारांना कवटाळून राहणाऱ्या सामान्य लोकांशीं ते विशेष समरस होऊं शकत नाहींत, आणि म्हणून अर्थात् ते त्यांचे पुढारीहि होऊं शकत नाहींत. समाजांतील पुढाऱ्यानें जगांतील मूर्खपणा ओळखावा, पण कित्येक वेळां तिकडे त्यानें दुर्लक्ष करावें; योग्य वाटेल तें करावें व करण्यास लावावें, पण आपण काय व कां करतों हें लोकांच्या ध्यानांत येऊं नये, इतकेंच नव्हे तर हा पुढारी आमचेच विचार बोलून दाखवीत आहे असा त्यांच्यामध्यें आभास उत्पन्न करावा; लोकांच्या सद्भावनांचा परिपोष करावा व त्या भावनांच्याद्वारें होण्यासारखीं चांगलीं कामें करून घ्यावींत, पण लोकांच्या मूर्खपणाच्या व घातुक भावनांना सहसा धक्का लागेल असें करूं नये. तरच त्याचें पुढारीपण टिकतें आणि लोकांच्या साहाय्यानें मोठीं कामें करवून घेतां येतात. पण कांहीं

मोठ्या लोकांच्या प्रकृतीला असलें पुढारीपण जमत नाहीं. त्यांच्या हातूनहि मोठीं कामें होतात, कारण ते एकाण्डे वीर असले व राहिले तरी एकेकट्याचें वीर्य हजारों बाजारबुणग्यांच्यापेक्षां अधिक असतें. सूर्याला अनुयायी नसले तरी त्याच्या हातून कार्य होत नाहीं असें थोडेंच आहे?

# प्रो. कर्वे ३

*यांच्या स्वभावांतील कांहीं विरोधाभास*

गुरुवर्य प्रो. कर्वे यांना ' कर्मवीर ' अशी पदवी लोकांच्या दरबारांत मिळाली आहे, व त्यांनीं स्थापिलेल्या संस्थांकडे पाहिलें असतां ही पदवी योग्य आहे हें कोणीहि कबूल करील. पण जितके ते कर्मवीर आहेत तितकेच ते कल्पना-सृष्टींतहि विहार करणारे आहेत हें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. स्त्रियांची युनिव्हर्सिटी हिंगण्याच्या संस्थांतून निघावी याबद्दल त्यांना १९१६ च्या आधीं-पासून स्वप्नें पडत होतीं हें त्यांच्या आत्मवृत्तावरून कळून येण्यासारखें आहे. या पुस्तकाच्या पान ४४२ मध्यें ते कबूल करतात कीं हिंगणें हें " सरस्वती देवीचें क्रीडास्थान बनलेलें मूर्तसृष्टींत नाहीं तर नाहीं, पण कल्पनासृष्टींत तरी पाहून आनंद-सागरांत पोहत रहावें अशी वेडी इच्छा क्षणभर मनावर आपलें साम्राज्य चालविते", हिंगणें येथील तीन संस्थांच्या " त्रिवेणीसंगमाच्या तीर्थाचें माहात्म्य वाढो व त्यांत मज्जन करून हजारों भरतकन्या स्वतःच्या व मातृभूमीच्या उद्धाराला साहाय्यभूत होवोत " ( आत्मवृत्त, २ री आवृत्ति, पान ४०९ ) अशी इच्छा त्यांच्या मनांत वारंवार उत्पन्न होते. अशा प्रकारच्या ' अव्यावहारिक ' इच्छा मनांत बाळगणारे गृहस्थ ' कर्मवीर ' कसे होऊं शकतात हा एक मानसशास्त्रदृष्ट्या मनोरंजक प्रश्न आहे.

आकाशांत मधून मधून उड्डाण करून घरट्यांत परत येणाऱ्या व राहणाऱ्या गरुड पक्ष्याप्रमाणें मधून मधून ध्येयात्मक रम्य स्वप्नसृष्टींत कल्पनेच्या साहाय्यानें उड्डाण करून लगेच त्रिगुणात्मक लौकिक सृष्टींत येऊन तेथील व्यवहार करणें अशक्य नाहीं असें कांहीं लोक उत्तर देतील. ध्येयवादित्व जरी माणसांत असलें तरी तें मर्यादित ठेविलें असतां व्यवहाराच्या फारसें आड येत नाहीं असा या उत्तराचा आशय आहे. पण माझें असें म्हणणें आहे कीं, ध्येयवादित्वाचें समर्थन इतकें भीतभीत करण्याचें

कारण नाहीं. कारण खरी गोष्ट अशी आहे कीं, लौकिकव्यवहारांत रममाण होण्याची व तो उत्साहानें आणि निपुणतेनें करण्याची पात्रता ध्येयवादित्वामुळें येते. ‘ व्यवहार, व्यवहार ’ म्हणून जो म्हणतात तो तरी केव्हां यशस्वी किंवा सुखदायक होतो, तर जेव्हां मनुष्य कांहीं तरी उच्च कल्पनारम्य यशाच्या पाठीमागें लागलेला असतो व हें यश प्राप्त करून घेण्याच्या कामीं ‘ जें आहे ’ त्याचाच केवळ विचार न करतां ‘ जें शक्य आहे ’ किंवा ‘ जें असावें ’ याचाहि विचार करतो तेव्हां ! ‘ आहे ’ त्याच्यांतच सुख मानूं पाहणाऱ्यांचा आशाभंग ठरलेला, असा जगाचा उलटा न्याय आहे. ‘ असें असें असावें ’ असें म्हणून कल्पनासृष्टींत रमणारा मनुष्य सत्यसृष्टींत अनेक वेळां ठेंचाळेल किंवा पडेल. पण अशा ठेंचा खाण्यानेंच मनुष्य शहाणा होऊं शकतो व चढतांना पडणारे लोकच पुढें घोड्यावर स्वार होऊन कित्येक वेळां मोठमोठे पराक्रम करूं शकतात.

ध्येयनिष्ठेचा आधार नसलेली वरवरची ‘ व्यवहारज्ञता ’ अल्पमूल्य आहे, स्वस्त आहे, अल्पकाल टिकणारी व अल्पबळ आहे. “ आकाशांत उड्डाण करूं नका. जमिनीवर उभे रहा ” असा पोक्त उपदेश करणाऱ्यांना पुष्कळ वेळां जमिनीवर बसावें लागतें किंवा लोळावें लागतें, कारण त्यांच्या कमरेंतच जोर नसतो. संकटांची सावली पडल्याबरोबरच त्यांची छाती धडधड करूं लागते व दुःखाची झळ आल्याबरोबर ते जमिनीवर गडबडा लोळूं लागतात. केवळ आहे त्या जगाचाच नव्हे तर शक्य जगाचा, ध्येयसृष्टीचा, परलोकचा, परमार्थाचा विचार करणारे व त्याचा नाद लागलेले लोक पुष्कळ वेळां पडतात, घसरतात ही गोष्ट खरी आहे. पण हीहि गोष्ट खरी आहे कीं, लौकिकव्यवहारांत रममाण होण्याची व ते उत्साहानें आणि निपुणतेनें करण्याची पात्रता ध्येयवादित्वामुळें येते. लौकिकव्यवहाराला स्थिरता यावी, त्यामध्यें कांहीं सुसंगत धोरण असावें, तो करतांना बाहूंना स्फुरण यावें, कमरेंत जोर यावा, मन प्रसन्न असावें, अशी जर अपेक्षा असेल तर माणसांमध्यें कांहीं ना कांहीं तरी ध्येयवादित्व पाहिजे. केवळ जमिनीकडे पाहणाऱ्यांना फार वेळ चालवणार नाहीं. केवळ लौकिक सुखाची अपेक्षा करणाऱ्यांच्या नशिबीं दुःख लिहिलेलें आहे. केवळ लौकिक गोष्टींचा लौकिक दृष्ट्या विचार करणाऱ्यांना व्यवहारांत उच्चतम व शुद्धतम आनंद नाहींच मिळणार, पण साधा लौकिक आनंदहि मिळणें कठीण पडेल. बारीकसारीक लौकिक गोष्टींमध्यें काव्यासारखें रम्यत्व उत्पन्न व्हावें असें केव्हां शक्य होईल तर जेव्हां लौकिकाहून उच्चतर अशा गोष्टींविषयीं आस्था असेल तेव्हां.

प्रो. कर्वे हे पै-पैशाच्या हिशेबाबद्दल इतकी आस्था दाखवितात याचें कारण त्यांच्यामध्यें पैशाबद्दल मुळींच आस्था नाहीं, असें विरोधाभासात्मक उत्तर दिलें तर तें चुकीचें होणार नाहीं. कारण त्यांच्या ध्येयवादित्वामुळेंच आपली संस्था हिशेबाच्या बाबतींत चोख असावी, आपल्यामध्यें द्रव्याभावामुळें उत्पन्न झालेल्या उणीवा असल्या तर त्या असणारच, पण हिशेब चांगले न ठेविल्यामुळें उत्पन्न होणारे दोष पदरीं येऊं देऊं नये, या बाबतींत आपण अत्यंत चोख असलें पाहिजे, असें त्यांना वाटतें. हरतऱ्हेच्या बारीकसारीक गोष्टींमध्यें इतकें त्यांचें लक्ष कसें याचें पुष्कळ लोकांना आश्चर्य वाटतें. पण संस्थेबद्दल अलौकिक प्रेम असल्यामुळें लौकिक दृष्टीच्या लोकांना बारीकसारीक गोष्टींबद्दल जी आस्था असणें शक्यच नाहीं ती त्यांना संस्थेबद्दलच्या बारीकसारीक गोष्टींबद्दल वाटते. इतिहासाचा कोणी संशोधक अभ्यास करणार नाहीं इतका संस्थेच्या हिशेबाचा अभ्यास करतांना मीं त्यांना पाहिलें आहे. आई आपल्या मुलीसंबंधानें, किंवा प्रेमळ पति आपल्या नववधूसंबंधानें, लहान-सहान गोष्टींबद्दल अगत्य दाखविणार नाहीं इतकें अगत्य त्यांना संस्थेबद्दलच्या अत्यंत लहानसहान गोष्टींबद्दल वाटतें. आणि याचें कारण ते व्यावहारिक आहेत, हें नव्हे तर ते व्यावहारिक नाहींत, म्हणजे व्यवहाराच्या पलीकडे कांहींतरी आहे असें मानणारे आहेत, हें आहे. केवळ व्यावहारिकांना संसारांत जें रम्यत्व वाटणें शक्य नाहीं तें अव्यावहारिकांना वाटतें. केवळ व्यावहारिकांची मनाची बैठक बाह्यतः स्थिर दिसते, पण वास्तविक ती अस्थिर असते. मनःस्थैर्य येण्यास ध्येयनिष्ठेशिवाय मार्ग नाहीं. मनोधैर्यहि ध्येयनिष्ठेशिवाय येणें शक्य नाहीं. सॉक्रेटीस, ल्यूथर, टिळक वगैरेंचें मनोधैर्य, त्यांना व्यवहाराच्या पलीकडे कांहीं दिसत होतें व तें व्यवहाराहून उच्चतर व पूज्यतर वाटत होतें या गोष्टीवरच आधारलेलें आहे. प्रो. कर्वे यांचीहि गोष्ट अशीच आहे. मी जात्या भित्रा आहें असें ते आत्मवृत्तांत सांगतात. पण त्यांच्याइतकें मनोधैर्य दाखविणारे फार थोडे. हें मनोधैर्य येण्याचें कारण ध्येयनिष्ठा. आपल्या अव्यावहारिकपणाचीं पुष्कळ उदाहरणें त्यांनीं आत्मवृत्तांत दिलीं आहेत पण तीं खाजगी किरकोळ बाबींसंबंधीं. संस्थेच्या बाबतींत त्यांनीं फार व्यावहारिक शहाणपणा दाखविला आहे, व दाखवीत आहेत. म्हणून तर त्यांना ‘ कर्मवीर ’ ही पदवी लोकांकडून मिळाली. आणि मौज ही आहे कीं, व्यवहाराच्या पलीकडे ते पाहूं शकतात, ‘ व्यवहार ’ हाच त्यांचा देव नाहीं,

म्हणूनच ते इतके व्यवहारज्ञ आहेत. केवळ व्यवहारज्ञांना जें व्यवहारदृष्ट्या अशक्य वाटत होतें तें शक्यकोटींत आणून दाखविण्याचें सामर्थ्य त्यांच्या 'अव्यावहारिकपणां' तच कसें आहे हें आतां स्पष्ट झालें असेल अशी समजूत आहे, म्हणून अधिक विस्तार करीत नाहीं.

प्रो. कर्वे हे निराशावादी आहेत का आशावादी आहेत, कोमल आहेत का कठोर आहेत, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें याच धोरणानें देतां येतील. म्हणजे ते दोन्हीहि आहेत, इतकेंच नव्हे तर ते निराशावादी आहेत **म्हणून** आशावादी आहेत, कोमल आहेत **म्हणून** कठोर आहेत, इ. इ. मेणाहून मऊ असून किंबहुना मऊ असल्यामुळें, वज्राहून कठीण कसें होतां येतें हें तुकारामादि सज्जनांच्या चरित्रावरून समजतें. प्रो. कर्वे यांच्याहि चरित्रावरून विरोधी भासणाऱ्या गुणांचें वास्तव्य एकत्र कसें असूं शकतें, किंबहुना एकमेकांवर ते कसे अवलंबून असतात, याचें आतांपर्यंत थोडेंसें दिग्दर्शन केलें, तें कांहीं वाचकांना सूचक वाटल्यास लेखाचें सार्थक होईल.

# विवाहित स्त्रियांचीं कांहीं कर्तव्यें ४

विवाहित स्त्रियांचीं कर्तव्यें आणि त्यांच्या जबाबदाऱ्या यांविषयीं मला आज चार शब्द सांगण्याविषयीं विनंति करण्यांत आली आहे; पण पहिल्या प्रथम मला हें सांगावेंसें वाटतें कीं, मला 'कर्तव्य' 'जबाबदाऱ्या' 'हक्क' वगैरे शब्द आवडत नाहींत. हे शब्द भाषेच्या कोशांतून नष्ट होतील त्यावेळेसच समाज खरोखर सुसंस्कृत झाला असें मानणारा मी आहें.

### बायकोनें नवऱ्याशीं कसें वागावें ?

विवाहित स्त्रियांनीं काय, किंवा दुसऱ्या कोणी काय ज्या चांगल्या गोष्टी करावयाच्या असतात त्या आनंदानें, हौशीनें, आवड म्हणून कराव्यात. 'हक्क,' 'कर्तव्य,' 'जबाबदारी' म्हणून करूं नयेत. नवऱ्यावर प्रेम करायचं तें काय 'हक्क' म्हणून, 'कर्तव्य' म्हणून, 'जबाबदारी' म्हणून ? अर्थात् नाहीं. प्रेम असतं म्हणून पत्नी प्रेम करते, त्याच्यांत तिला आनंद असतो. नवऱ्याला सुखी करण्यांत तिलाहि सुख होतं, नवऱ्याचं हित तेंच तिचं हित असतं, सासू-सासरे, दीर-जावा वगैरेंच्या बाबतींतहि अशीच मनोवृत्ति असणं हें पूर्णतेस गेलेल्या सुसंस्कृत समाजांतच शक्य आहे. पण आदर्श वर्तनपद्धति ही आहे, हें मला सांगायचं आहे.

आणि नवऱ्याचंच सुख किंवा हित पाह्यचं अशी आकुंचित दृष्टि ठेवली तरीदेखील विवाहित स्त्रियांनीं पतीच्या घरांतील मंडळींशीं वागतांना आपल्या 'हक्का'ची आणि सुखाची कल्पना मनांत फारशी येऊं देऊं नये. आपल्या आई-बापांचं आणि आपल्या बायकोचं पटत नाहीं किंवा आपल्या भावांचं आणि आपल्या बायकोचं पटत नाहीं हें पाहून कोणत्या पुरुषाला आनंद होईल ? कोणाला मनाची स्वस्थता लाभेल ? आई आणि बायको किंवा बहीण-भावंडें आणि बायको यांमध्यें

तेढ उत्पन्न झाली म्हणजे पुरुष किती पेंचांत सांपडतात, त्यांच्या मनाला किती वेदना होतात, कोणत्याहि सुखांत सुख कसं वाटेनासं होतं, याचा विचार नववधूंनीं केला तर पतीचं सुख पाहणं या आकुंचित दृष्टीनेंहि त्या सासू-सासऱ्यांशीं आणि जावा-नणंदांशीं सलोख्यानें वागण्याचा प्रयत्न करतील असं मला वाटतं. आजकाल एकत्रित कुटुंबपद्धति जात चाललीच आहे. वर्षांतून कांहीं दिवस एकत्र रहाण्याचा प्रसंग येतो. पण तेवढ्या अल्प अवधींत देखील कित्येक वेळां नववधूंच्या आणि प्रौढ वधूंच्याहि वर्तनामुळें वर दिलेले पेंचप्रसंग घरांत उत्पन्न होतात आणि घराचें वातावरण बिघडून जातें. घरांतील माणसांच्या मनांत परस्परांविषयीं तेढ किंवा अढी असली तर गृहसौख्य कोणालाहि लाभत नाहीं. विवाहित स्त्रियांनीं अगदीं आकुंचित स्वार्थबुद्धीनें जरी पाहिलं तरी देखील त्यांनीं घरांतल्या माणसांत तेढ किंवा अढी उत्पन्न होईल असं वागूं नये, असं मी म्हणेन. नवरा आणि बायको हीं बाहेरगांवीं जाऊन राजाराणीप्रमाणें अगदीं स्वतंत्रपणें राहूं लागलीं तरी त्या स्वतंत्रपणांत देखील सासू-सासऱ्यांशीं किंवा दीरानणंदांशीं आलेला बेबनाव मनाला सुख लागूं देणार नाहीं. तो मनाला जाचतच रहाणार. नवराबायकोनीं सिनेमा पहाण्यांत वगैरे चैनीनें दिवस घालविण्याचें मनांत आणलें तरीदेखील घरांतल्या नातलगांशीं झालेला बेबनाव त्यांच्या मनाला स्वस्थता लाभूं देणार नाहीं. नवऱ्याच्या मनाला तर बरें वाटणारच नाहीं. आईशीं किंवा भावाबहिणीशीं दूरभाव आल्यावरहि खरें सुखसमाधान नवऱ्याला लाभेल अशी कल्पना करून घेणारी बायको मूर्खच म्हटली पाहिजे. आपल्या नवऱ्याला अशा पेंचांत घालण्यांत किंवा दुःखांत लोटण्यांत काय अर्थ आहे? त्यानें बाहेरून कितीहि आनंदी वृत्ति ठेवली, किंवा खाणेंपिणें, सिनेमा पाहणें, वगैरेमध्यें पत्नीसमवेत मौजेंत वेळ घालविण्याचा प्रयत्न केला तरी त्याला खरें मनःस्वास्थ्य लाभणें अशक्य आहे. नवऱ्याच्या मनःस्वास्थ्याकरितां तरी पत्नीनें त्याच्यावर असे प्रसंग आणूं नयेत, असें मला सांगावंसं वाटतं. सुशिक्षित स्त्रिया अशिक्षित स्त्रियांपेक्षां या बाबतींत सामान्यतः अधिक समंजसपणें वागतात हें मी आनंदानें कबूल करतों. पण सुशिक्षित स्त्रियांपैकीं कांहींना हा उपदेश करणें आवश्यक आहे असं वाटल्यावरून हें सांगत आहें.

नवरे पशू आहेत?

उच्चतम विचारसरणी किंवा भूमिका न स्वीकारतां नववधूंच्या अगदीं आकुंचित स्वार्थाच्या आणि सुखाच्या दृष्टीनेंच त्यांना दुसरी एक गोष्ट सांगावीशी वाटते.

इंग्रजी भाषेंतल्या एका विनोदी नियतकालिकांत एका आजोबानें एका नववधूला आशीर्वाद देतांना उपदेश केला कीं, ‘ Feed the brute. ’ नवरा हा पशू आहे; त्याला खायला प्यायला चांगलं घाल. हा आजोबांचा उपदेश दिसण्यांत अगदीं खालच्या भूमिकेवरचा वाटेल, पण त्यांत पुष्कळ अर्थ आहे. सुशिक्षित नव-तरुणांना त्यांतील मर्म कळावयाचें नाहीं. पण आजोबांचा हा उपदेश अनुभवाव आधारलेला आहे हें त्यांनीं ध्यानांत धरावें. नवरे पशू नाहींत हें खरें. त्यांना ध्येयें असतात, त्यांना उच्च प्रेम समजतें, त्यांच्यामध्यें सात्त्विक वृत्ति असते, बायका सैंपाकिणी अशी त्यांची वृत्ति मुळींच नसते हें सगळें खरें; पण हीहि गोष्ट खरी, कीं खायला प्यायला चांगलं मिळालं नाहीं, घरांत अस्वच्छता असली, घरीं आल्यावर शारीरिक अस्वाथ्य उत्पन्न होईल अशी परिस्थिति असली, तर सात्विक वृत्तीचे आणि थोर मनाचे पुरुषहि उगीचच्या उगीच कित्येक वेळां चिडखोरपणा करतात आणि स्वतः संयमन करून त्यांनीं चिडखोरपणा बाहेर दाखविला नाहीं तरी, किंबहुना मनांतील अस्वस्थता दाबावी लागल्यामुळेंच त्यांच्या बोलण्याचालण्यांतला मोकळेपणा कमी होतो आणि त्यांतलें घरगुती काव्य कमी होऊं लागतें, घरांतल्या घरांत संकोच आणि एकप्रकारचा दूरपणा उत्पन्न होतो आणि त्याचा शेवट कित्येक वेळां घोर प्रकारांत होतो. पतिराजांना खूष ठेवण्याची ही गोष्ट क्षुल्लक वाटेल, पण ती तशी नाहीं हें अनुभव सांगतो. या क्षुल्लक भासणाऱ्या गोष्टीकडे कांहीं नववधूंचें दुर्लक्ष होतें असें दिसून येतें म्हणून हें सांगण्याची पाळी आमच्या-सारख्यावर येते.

विवाहित स्त्रियांचीं कर्तव्यें ?

आतां जरा उच्च भूमिकेवरून विवाहित स्त्रियांच्या सामाजिक कार्याविषयींचीं माझीं मतें सांगतों. अगदीं खरं बोलायचं म्हणजे विवाहित स्त्रियांनीं आधीं घर आणि मग समाज ही वृत्ति सामान्यतः स्वीकारावी, असं माझं मत आहे. पण आर्थिक परिस्थिति अनुकूल असली, आणि पतीची अनुकूलता असली तर स्त्रियांनीं सामाजिक कार्यें करण्यास हरकत नाहीं. पतीची अनुकूलता असली, तर ही अट मात्र पुन्हा उच्चारून तिला महत्त्व द्यावेंसें वाटतें. पति प्रतिकूल असला तर सामाजिक कार्याच्या फंदांत सामान्यतः विवाहित स्त्रियांनीं पडूं नये असं मी म्हणेन. कारण कांहीं जरी म्हटलं तरी पतिप्रेमाशिवाय आणि गृहसौख्याशिवाय विवाहित स्त्रियांचें जीवन सामान्यतः रसशून्य होतें यांत मला तरी शंका नाहीं. पतीच्या

इच्छेविरुद्ध सामाजिक कार्यें करूं पाहणाऱ्या एका सुशिक्षित स्त्रीचें जीवन कसें शोकांतक झालें हें नागपूरच्या माडखोलकरांनीं ' भंगलेलें देऊळ ' या सुंदर कादंबरींत दाखविलें आहे तें वाचण्यासारखें आहे.

सुशिक्षित स्त्रियांनीं सार्वजनिक कार्य करूं नये असं मला म्हणायचं नाहीं. विलायतेंतील मिस्टर आणि मिसेस वेब यांच्यासारख्यांचं जीवन ज्यांना माहीत आहे तो असें कसें म्हणेल ? ज्यांना आर्थिक अनुकूलता असेल आणि घरचा विरोध नसेल त्यांनीं अवश्य सार्वजनिक कार्यें केलीं पाहिजेत. स्त्रीशिक्षणाचें कार्य आतांपर्यंत बरेंचसें पुरुषांनीं केलें आहे तें आपल्या अंगावर घेण्यास सुशिक्षित स्त्रियांनीं आतां पुढें आलें पाहिजे. पतित किंवा गुन्हेगार स्त्रियांचा उद्धार करूं पाहणाऱ्या संस्थांत किंवा मजूर स्त्रियांची स्थिति सुधारूं पाहणाऱ्या संस्थांत स्त्रियांनीं आतां पुढाकार घेऊन कामें केलीं पाहिजेत. स्त्रियांनीं जर हीं कामें आपल्या अंगावर घेतलीं तर त्या संस्थांवर लोकांचा अधिक विश्वास बसेल आणि त्या संस्थांच्या हातून अधिक भरीव कामगिरी होऊं शकेल, याबद्दल कुणीहि वाद करूं शकणार नाहीं. पण असल्या कामांची आवड असणाऱ्या आणि त्याकरितां झीज सोसणाऱ्या स्त्रियांची संख्या अजून अल्प आहे. कदाचित् पतिराज त्यांना परवानगी देत नसतील, कदाचित् आर्थिक परिस्थिति अनुकूल नसेल, पण अशी स्थिति आहे खरी आणि ती सुधारणें जरूर आहे, यांत शंका नाहीं. कायद्याच्या दृष्टीनें स्त्रियांची स्थिति सुधारण्याची चळवळहि सुशिक्षित स्त्रियांनीं जोरानें चालविली पाहिजे आणि कांहीं स्त्रिया ती जोरानें चालवीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

### स्त्रियाच खऱ्या पुरोगामी ?

अशा प्रकारच्या सामाजिक कार्यापेक्षां दुसऱ्या प्रकारचें एक सामाजिक कार्य आहे, तें अधिक महत्त्वाचें आहे आणि तें सर्व सुशिक्षित स्त्रियांना, श्रीमंतांना आणि गरिबांनाहि साधण्यासारखं आहे. तें करण्याकरितां घराबाहेर जायला नको, पतिराजांच्या परवानगीची वाट पाह्यला नको. तें म्हणजे उत्तम नवी पिढी निर्माण करणें. मुलें निरोगी, सुदृढ, सात्त्विक वृत्तीचीं, सद्‌गुणांचीं चाहतीं, धाडसी, पराक्रमी झालीं पाहिजेत. त्यांच्यामध्यें धमक उत्पन्न झाली पाहिजे. देश म्हणून कांहीं पदार्थ आहे, याची त्यांना जाणीव उत्पन्न झाली पाहिजे. ' देश ' असा शब्द मीं वापरला खरा, पण ' देशाभिमानाला ' मी अलीकडे फारसें महत्त्व देत नाहीं. किंबहुना क्षुद्र देशाभिमानामुळें मनुष्यसमाजाची हानि होत चालली आहे, असें माझें मत होत

चाललें आहे. देशादेशांतील संशयी वृत्तीमुळें, भांडणांमुळें, आणि चढाओढींमुळें मनुष्यजातीची हानि झाली आहे ती आतां पुरे झाली. आतां नवीन पिढी जी उत्पन्न व्हायची तिच्यामध्यें क्षुद्र जात्यभिमान, धर्माभिमान किंवा देशाभिमानहि नको आहे. मनुष्य परक्या जातींतला, धर्मांतला किंवा देशांतला म्हणून तो परका ही वृत्ति नष्ट होऊन जो नीतिदृष्टया वाईट तो परका आणि जो नीतिदृष्टया चांगला तो आपला, अशी वृत्ति बळावत चालली पाहिजे. अशा प्रकारची वृत्ति लहानपणापासून शिक्षण दिल्यानेंच उत्पन्न होऊं शकेल. आणि हें कार्य विवाहित स्त्रियांना जसें साधेल तसें इतरांना साधणार नाहीं. स्त्रीजातींतील वैमनस्यें, धर्माधर्मांतील मारामाऱ्या, देशदेशांमधील युद्धें–महायुद्धें, यामुळें बायकांचें आणि मुलांचेंच विशेष नुकसान होतें. आणि हें नुकसान आतां यापुढें कमी कमी होत जाईल अशा प्रकारचें शिक्षण सुशिक्षित स्त्रियांनीं आपल्या मुलांना दिलें पाहिजे. कोणाला खरें वाटणार नाहीं पण माझा अनुभव असा आहे कीं, स्त्रियांमध्यें क्षुद्र धर्माभिमान, देशाभिमान नसतो. प्रेम जमलें म्हणजे स्त्री, देश, धर्म वगैरे कांहीं पहात नाहीं, एवढ्यावरूनच मी हें म्हणतों, असें नाहीं. पुरुषांच्या विकृत पुस्तकी शिक्षणामुळें, आणि त्यांना जात्यभिमानामुळें वगैरे महत्त्व मिळविण्याची अधिक संधि आल्यामुळें त्यांच्यामध्यें धर्माभिमान, देशाभिमान वगैरे जास्त दिसतो, आणि असतोहि. पण या अभिमाना-मुळेंच मनुष्याकडे जाति–देश–धर्म–निरपेक्ष केवळ मनुष्य या नात्यानें पाहणें त्यांना कठीण पडतें. स्त्रियांना अशा रीतीनें पहाणें अधिक शक्य आहे, असें मला वाटतें आणि त्यांनीं जर मुलांचें शिक्षण देतांना ज्ञाती, धर्म, देश इत्यादिकांबद्दलचे निराधार पूर्वग्रह आणि क्षुद्र अभिमान यांना थारा द्यावयाचा नाहीं, असें ठरविलें तर समाजाची उन्नति होणें सुलभ होईल. किंबहुना असें केलें तरच समाजसुधारणा होईल. धर्माभिमान, देशाभिमान, राष्ट्राभिमान, वगैरेंना अगदीं महत्त्व नाहीं असें नाहीं, पण सुशिक्षित विवाहित स्त्रियांनीं या अभिमानापेक्षांहि उच्चतर असा एक आंतरराष्ट्रीय मानवाभिमान म्हणून एक पदार्थ आहे याची जाणीव मनांत ठेवून मुलांच्या मनाला लहानपणापासून वळण दिलें तरच मानवजातींतील भांडणें, मारामाऱ्या, आणि युद्धें महायुद्धें बंद होतील, एरव्हीं नाहीं.

### नवऱ्यांना खुष करा !

हें जें मी सांगत आहें तें कांहींना पटणार नाहीं, कांहींना समजणार नाहीं कदाचित्. अशांना मी म्हणेन, हें तें उच्चतम म्हणून जें काय मी सांगत आहें तें

बाजूला सारा आणि पुरुषमंडळी घरीं आल्यावर त्यांना मनःस्वास्थ्य लाभेल, त्यांच्या चित्तवृत्ति आनंदित आणि उल्हसित होतील, अशा रीतीनें वागा. विवाहित स्त्रिया अशा रीतीनें वागल्या तर तेंहि मोठेंच सामाजिक कार्य होईल. पुरुषांच्या पाठीमागें धकाधकीचीं आणि मनस्ताप देणारीं कामें घरांतून बाहेर पडल्यावर असतातच. घरीं आल्यावरहि त्यांना जर मनस्ताप होऊं लागला तर त्यांच्या हातून दगदगीचीं, पराक्रमाचीं आणि धडाडीचीं सामाजिक कामें होतील कशीं ? आईबाप, बहीणभावंडें एका बाजूला आणि आपली बायको दुसऱ्या बाजूला, बहिणींचीं तोंडें एकीकडे, आणि बायकोचें तोंड एकीकडे, असा प्रकार घरीं आल्यावर आढळला तर पुरुषाला सामाजिक कार्य उत्साहानें आणि हौशीनें करतां येईल का ? तो आपलें स्वीकृत कार्य अशा परिस्थितींत सोडणार नाहीं कदाचित्, पण त्याला उत्साह रहाणार नाहीं, आनंद वाटणार नाहीं, हें खचित. स्त्रियांना जातीनें प्रत्यक्ष समाजकार्य करणें शक्य नसलें तरी अप्रत्यक्ष कार्य करणें पुष्कळ शक्य आहे. पुरुषमंडळीला चांगलें जेवायला वाढलें तर तें देखील मोठें समाजकार्य होईल असें कांहीं मिनिटांपूर्वी मीं म्हटलें तें उगीच चेष्टेनें नव्हे; त्यांत अर्थ आहे. प्रत्यक्ष समाजकार्य करतां आलें नाहीं तरी तें कार्य करणें पुरुषांना शक्य करून देणें हें देखील कमी महत्त्वाचें नाहीं !

समाजकार्य कोणीं करावें ?

माझ्या म्हणण्याबद्दल गैरसमज होण्याची भीति वाटते म्हणून हें सांगितलें पाहिजे कीं, ज्या विवाहित स्त्रियांना प्रत्यक्ष समाजकार्य करावयाचें असेल त्यांनीं आपल्याला घरीं डांबून घ्यावें असें मला सुचवावयाचें नाहीं. ज्यांच्यामध्यें तेवढी बुद्धिमत्ता आणि तितकी आवड असेल त्यांनीं ( पति आणि आर्थिक परिस्थिति अनुकूल असल्यास ) गृहकृत्याकडे थोडेंसें दुर्लक्ष्य करूनहि प्रत्यक्ष समाजकार्य करावें; त्यांत कांहींएक गैर नाहीं. पतीची अनुकूलता नसतांहि त्यांनीं प्रत्यक्ष समाजकार्य करण्यालाहि माझी हरकत नाहीं. पण केव्हां–तर तेवढी प्रबळ अंतःप्रेरणा असली तर. ‘ तेवढी प्रबळ अंतःप्रेरणा ’ म्हणजे काय तर, पतीची मर्जी खप्पा झाली, गृहसौख्य नष्ट झालें, मुलाबाळांची हेळसांड आणि ताटातूट झाली तरी देखील प्रत्यक्ष समाजकार्य केलेंच पाहिजे, असें जिला वाटत असेल, आणि ही एवढी मोठी किंमत देण्याची जिची तयारी असेल आणि पुन्हां ही किंमत देण्यामध्यें आपण कांहीं चुकत आहोंत असें मनःशल्य जिला बोंचत नसेल, तिला प्रत्यक्ष समाजकार्य करण्याची तेवढी अंतःप्रेरणा आहे असें मी मानीन. एवढी मोठी किंमत देण्याची

ज्यांची तयारी नसेल, त्यांनीं मात्र गृहकृत्यें सांभाळून जेवढें समाजकार्य करतां येईल तेवढें कार्य करण्यांत समाधान मानावें असें मला म्हणावयाचें आहे. ज्यांना गृहप्रेमापेक्षां, पतिप्रेमापेक्षां, अपत्यप्रेमापेक्षांहि समाजकार्यप्रेम अधिक महत्त्वाचें वाटत असेल, ज्यांना तें आपलें अवतारकार्य आहे असें वाटत असेल, त्यांनीं अवश्य आपल्या अंतःप्रेरणेप्रमाणें वागावें; इतरांनीं मात्र त्या फंदांत पडूं नये, एवढें मला सुचवावयाचें आहे, अधिक कांहीं नाहीं.

[ हें भाषण मी बव्हंशीं स्त्रियांना उद्देशून करीत असल्यामुळें वरीलप्रकारें भाषण केलें. पुरुषांना उद्देशून बोलूं लागलों तर त्यांनीं स्त्रियांना सामाजिक कार्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याची पुष्कळ संधि द्यावी आणि त्यांच्या आवडीनिवडींना, त्यांच्या सुखलालसेला आणि त्यांच्या हरतऱ्हेच्या आकांक्षांना पुष्कळ महत्त्व द्यावें असें मी त्यांना सांगेन. पण आज तें प्रस्तुत नसल्यामुळें येथेंच थांबतों. ]

---

रेडिओवरील भाषण ( जून १९३९ )
मुंबई ऑल इंडिया रेडिओच्या कृपेनें

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र.
ता.
ठाणे.

# मी आणि माझीं पुस्तकें ५

माझ्या पुस्तकांत मींच चित्रित केलेल्या कांहीं व्यक्तींचीं नांवें माझीं मलाच आठवत नाहींत, त्यांतले कांहीं थोडे प्रसंगहि मी विसरलों आहें. आणि कांहीं ठिकाणीं मीं काय लिहिलेलें आहे हें तर मी बरेंचसें विसरून गेलों आहें. इतकें कीं, माझीं पुस्तकें कधीं काळीं वाचण्याचा प्रसंग आला म्हणजे माझें मलाच कित्येकदां आश्चर्य वाटतें, कीं वा, इतकें चांगलें मी कसें लिहूं शकलों !

## चिकित्सक बुद्धि आणि कलानिर्मिति

माझ्या पुस्तकांतले दोष पाहिले म्हणजे असें वाटूं लागतें कीं, हीं पुस्तकें त्यावेळीं न लिहितां आतां लिहिलीं असतीं तर हे दोष टळले असते ! पण लगेच ध्यानांत येतें कीं आजच्या मनःस्थितींत हीं पुस्तकेंच लिहून झालीं नसतीं ! याच्या अनेक कारणांपैकीं एक कारण असें आहे कीं काव्यें कादंबऱ्या वगैरे शिकवाव्या लागल्यामुळें आणि अलिकडे सर्व साहित्यिकांतच तंत्रविचार अधिक वाढल्यामुळें, माझी चिकित्सकबुद्धि वाढलेली आहे आणि अति चिकित्सकवृत्ति ही कल्पनानिर्मितीला थोडीशी तरी बाधक होते. विद्वत्त्व किंवा पांडित्य हें काव्यनिर्मितीला आणि कलानिर्मितीला घातक होतें हें मेकॉलेचें आणि त्याच्यापासूनच घेतलेलें विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें मत चुकीचें आहे हें मला ठाऊक आहे. कवित्त्व किंवा कलात्मक प्रतिभा ही विद्वत्तेच्या तेजांत किंवा पांडित्याच्या प्रकाशांत होरपळून निघते असें मला वाटत नाहीं. तथापि या मतांत एवढा सत्यांश आहे कीं एखाद्याची वृत्ति अति विचारी आणि अति चिकित्सक झाली आणि आलस्यादि कारणांमुळें प्रतिभा मंद झालेली असली तर ही वृत्ति कलानिर्मितीपासून परावृत्त करणाऱ्या अनेक कारणांपैकीं एक कारण होऊं शकते. मी सांगणार होतों तें हें कीं पूर्वीं तंत्रदृष्ट्या

वगैरे मीं फारसा विचार केला नसल्यामुळें कलानिर्मिति करण्यास धजलों आणि सदोष कां होईना, पण कांहींतरी कलाविकास करूं शकलों.

कंसांतला मजकूर

थोडेंसें विषयांतर करून लेखनांत कंसांत जसा मजकूर घालतात, त्याप्रमाणें मला जातां जातां असं म्हणावंसं वाटतं कीं पूर्वींच्या कलाकृतींत उदाहरणार्थ, हरिभाऊ आपटे किंवा शिवरामपंत परांजपे यांच्या कलाकृतींत पुष्कळ दोष असत, पण त्या अधिक गुणयुक्त असत. कोंकणांतल्या नारळी पोफळीच्या वाड्या आणि शहरांतल्या लहानशा विलायती फुलांच्या बागा यांतील जो भेद तोच मला सूचित करावयाचा आहे. कोंकणांतल्या नारळी पोफळींचीं झाडें एका रांगेंत नसतील, समांतर नसतील, ताडामाडांना पोकें आलेलीं असतील, आंब्यांचीं झाडें अगदीं गोलाकृति नसतील, पण तेथील पाण्याच्या पाटांनीं आणि झाडांच्या उंचीमुळें, फलयुक्ततेमुळें आणि छायाबाहुल्यामुळें तेथें जी शोभा दिसते ती शोभा शहरांतल्या बंगल्यापुढच्या लहानशा टुमदार बागेंत नसते. उद्यानांत शोभा नसते असें नाहीं. पण दोन शोभांमध्यें मला तरी फरक दिसतो. हरिभाऊ आपटे, शिवरामपंत परांजपे वगैरे लोकांमध्यें मी आपली अप्रत्यक्षपणें हळूच गणना करून घेत आहें हें चाणाक्ष वाचक ओळखतीलच आणि मनांत साभिप्राय स्मित करतीलच. त्यांनीं माझ्या ग्रंथ–संपत्तीला कोंकणांतल्या नारळी पोफळी, आंबे वगैरेनीं भरलेल्या वाडीची उपमा देऊं नये, तर कोंकणांतल्याच डोंगरावर वांकड्या तिकड्या शेतांत हरप्रयत्न करून उत्पन्न केलेल्या वऱ्या नाचण्यांची उपमा द्यावी म्हणजे फिटास फीट होईल !

सांगायची खरी गोष्ट अशी कीं, स्वतःच्या ग्रंथांबद्दल बोलणं जरा कठीणच. शस्त्रवैद्य स्वतःवर शस्त्रक्रिया करूं शकत नाहीं, तशांतलीच ही गोष्ट आहे.

पहिलें गंभीर पुस्तक

पहिल्या प्रथम साक्रेटिसाचे संवाद या भाषणात्मक पुस्तकासंबंधीं बोलतों. ' मराठा ' ऑफिसमध्यें दुय्यम संपादकाचं काम करीत असतां असा अनुभव मला येऊं लागला कीं, क्षणिक महत्त्वाच्या बातम्या आणि विषय वाचण्यांतच माझा सगळा वेळ जात आहे आणि असंच आयुष्य गेलं तर तें व्यर्थच गेलं म्हणायचं असं वाटूं लागलं. म्हणून कांहीं महिन्यांनीं मीं रात्रीचा वेळ चांगले ग्रंथ वाचण्यांत घालवावा असं ठरवलं. पण दिवसभर वाचण्याचं किंवा लिहिण्याचं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३५/
६२३९
संदर्भ शाखा

काम केल्यामुळं थकवा येत असे. तेव्हां एखाद्या उत्कृष्ट ग्रंथाचं भाषांतर करावं असा विचार केला.

मतें नसलेलें पुस्तक ?

गंभीर स्वरूपाचं माझं दुसरं पुस्तक म्हणजे '**नीतिशास्त्र प्रवेश**'! नीतिशास्त्राचं पूर्ण आलोचन करून मग पुस्तक लिहावयाचं असं म्हटलं असतं तर पुस्तक लिहूनच झालं नसतं! या पुस्तकाला विद्वानांकडून चांगली मान्यता मिळाली. आणि द्रव्यप्राप्तिहि झाली. ( या पैशांना पंख फुटले ही गोष्ट निराळी ! ) या पुस्तकांत नवीन किंवा क्रांतिकारक अशी उपपत्ति नाहीं. ग्रंथाचा गुण येवढाच कीं निरनिराळ्या ग्रंथकारांचीं मतें वाचून, पचवून, मीं चांगल्या मराठी भाषेंत तीं मांडलीं आहेत. अर्थशास्त्र हें अनर्थशास्त्र आहे ( Political economy is a dismal Science ) अशा प्रकारचीं भाषांतरित वाक्यें मनोवेधक आहेत. उपमा दृष्टांत बरेचसे माझे आहेत. या पुस्तकांत मीं माझीं मतं सांगितलीं नाहींत असा माझ्यावर आक्षेप आहे. यावर एक उत्तर असं आहे कीं, कांहीं प्रश्नांबद्दल निश्चित उत्तर देणंच सध्यांच्या ज्ञानाच्या स्थितींत शक्य नाहीं. दुसरं उत्तर असं आहे कीं, कांहीं ठिकाणीं मीं आपलीं मतं सौम्यपणें दिग्दर्शित केलीं आहेतच. पण ठासून, आदळआपट करून, आरडाओरड करून जो सांगेल त्यालाच मतं आहेत आणि जो सूचित, दिग्दर्शित, ध्वनित करील त्याला मतं नाहींत, असं मानण्याची जगाची विपरीत रीत आहे, त्याविरुद्ध ओरड न करतां, अशी **विपरीत रीत** आहे एवढंच सौम्यपणें सांगतों.

कादंबऱ्यांतील कांहीं दोष

आतां कादंबऱ्यांबद्दल बोलायचं. प्रो. फडके यांनीं आपल्या कांहीं कादंबऱ्या लिहितांना अगोदर मनांत आराखडे बसवून ठेवले होते, तशी माझी पद्धति नसल्यामुळें माझ्या कादंबऱ्यांत प्रमाणबद्धतेचा थोडा अभाव आणि तंत्रदृष्ट्या इतर दोष राहिलेले आहेत. आळसामुळेंहि कांहीं दोष राहिले आहेत. उदाहरणार्थ, 'इंदु काळे आणि सरला भोळे' या कादंबरींत स्त्रियांच्या पात्रांच्या भाषेला स्त्रीसुलभ पोषाख देणं कठीण नव्हतं; पण आळस केला झालं. ( कंसांत दुसरं असं एक कारण सांगायला हरकत नाहीं कीं, स्त्रियांच्या निबंधांतली आणि पत्रांतली ही भाषा अलीकडे पुरुषी वळणाची होत चालली आहे, म्हणून स्त्रियांची भाषा अशी निराळी नाहीं

असं माझं मत होत चाललं आहे. पण तें पूर्णपणें बरोबर नाहीं हेंहि मी ओळखून आहें ) माझ्या कादंबऱ्यांतले कांहीं दोष भौगोलिक आणि ज्योतिःशास्त्रविषयक अज्ञानामुळें उत्पन्न झाले आहेत. रागिणीमध्यें अमक्या वेळीं चंद्र अमक्या दिशेला होता अशीं कांहीं वर्णनें आहेत, त्या सर्वांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न एका लेखकानं मला वाटतं ' विविधज्ञानविस्तारांत ' केला होता. एकवाक्यता कदाचित् होऊं शकेलहि. पण अगदीं खरी गोष्ट सांगावयाची म्हणजे तसा प्रयत्न कोणी करूं नये, कारण तीं तीं वर्णनं करतांना मीं फारसा विचार केला नव्हता. जें सुचलं तें लिहिलं, एवढंच. असल्या गोष्टींकडे माझं विशेष लक्षच नसतं, तेव्हां तत्संबंधीं वर्णनांत चुका होण्याचा संभव आहे.

मला पोषाखाचं, चेहऱ्याचं, हस्तक्षेपादि अवयवव्यापाराचं वर्णन साधत नाहीं हें प्राञ्जलपणें कबूल केल्यावर आणि हें वैगुण्य आहे हें मान्य केल्यानंतर या वर्णनाची फारशी आवश्यकता नसते हें जर मीं सांगितलं तर कोणाचा गैरसमज होणार नाहीं असं वाटतं.

माझं लक्ष बाह्य पोषाखादि गोष्टींपेक्षां आंतर व्यापारांकडे अधिक आहे. म्हणून हे व्यापार माझ्या ध्यानांत येतात आणि रहातात. अर्थात् त्यांचं वर्णन मी करूं शकतों, आणि वर्णन जेथें चांगलं साधलेलं असतं तेथें वाचकांना बाह्य वर्णनाची उणीव फारशी भासत नाहीं. किंबहुना ज्याला त्याला आपल्या कल्पनेप्रमाणें मनश्चित्रें रंगविण्याची संधि मिळते. हेंहि [ कांहीं लोकांच्या मतें ] चांगलं आहे आणि येवढ्याकरतांच नायक–नायिकांचीं निरनिराळ्या प्रसंगांचीं चित्रें [ किंवा नट-नटींचे फोटो ] पुस्तकांत घालूं नयेत असं आमच्या डेक्कन कॉलेजमधले आमचे प्रोफेसर फ्रेझर हे म्हणत असत.

## प्रतीकात्मक पात्रें

कादंबरी लिहितां लिहितांच मला त्या त्या पात्रांचं चित्र अधिकाधिक स्पष्ट आणि निश्चित होऊं लागतं. लिहितां लिहितांच त्याला मूर्त आणि सजीव रूप येतं. आधीं अस्पष्ट आणि अमूर्त कल्पनाच असतात. मीं विशिष्ट व्यक्ति पाहून पात्रें कल्पिलेलीं नाहींत. [ याला दोन तीन अपवादच आहेत ] माझीं बहुतेक पात्रें कल्पनानिर्मित आहेत आणि तीं थोडींशीं प्रतीकें आहेत. उदाहरणार्थ रागिणी ही एका विशिष्टमनोरचनेच्या स्त्रियांचं प्रतीक आहे. उत्तरा ही निराळ्या वृत्तीच्या

स्त्रियांचं प्रतीक. लिहितां लिहितां हें प्रतीकात्मक स्वरूप जाऊन त्यांना व्यक्तिमत्त्व व जिवंतपणा येऊं लागतो. ' इंदु काळे ' मधील विनायकराव हा प्रथम कर्मयोग्याचं प्रतीक होता, नारायणराव पाठक हा ज्ञानमार्गाचा अनुयायी म्हणून कल्पिलेला होता. आणि ' इंदु काळे ' ही कलाभिमानी म्हणून कल्पिलेली होती. आणि या कादंबरीच्या द्वारं मला असं सूचित करायचं होतं कीं, मनुष्याला केवळ ज्ञानानं समाधान होत नाहीं, केवळ कर्ममार्गानं पूर्णता येत नाहीं आणि केवळ कलासक्ति ही देखील अपुरीच आहे. तात्पर्य सर्वांची एकवाक्यता केल्याशिवाय कृतार्थता नाहीं, आणि एकाच्याच नादीं लागल्यानं असमाधान होण्याचा संभव. पण ध्येयवादी मनुष्याला या असमाधानांतच एक उच्च प्रकारचं समाधान वाटत असतं, हें मला शेवटीं सुचवावयाचं होतं. ही कादंबरी लिहिण्यापूर्वी योजिलेला बेत एवढाच. पण लेखणी हातांत घेतल्यावर त्या त्या व्यक्तींनीं नामरूपादि धारण केलें आणि त्यांत जसजसा मी अधिक तन्मय होऊं लागलों तसतसं त्यांचं मनोगत मला अधिक कळूं लागलं. लेखनाची माझी ही पद्धति सदोष आहे, पण एक फायदा असा होतो कीं, आधींच केलेल्या आराखड्याच्या चौकोनी मर्यादेचीं बंधनं नसल्यामुळं कल्पनाशक्तीचं तारूं जिकडे जाईल तिकडे त्याला जातां येतं, आणि कित्येक वेळां तें भरमसाट भटकलें तरी कित्येक वेळां स्वैर गतीमुळें अकल्पित सौंदर्यस्थळं त्याच्या नजरेस पडतात. कांहीं म्हटलें तरी माझी पद्धति सदोष आहे हें अर्थात् मी कबूल करतों.

### आश्रमहरिणीची पोथी !

' आश्रमहरिणी ' ही लघुकादंबरी एका जुन्या पोथीचें भाषांतर म्हणून मीं प्रसिद्ध केली, आणि हें सोंग चांगलं साधलेलं दिसतं. कारण जुन्या पोथीची मागणी कांहीं लोकांनीं मजजवळ केली ! आमच्या डेक्कन कॉलेजमधले प्रो. बेन यांनीं लघुकादंबऱ्या असेंच सोंग घेऊन लिहिल्या होत्या. त्यांचें मराठींत भाषान्तरहि झालं आहे आणि ' केसरीं ' तल्या अभिप्राय लेखकाला जुन्या पोथीचा हा सगळा कल्पनेचा खेळ आहे हें न उमगल्यामुळें तो भलतेंच कांहीं तरी लिहून गेला आहे. ' आश्रमहरिणीं 'तील जुन्या पोथीची कल्पना प्रो. बेन यांच्या पुस्तकावरून सुचली नसेल असं मला म्हणवत नाहीं. कारण या कादंबऱ्या मीं वाचल्या होत्या आणि त्यांचा अजाणतां माझ्या मनावर परिणाम झाला असण्याचा संभव आहे.

पण जाणीव असलेल्या माझ्या मनांत तरी जुन्या पोथीच्या कल्पनेचा उगम निराळ्या तऱ्हेनें झालेला आहे. तो कसा तो पुढं केव्हां तरी सांगेन.

## उपेक्षिलेला विनोद

जातां जातां एक मौजेची गोष्ट सांगू का ? लेखकाचं मन स्वतःला कसं फसवीत असतं हें त्यावरून कळून येईल. माझ्या लिखाणांत कोठं कोठं सूक्ष्म आणि सौम्य विनोद आहे असं मला आपलं वाटतं. पण पुष्कळांना तसं वाटत नाहीं. विनोदाची चर्चा चालली म्हणजे माझं नांव कोणीच घेत नाहीं हें पाहून मी मनांत थोडासा हंसतों आणि थोडासा दुःखी होतों. सामान्य स्त्रीला आपल्यांतलं सौंदर्य दुसऱ्यांना कसं दिसत नाहीं याचं आश्चर्य वाटत असावं व दुःखहि होत असावं. तशांतलीच माझी गत आहे. पण मनांत लोकांना मी हंसतों; आतां लोकांनीं मला हंसावं म्हणून हें सांगत आहे !

अगदीं खरी गोष्ट अशी कीं, मराठींत धंदेवाईक विदूषकाचं सोंग घेतलं तरच सामान्यतः विनोद ओळखूं येतो असं दिसतं. मराठींतला विनोद अजून अतिशयोक्तीच्या उलट्या सुलट्या कोलांट्या उड्या मारण्यांतच धन्यता मानीत आहे. कोल्हटकर, गडकरी, चिं. वि. जोशी, कॅप्टन लिमये, अत्रे, ताम्हनकर वगैरेंचीं विनोदी पुस्तकें वाचून मी आनंदित झालों आहें, पोट धरून हंसलोंहि आहें. त्या त्या सर्वांचा मी चाहता आहें. पण भडक अतिशयोक्तीचे उंच लाकडी ‘ घोडे ’ अलिकडे मला आवडत नाहींसे झाले आहेत. याचा अर्थ असा नव्हे कीं, माझा विनोद मोठा सूक्ष्म आणि मार्मिक आणि या सर्वांचा वाईट. माझ्या या म्हणण्यांत परनिंदेचा भाग नाहीं, आत्मस्तुतीचा थोडासा असल्यास तो मानवी दोष म्हणून क्षम्य समजावा. आणि सगळ्यांत उत्तम गोष्ट म्हणजे मला हंसावं ! आणि वाटलं तर असा उद्गार काढावा कीं ‘ गडकऱ्यांच्या भावबंधनांतील इंदु का बिंदु प्रभाकरपंतांना विचारते कीं, “ सुंदर लोकांमध्यें, प्रभाकरपंत, आमची पण गणना करतां ना तुम्ही ” तशापैकीं वामनरावांची अवस्था झाली आहे. ’ मला या सर्व गोष्टी समजतात आणि मी स्वतःहि स्वतःलाच हंसूं शकतों. पण मानवी मनाचा एक मौजेचा प्रकार म्हणूनच माझ्या लिखाणामध्यें विनोद आहे असं माझं मत मीं सांगितलं. ‘ Vanity, thy name is author ! ’

---

रेडिओवरील भाषण ( फेब्रुवारी १९३९ )
मुंबई ऑल इंडिया रेडिओच्या कृपेनें

## नाटकांत पार्ट करणें चांगलें, ६

*किंवा नाटक पहाणें चांगलें*

नाटक पहाणें चांगलें, नाटकांत पार्ट करणें तेवढें चांगलें नाहीं, असें वरील प्रश्नाचें उत्तर अनेक स्त्रीपुरुषांकडून आलेलें मीं ऐकलें आहे. हें उत्तर मी घटकाभर खरें धरतों, आणि विचारतों कीं, जगाच्या नाटकांत कोणाला प्रमुख पार्ट मिळाला नाहीं, तर त्यानें जगाचें नाटक प्रेक्षकाप्रमाणें पहात रहावें, पण तसें न होतां माणूस बहुधा दुखीकष्टी होतो, याचें कारण काय? जगांत प्रत्येक मनुष्याला महत्त्वाकांक्षा असते. त्याला मोठेपणा हवा असतो. त्याला पुढें यावेसें वाटतें. पण पुष्कळ लोकांना पुढें येतां येत नाहीं. हे लोक बहुधा जगावर रुसतात, मनांत कुढतात, देवाला किंवा दैवाला नांवें ठेवतात, पण ते असा विचार करीत नाहींत कीं, जगाच्या नाटकांत आपल्याला प्रमुख पार्टाचें काम नाहीं तर नाहीं, दुय्यम दर्जाच्या पार्टाचेंहि नाहीं तर नाहीं, आपण आपलें प्रेक्षकाचें काम आपल्याकडे घेऊं या. हें काम कांहीं कमी आनंददायक नाहीं.

जग हा एक क्रिकेटसारखा खेळ आहे असें कल्पिलें तर, अकरा खेळाडूंत आपली गणना व्हावी, अशी आपली इच्छा असणें कांहीं वाईट नाहीं. किंबहुना त्याविषयीं सरळ व न्याय्य प्रयत्न करणें आपलें कर्तव्यकर्म आहे. परंतु अकरा खेळाडूंत आपणाला घेतलें नाहीं, म्हणून कुढूं नये, रुसूं नये, रागावूं कातावूं नये तर आपल्या खेळाडूंचा खेळ पाहण्यांत जी मौज आहे, तिचा उपभोग घ्यावा. त्यांना उत्तेजन देत असावें. त्यांना जय प्राप्त झाला असतां, तो आपल्या पक्षाचा जय म्हणून आपणहि त्यांच्याबरोबर जयोत्साह करावा, व पराभव झाला असल्यास खेळाडूस सहानुभूति दाखवून त्यांना निरुत्साही होऊं देऊं नये. हजारों लोकांसमोर क्रिकेट खेळण्याचा मान मिळविण्याचा एकाद्यानें प्रयत्न केला, तर तो अभिनंदनीय आहे, पण हा मान मिळाला नाहीं म्हणून क्रिकेटचा सामना पहाण्याची मौज कां गमवावी?

नाटकांत काय, क्रिकेटच्या सामन्यांत काय, किंवा जगाच्या व्यवहारक्षेत्रांत काय, पुढें येण्याचा मान थोड्यांनाच मिळूं शकणार. बाकीच्यांना पड्यांत किंवा बाहेर राहून प्रेक्षकांचेंच काम करावें लागणार. पण हें काम काय वाईट आहे ? पैसे देऊन आपण नाटक पहायला जातोंच ना. बालगंधर्वासारख्यांनीं उत्तम काम केलें तरी प्रेक्षकांना आनंदच, व एकादा नट चुकला किंवा अडखळला, किंवा प्राम्प्टिंग-करितां पड्याकडे किंवा विंगकडे पाहूं लागला, तरीहि त्यांना मौजच. आम्ही डेक्कन कॉलेजांत असतांना ग्यादरिंगमध्यें विद्यार्थ्यांनीं एक नाटक केलें. त्या वेळेस एक प्रवेश भर रंगांत आला असतां, सिंहासनावर बसलेल्या राजाच्या मिशा नाकाच्या पड्यास लावलेला चाप सैल होऊन गळूं लागल्या व त्या सावरतां सावरतां त्या अनेक सामंतांच्या अधिराजाला नाकी नव आले. दुसऱ्या एका नाटकांत गडी डाव्या हातांत सोन्याचें रिस्टवाच घालून आलेला पाहून प्रेक्षकांत हंशा पिकला.

अशाच एका प्रसंगीं एका नटाला फक्त एक वाक्यच बोलावयाचें काम होतें, पण नटवर्गांत आपली गणना व्हावी, म्हणून खटपट करून सबंध नाटकांत हें एकच वाक्य बोलण्याचें काम त्यानें आपल्याकडे घेतलें होतें. शेवटीं तें लहानसें वाक्य बोलण्यांतहि स्वारी जेव्हां अडखळली, तेव्हां त्या नटाची दीनवाणी स्थिति प्रेक्षणीय होती.

नाटक जर पड्याआडून पहातां आलें, तर तेंहि मौजेचें असतें. एकदां एका नटाला दासीचें काम करावयाचें होतें. पण तो पोऱ्या मात्र मोठ्या काठाचें अमकें लुगडें दिलें तरच मी काम करीन, असें म्हणून रुसून बसल्याचें माझ्या एका मित्रानें मला सांगितलें, व हें ऐकून मी अगदीं थक्क होऊन गेलों. अहो, बायका लुगड्याकरितां रुसतील, पण अठरा वीस वर्षांचा पुरुष लुगड्याकरितां रुसतो आहे, ही कल्पनाच चमत्कारिक. पड्याबाहेर जी नायिका पतीपुढें लाजतांना मुरडतांना दिसते, पाया पडून मनधरणी करितांना दिसते, तीच पड्यांत गेल्यावर पुरुषी आवाजानें त्या पतीला काम चुकल्याबद्दल व वाक्य गाळल्याबद्दल नोकराला आपण रागावतों अशा प्रकारें रागावतांना दिसली म्हणजे तीहि एक मौज वाटते. पड्यांत नट परत आल्यावर त्याच्या रंगाकडे व एकंदर विद्रूप चेहऱ्याकडे पाहूं नये असें एकाद्यास वाटतें, पण एका दृष्टीनें हाहि देखावा एकादेवेळीं पहाण्यासारखा असतो. त्याचें वर्णन मात्र येथें करीत नाहीं. मुख्य मुद्दा हा आहे कीं, पुढें येऊन आपल्यास प्रमुख पार्ट न करितां आला तरी, जगाच्या नाटकगृहांत आपण रुसण्याफुगण्याचें, कांहीं कारण

नाहीं. पडदा ओढण्याचें, प्राम्प्टिंग करण्याचें, रंग लावण्याचें, अभिनय शिकविण्याचें किंवा नुसत्या प्रेक्षकाचें काम ईश्वरानें आपल्याकडे दिलें असल्यास तें काम आपण रसिकपणें पार पाडावें. यांत कांहीं आनंद कमी नाहीं. शाळेंत, कारखान्यांत, संस्थेंत, कौन्सिलांत प्रत्येकाला पुढें यावेसें वाटतें. पण पुढें येण्याचा योग्य प्रयत्न करून जर आपला हेतु साध्य झाला नाहीं, तर मागें राहूनहि जगाचें नाटक पडद्यांतून किंवा समोरून पहाण्यांत कमी आनंद भरलेला आहे, असें नाहीं. उलट कांहीं बाबतींत हें बाह्य स्थान अधिक आनंददायी आहे. आपल्या धंद्यांत पुढें येण्याचा आपण प्रयत्न करावा, पण अपयश आलें तर पुढें आलेल्यांच्या मौजा आपण पहाव्या. त्याचा अर्थ असा नाहीं कीं, त्यांच्या हास्यास्पद गोष्टीच आपण पहाव्या, व त्यांची जनांत नाहीं तरी आपल्या मनांत चेष्टा करावी. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, आपण अपेश पावलों, तर यशस्वी लोक यश कां पावतात, यश पावल्यावर त्यांना यशामुळेंच अधिक अडचणी कशा येतात, त्यांचेवर अधिक जबाबदारी कां, व अधिक काळजांचा भार कसा पडतो, त्यांना अधिक मोह-प्रसंग कसे येतात, त्यांच्यामध्यें अधिक दुरभिमान, अधिक ढोंग, अधिक उर्मटपणा, इत्यादि दोष उत्पन्न होण्याचा कसा संभव असतो, इत्यादि गोष्टी आपण सूक्ष्मपणें पहाव्यात व त्यांची स्थिति म्हणजे अगदीं सौख्याची खाण असते, त्यांत हास्यास्पद किंवा करुणास्पद कांहीं नसतें, अशांतला कांहीं प्रकार नाहीं, हें मनांत ओळखून आपल्या स्थितींत जें कांहीं आपलें कर्तव्य असेल तें करीत रहावें, आणि आपल्या व इतरांच्या सात्विक आनंदांत भर घालून जगाच्या नाटकांत कधीं नट म्हणून, कधीं पडद्यांतलें काम करणारा म्हणून व कधीं बाहेरचा प्रेक्षक म्हणून जें कांहीं काम आपल्याकडे असेल तें करीत रहावें.

# तुरुंगांतील आठवणी

७

" अण्णासाहेब, रस्त्यावर शेण पडलं आहे, तें आणा आंत. " प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांना रस्त्यावरचें शेण आणावयास सांगणारा कोण, तर गोविंद नांवाचा, पन्हाळा जेलखान्यांतला शिपाई ! विनायकराव जोशीराव आणि मी त्या वेळीं त्याच खोलींत कैद्याच्या वेषांत स्वयंपाक करण्यांत गुंतलों होतों. प्रो. विजापूरकर हे कैदी होते. पण साध्या वेषांत उभे होते. गोविंदा शिपायाच्या आम्ही ताब्यांत अर्थात् ' गोविंदराव ' (आम्हीं कैदी असल्यामुळें त्या वेळीं त्याला गोविंदराव म्हणत होतों. ) प्रो. विजापूरकरांना देखील रस्त्यावरचें शेण आणावयास सांगणार ! शेण आमच्या उपयोगाकरितांच होतें. आणि खरें सांगावयाचें म्हणजे ' गोविंदरावां 'चा हेतु कांहीं वाईट नव्हता. पण आमच्या विनायकराव जोशीरावांना त्याचे ते शब्द चमत्कारिक वाटले आणि मलाहि ते तसेच वाटले. कडू कारल्याला गोड करून घेऊन वागावयाचे ते दिवस होते आणि आमची वृत्तिहि अनुरूप होती. त्यामुळें विनायकराव मला म्हणाले, " वामनराव, ऐकलेत का शब्द ? एखाद्या लहानशा गोष्टीचा आरंभ करायला किती चांगले आहेत ! कैदेंतून सुटल्यावर हे शब्द घेऊन गोष्टीचा आरंभ करा. "

मीं म्हटलें, " विनायकराव, लहान गोष्टी माझ्यापेक्षां तुम्हीच चांगल्या लिहितां; तर तुम्हींच एखादी लिहिली पाहिजे. "

झालें. ठरलें आमचें. पण विनाकरावांनीं योजिलेली गोष्ट त्यांनीं लिहिली नसावी; निदान ती माझ्या पाहण्यांत नाहीं. म्हणून मींच त्या शब्दांनीं आरंभ करून, गोष्ट नव्हे तर अनेक गोष्टींना थोडीबहुत सामुग्री मिळेल अशा कांहीं तुरुंगांतल्या आठवणी लिहितों.

* * *

प्रोफेसर विजापूरकर, विनायकराव जोशीराव व मी यांचे ते दिवस—दुःखाचे ते दिवस—गेले! तें '**विश्ववृत्त**' मासिक बुडालें!—'विश्ववृत्ता' वरचा तो १९०८ मधला खटला आतां एखाद वेळेसच आठवतो. कोल्हापूर, पन्हाळा व शेवटीं सिंध हैदराबाद येथील तुरुंगवास संपला, ते कष्टाचे, काळजीचे दिवस गेले, त्याच्या नंतरचेहि बरेवाईट दिवस आले आणि गेले, आणि आतांचेहि बरेवाईट दिवस आहेत ते जातील! पण जोंपर्यंत स्मरणशक्ति धड आहे तोंपर्यंत तुरुंगाची आठवण बुजणें शक्य नाहीं.

हालअपेष्टांच्या किंवा अपमानांच्या आठवणींसंबंधानें मीं हें म्हटलेलें नाहीं, तर तुरुंगांतल्याच मौजेच्या पण जिवाला चटका लावून सोडणाऱ्या गोष्टींविषयीं मी बोलतों आहें. हालअपेष्टा आणि अपमान यांनीं एके काळीं निखाऱ्यांप्रमाणें भाजलें असलें किंवा सुयांप्रमाणें टोंचलें असलें तरी ते चटके, ते फोड, ती सूज, त्या जखमा, सगळें कांहीं गेलें आहे. सिनेमांतल्या आगीच्या देखाव्याप्रमाणें किंवा कादंबऱ्यांतल्या नायिकेवरच्या कठीण प्रसंगांप्रमाणें पूर्वीचे ते अनुभव स्मृतींत जागृत केले असतां दुःखगर्भ असें रमणीय सुख देतात; पण या आठवणी मी आतां जागृत करूं इच्छित नाहीं. तुरुंगांतल्याच पण सात्विक, हृदयस्पर्शी पण कोमल, कडू पण गमतीच्या, अशाच गोष्टी डोळ्यांपुढें आणाव्यात असें मीं योजिलें आहे.

'विविध-वृत्ता' च्या संपादकांनीं मजजवळ गोष्ट मागितली होती, पण ती न देतां गोष्ट लिहिण्यास कांहीं बाबतींत उपयुक्त अशा प्रकारचे खरोखर घडलेले देखावे दाखवावयाचें मीं ठरविलें. त्यांत वाईट एवढेंच झालें आहे कीं, हे देखावे पाहण्याकरितां वाचकांना माझ्याबरोबर सिंधहैदराबाद येथील तुरुंगांत यावें लागणार! पण ही शिक्षा घटका दीडघटकाच टिकणारी आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

❧ ❧ ❧

"**वामन**, तुम् हिन्दू. तुम् नहि इधर."

"मी इथेंच अंघोळ करणार."

"कैदी असून मग्रूरी?"

"गोमल, मग्रूरी नाहीं. पण ही जागा त्यांतल्या त्यांत स्वच्छ आहे, म्हणून इथें मी अंघोळ करतों आहें."

" पण मला मागाहून अंघोळ करावयाची आहे, मी कुठें करूं ? "

" तूंहि इथेंच कर. "

" पण तूं हिन्दू आहेस; मी मुसलमान तिथें कसा अंघोळ करूं ? ती जागा विटाळते तूं अंघोळ केलीस म्हणजे. "

" अरे, मी ब्राम्हण आहें......"

" ब्राम्हण, ब्राम्हण क्या है ?......"

" गोमल, मीं अंघोळ केल्यावर तूं मग ती जागा धुवून शुद्ध करून घे म्हणजे झालें......"

" वामन, तुम् बडा खराब अदमी है. हम् पगडीवाला तुमारे उपर है. तुम् कैदी. तुम् उधर जाव......."

" नहि, हम् नहि जाएंगे. "

वरील संवादांत ' गोमल ' नांवाच्या Convict Overseer म्हणजे कैदी असून हळू हळू ' पगडीवाला ' मुकादम झालेल्या पठाणाच्या व माझ्या तोंडीं जी भाषा आहे ती वस्तुस्थितीला धरून असल्यास केवळ भावार्थानेंच आहे. कारण ' गोमल ' ला पंचवीस तीस शब्दांहून अधिक हिन्दी शब्द येत नव्हते; माझीहि बहुतेक तशीच गोष्ट. गोमल याला खुनाबद्दल २॥ वर्षं सजा मिळाली होती ! पण हिन्दी व्याकरणाचे खून त्यानें आणि मीं जितके केले तेवढ्यांबद्दल एखाद्या वैय्याकरणानें दोघांना जर फांशीची शिक्षा दिली असती तर ती रास्त झाली असती. त्याची भाषा ( पु श्‌ तु ) मला समजावयाची नाहीं, माझी मराठी त्याला समजावयाची नाहीं; दोघांनाहि सिंधी येत नव्हतें; हिंदीची अवस्था तर आतांच सांगितली ! अशा स्थितींत हातवारे, चेहऱ्यावरील आविर्भाव, कृति आणि उद्गारात्मक मोडकी तोडकी हिन्दी—यांवर आमचा कारभार चाले. मनुष्याचे विचार-विकार, किंवा भाव-भावना कळण्याला जिव्हेच्या भाषेपेक्षां हृदयाची भाषा अधिक समर्थ हें गोमलशीं मला महिना दोन महिने ' एकान्तांत ' रहावें लागलें त्या वेळीं चांगलें समजलें. त्याला माझ्या ' मग्रूरी ' चा राग यावयाचा, पण मनानें तो फार चांगला असल्यामुळें तो ती मग्रूरी चालूं द्यावयाचा. आणि मी तरी त्याचें हृदय ओळखून होतों म्हणूनच थोडीबहुत मग्रूरी करावयाचा ! तो अडाणी, बावळट, भोळसट, धर्मवेडा असून देखील मला

आदरणीय वाटत असे; कारण त्याचें धर्मवेड प्रामाणिकपणाचें होतें आणि त्याचें हृदय अतिशय कोमल होतें. हिंदू जेथें अंघोळ करील तेथें वीस पंचवीस टंबरेलें ओतून हातांनीं ती जागा स्वच्छ करून घेतल्याशिवाय तो अंघोळ करावयाचा नाहीं; पण मी कैदी व तो माझ्यावरचा मुकादम असून देखील तो ही तकलीफ सोशी, हा त्याचा केवढा थोरपणा! त्यांतून पुनः अंघोळ करण्याचा मला वास्तविक अधिकारच नव्हता. कारण सिंध-हैद्राबाद जेलमध्यें थंडीच्या दिवसांत आठ आठ दिवसांनीं अंघोळ करावयाची! मी अंघोळ करीं ती चोरून करीं, आणि त्यांत पुनः मुकादमाशीं 'मग्रूरी'! पण जो गोमल मला चक्की पिसतांना (दळण दळतांना) नियमांना झुगारून मदत करी, जो गोमल "कोणी कोणाला आपल्या भत्त्यापैकीं कांहीं देऊं नये" असा जेलखान्याचा नियम असतां मला आपल्या पोळींतली अर्धी पोळी 'पगडी' जाण्याची भीति असतां देखील देई, तो गोमल मीं नियम मोडून अंघोळ केली तर हा लाडिकपणा चालवील अशी माझी खात्री होती; आणि याच जोरावर त्याच्या आवडत्या स्वच्छ जागेवर मी अंघोळ करण्याची लाडिकपणाची मग्रूरी करीत असें. मी हिंदू होतों, पण 'चक्की पिसून' झाल्यावर "चक्की है, हिन्दू मर गया हिन्दू मर गया" असें भत्तेवाल्यांना सांगून तो मला अधिक "डाळ" (मुगाची घट्ट आमटी) देववीत असे! मी साहेबांशीं इंग्रजी बोलत असें, म्हणून त्याला "हा बडा इलमवाला आहे" असें वाटावयाचें व कांहीं का असेना, आमचें दोघांचें एकमेकांवर प्रेम होतें. त्याच्या धर्माबद्दल, त्याच्या नमाजाबद्दल, त्याच्या 'अलाह इल् अल्लाह' बद्दल, त्याच्या 'तसबी' बद्दल (जपमाळेबद्दल) मला एका अर्थी अनादर होता; पण त्याची ती खरी भक्ति पाहून मला एका अर्थी त्यामध्येंहि पुष्कळ अर्थ आहे असें वाटावयाचें. त्याला माझ्या धर्माबद्दल तिरस्कार वाटावयाचा. हिंदु धर्म म्हणजे खरोखरच घाणेरडा असें त्याला वाटावयाचें; पण माझ्याबद्दल मात्र त्याला आदर आणि प्रेम असे.

❧ ❧ ❧

हिन्दी येत नव्हती कोणालाच, पण धर्माबद्दल आमचे हिन्दींत वादविवाद व्हावयाचे हें कोणाला खरें देखील वाटणार नाहीं. एक दिवस संध्याकाळीं भत्ता खाऊन झाल्यावर गोमल तसबी (जपमाळ) घेऊन "ला अलाह इल् अल्लाह" चा जप करीत असतां मला म्हणाला, "बामन, तुमारा कलिमा क्या है?" मीं

म्हटलें, " कलिमा का मायना क्या है ? " तो म्हणाला, " ला अलाह इल अल्लाह, ए कलिमा है. तुमारा ऐसा कलिमा नहिं ? "

मीं म्हटलें, " नाहीं, आमच्या हिन्दू लोकांत एकच असा कलिमा नाहीं. " त्याला तें खरें वाटेना. कलिमा नाहीं असा धर्म कसा असेल अशी त्याची कल्पना. तो मला यापुढें वारंवार " तुमच्या हिन्दूंचा कलिमा काय ? " असें विचारी व मीं ' आमचा कलिमा नाहीं ' असें म्हटलें कीं, हिन्दूंबद्दल त्याला अनादर उत्पन्न होई, व थोडेंसें असेंहि वाटे कीं, ' हा हिन्दु खोटें बोलतो आहे, तो कलिमा मुद्दाम सांगत नाहीं. ' पुष्कळ दिवस आमचीं तींच तींच प्रश्नोत्तरें झालीं; पण शेवटीं एक दिवस माझ्या डोक्यांत कल्पना आली कीं, " याची जरा गंमत करूं या. याला आपल्या धर्माबद्दल उगीचच्या उगीच अनादर वाटूं लागला आहे, तर तोहि कमी करूं या. " कल्पना आल्यावर संधीहि लवकरच मिळाली. त्यानें कलिमा काय म्हणून विचारलें, तेव्हां गायित्री मंत्र वगैरे या अडाण्याला कांहीं समजावयाचें नाहीं, रामाचा एखादा श्लोक म्हणावा म्हणजे त्याला कांहींतरी समजेल असा विचार करून,

**' रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे । '**

हा श्लोक म्हणण्यास मीं आरंभ केला. दुसरा चरण म्हटला असेल नसेल तोंच तो उद्गारला, " ऐसा कैसा कलिमा ? ' राम ' ' राम ' क्या है ? "

मीं दुष्ट विनोदबुद्धीनें म्हटलें, " तुमारा अल्ला अल्ला क्या है ? "

तो म्हणाला, " अल्ला क्या है ? अल्ला जानता नही तुम् ? "

मीं म्हटलें, " राम हमारा अल्ला है. "

त्याला हें न खपून त्यानें रामाला भलती शिवी दिली, माझ्या तोंडूनहि तिचाच बहुतेक प्रतिध्वनि उमटला ! पण त्याच्या अल्लाबद्दल मीं अनादरपूर्वक उल्लेख केला याबद्दल त्याला इतकें वाईट वाटलें आणि माझा इतका राग आला कीं, त्यानें एक दोन दिवस माझ्याशीं अबोला धरल्यासारखें केलें. पण जीभ बोलली नाहीं म्हणून हृदयाची भाषा थोडीच थांबते आहे ? आमचीं हृदयें वाचेच्या पलीकडील व वाचेला अगम्य अशी कोमल व रसप्रचुर भाषा बोलत होतींच, आणि त्या हृदयांना जिव्हेच्या द्वारेंहि लवकरच वाचा फुटून ' कैसा हिन्दू मग़ूर, ' ' दास्त हिन्दवान ' ( असे हे हिन्दू लोक ? ) इत्यादि प्रकारचे राग व प्रेम यांनीं युक्त असलेले उद्गार बाहेर पडूं लागले.

हैदराबादेस माझ्याकडे पहिल्याप्रथम चरक्यावर लोंकर काढणें हें काम होतें. नंतर दोन तीनदां चक्की येऊन, अखेर सुतळीचे बुटाचे तळ करणें हें काम माझ्याकडे आलें व शेवटपर्यंत तेंच राहिलें. दोन दिवसांत एक जोडी इतरांना करावी लागते, पण माझे तळ उत्तम होत, निदान असें अधिकारी म्हणत, म्हणून चार दिवसांत एक जोड मीं केला तरी चालत असे. सुई, सुतळी, रंबी, आर वगैरे सामान मिळण्यास उशीर झाल्यास मी एखादे वेळेस पांचवा दिवस लावीत असें, पण तेंहि पचत असे. एक दिवस तर एका जोडीला मीं सहा दिवस लावले. ती हकीगत मौजेची आहे. माझें काम चौथ्या दिवशींच बरेंचसें संपलें होतें. अर्थात् पांचव्या दिवशीं दुपारच्या भत्त्याच्या आधींच तें संपून गेलें. पण रिकामा बसलेला मला कोणीं पाहिलें असतें तर अधिक काम मिळालें असतें आणि बायबल किंवा शेक्सपिअर वाचावयास सांपडला नसता ( शेक्सपिअर हक्कानें व बायबल मेहेरबानी म्हणून देण्यांत आलें होतें ) म्हणून मीं तळाचे शेवटले एकदोन टाके ठेवून दिले होते व सर्व साहित्यासह तो तळ समोर ठेवून पुस्तक वाचीत बसलों होतों. कोणी अधिकारी येतो आहेसें दिसलें कीं, पुस्तक बाजूला ठेवून उगाच कांहींतरी सुई ओवण्याचें वगैरे काम काढून कामामध्यें मी चूर आहें असें दाखवीत असें. संध्याकाळीं चार वाजतां जेलमधलीं कामें बंद व्हावयाचीं; पण ३॥ वाजले तरी माझ्या तळाचे शेवटले दोन टांके राहिलेच होते. अगदीं शेवटल्या पांच मिनिटांत ते टाके मारून मी काम संपविणार होतों, इतक्यांत एक कैदी–मुकादम ( Convict Overseer ) आला व आनंदानें "बादशहा मर गया, अबी बडी माफी आ जायेंगी, अज ठेका बंद." असें म्हणून माझें काम ओढून घेऊं लागला. एक दोन टाके राहिले आहेत, ते मारून देतों असें मी म्हणूं लागलों; पण बादशहा मेल्याच्या आनंदानें ( ! ) म्हणजे अर्थात् माफी मिळेल या आशेच्या आनंदानें– तो इतका बेहोष झाला होता कीं, "अरे कुच परवा नहि ! अबी ठेका बंद; पुरा कल करो." असें म्हणून त्यानें माझें सर्व साहित्य अर्धवट गुंडाळलेंच. ( होय, आतां आठवण झाली, कीं हा मुकादम बुटाचे तळ करण्याच्या कामांतला माझा आद्यगुरु होता. त्याचें नांव मात्र आतां आठवत नाहीं. ) "तुला काय करायचं आहे ? उद्यां वाटलं तर हे दोन टाकेच मारण्याकरितां सबंध दिवस घे." अशा प्रकारचा उपदेश करून स्वारी निघून गेल्यावर बादशाहाच्या मरणामुळें शोक व्हावयाच्या ऐवजीं जेलखान्यांत आनंदोत्सव झालेला पाहून माझ्या मनांत जी

विचारपरंपरा सुरू झाली ती देण्यासारखी आहे. पण ती देऊं लागल्यास गमतीच्या गोष्टी सांगण्याचें जें मीं वचन दिलें आहे तें मोडल्यासारखें होईल, म्हणून त्या भानगडींत मी पडत नाहीं. सांगावयाला नकोच कीं, माझ्या कामाचें सामान दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां जरी मिळालें, तरी शेवटले दोन टाके दुपारीं पावणे-चारानंतरच लागले !

असले कांहीं प्रकार सोडले तरी एकंदरींत जेलमध्यें माझें वर्तन Exemplary ( आदर्शभूत ) होतें, असें अधिकाऱ्यांचे शेरे पाहिले असतां दिसून येईल. जेलमध्यें अंघोळ चोरून करणें, लघवीला ठराविक वेळा सोडून जाणें, भाजी घाणेरडी असली तरी टाकण्याची परवानगी नाहीं म्हणून ती पुरणें, 'टाला' ( कुलपें ) पाहण्याकरितां आलेल्या मुकादमाशीं किंवा शिपायाशीं एकदोन शब्द बोलणें, किंवा वर सांगितल्याप्रमाणें कामचुकारपणा करणें, असल्या प्रकारच्या बदमाषीशिवाय दुसरी बदमाषी माझ्या हातून घडली नाहीं. माझें काम चोख असे, माझ्याविरुद्ध कोणाची तक्रार नसे. मलाहि कोणाविरुद्ध तक्रार करण्याचा प्रसंग आला नाहीं, व अशा रीतीनें सुपरिंटेंडेंट व जेलर यांचें माझ्याविषयीं मत फार चांगलें होतें. याला प्रत्यन्तर पुरावा म्हणजे असा कीं, जेलर व सुपरिंटेंडेंट हे मला आपल्या जबाबदारीवर स्वतःचीं खाजगी पुस्तकें एखादे वेळेस वाचावयास देत. वास्तविक कैद्याला जेलमधील गैरवर्तना-बद्दल शिक्षा न होतां तीन महिने जातील तेव्हां तेथील लायब्ररींतील एखादें पुस्तक वाचावयास मिळावयाचें. पण मला मोठ्या टाईपाचें बायबल हें एक धार्मिक पुस्तक म्हणून मेहेरबानीखातर देण्यांत आलें होतें व दुसरें जें पुस्तक असे तें वाचून झाल्यावर सुपरिंटेंडेंट आपल्या घरचें पुस्तक एखादवेळेस देत असे. तेथल्या लायब्ररींत Grimm's Fairy Tales सारखीं चार पांच पुस्तकें व शेक्सपियर एवढींच इंग्रजी पुस्तकें होतीं. शेक्सपियर बरेच दिवस पुरण्यासारखा होता, पण बाकीचीं पुस्तकें दोन तीन दिवसांत वाचून व्हावयाचीं ! पण हें सांगण्याची चोरी. कारण तसें सांगितलें तर " या कैद्याला काम पुरेसें मिळत नाहीं, याला वाचायला एवढी फुरसत सांपडते कशी ? " अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होऊन भलतेंसलतेंच कांहीं तरी व्हावयाचें ! जेलमधील पुस्तक वाचून झालें, तरी बरेच दिवस स्वस्थ बसून सुपरिंटेंडेंट किंवा जेलरजवळ गोष्ट काढली तर ते मला एखादें पुस्तक देत. हे दोघेहि युरोपिअन फार सज्जन होते व त्यांच्या सौजन्यामुळेंच माझा जेलमध्यें

निभाव लागला, हें येथें कृतज्ञतेनें सांगितलें पाहिजे. या दोघांनीं राज्यारोहणासंबंधीं जी कैद्यांना कांहीं महिन्यांची माफी देण्यांत येते ती मला देण्यासंबंधीं चांगली शिफारस कोल्हापूर दरबारकडे केली होती. पण त्या दरबारनें या शिफारशीला कांहींच महत्त्व दिलें नाहीं. सुपरिंटेंडेंटला हा अन्याय झाला असें वाटलें आणि त्याला विशेष वाईट वाटण्याचें कारण असें झालें कीं, त्याच जेलमध्यें एक गुजराथी राजकीय कैदी होते, त्यांचें वर्तन (जेलच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें गैर) होतें, त्यांच्या कामाबद्दल वगैरे तक्रारी असत, त्यांना जेलमधल्या अनेक शिक्षाहि झाल्या होत्या, तथापि त्यांना राज्यारोहणाची तीन महिन्यांची माफी मिळाली आणि माझें वर्तन जेलच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें जरी फार चांगलें होतें तरी मला एक दिवसाची देखील माफी नाहीं! सुपरिंटेंडेंटला हा अन्याय खपला नाहीं; त्यानें लगेच वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें अन्याय कसा होतो आहे, हें लिहिलें. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं न्याय दिला तो असा कीं, गुजराथी राजकीय कैद्याला जी तीन महिन्यांची सूट मंजूर झाली आहे, ती रद्द करून दोघां कैद्यांना एकच माप देण्याचें समाधान मानावें. सुपरिंटेंडेंट करावयाला गेला माझी तरफदारी, पण ती भोंवली बिचाऱ्या त्या गुजराथ्याला! जगांतलीं चक्रें हीं अशीं फिरतात.

* * *

जेलमधून सुटण्याच्या वेळची आतां एक आठवण द्यावयाची. ती झाली कीं, मग जेलमधून बाहेर पडूं. पण बाहेर पडण्याचें काम सोपें नाहीं. सुटण्याची वेळ आली तरी अनेक अकल्पित विघ्नें येतात. मला ज्या दिवशीं सोडावयाचें त्याच्या आधीं कांहीं दिवस विष्णुशास्त्री बापट यांच्याकडून ( हे त्या वेळेस पुण्यास आलेले नव्हते, हैदराबादेच्या एका पाठशाळेवर होते ) कपडे आलेले होते. ज्या दिवशीं मला सोडावयाचें त्या दिवशीं सकाळीं मला ऑफिसांत नेण्यांत आलें. तेथें जेलचे कपडे उतरून बापटशास्त्री यांच्याकडून आलेले कपडे मीं घातले व मला भेटण्याकरितां हैदराबाद येथें कांहीं दक्षिणी लोक होते त्यांपैकीं कांहीं आले होते, त्यांना पाहण्याकरितां व बाहेरच्या स्वतंत्र वातावरणांत जाण्याकरितां मी उत्सुक झालों होतों. आठ वाजले. सुपरिंटेंडेंट साहेब आले. ( हे पूर्वीचे सुपरिंटेंडेंट नव्हेत, एक आय्. एम्. एस्. मधील पारशी सद्गृहस्थ होते. ) त्यांच्यापुढें मला नेण्यांत आलें. माझे कपडे काढावयास लावून ऑफिसच्या दप्तरांतील कागदांत लिहिलेल्या शरीरावरच्या खाणाखुणा माझ्या अंगावर लिहिल्याप्रमाणें आहेत किंवा

नाहीं हें ते तपासूं लागले. भलताच कैदी भलत्याच्या नांवानें सुटून जाऊं नये म्हणून ही सावधगिरी ठेविलेली असते. पण हा विधि बहुधा औपचारिक असतो आणि दोन तीन मिनिटांतच आटपतो; पण माझें दैव असें चमत्कारिक कीं, त्या पारशी सुपरिंटेंडेंटला एक दोन खाणाखुणा जमत नाहींत असें दिसून आलें! अमक्या ठिकाणीं तीळ आहे म्हणून लिहिलें आहे तो तीळ तेथें नाहीं, तसेंच अमक्या ठिकाणीं वण आहे म्हणून लिहिलें आहे तो दुसरीकडेच आहे; अर्थात् हा वामन मल्हार जोशीच नाहीं, मी याला सोडणार नाहीं असें तो म्हणाला! आतां काय करतां? मीच वामन मल्हार जोशी हें मीं सिद्ध कसें करावयाचें? आणि शिपायांनीं, जेलरनें वगैरे सगळ्यांनीं सांगितलें तरी कागद बोलतात तें खोटें कसें मानावयाचें? सारें जग जरी माझ्या बाजूला आलें असतें तरी कागद जोंपर्यंत विरुद्ध आहेत तोंपर्यंत सुपरिंटेंडेंट मला सोडावयास तयार नव्हता. मला वाटतें तो अशा अर्थाचें कांहीं तरी बोललासुद्धां. मीच काय, शिपाई, जेलर वगैरेसुद्धां फिकिरींत पडले. आतां या कैद्याचें करायचें काय? सोडण्याचा तर अधिकार नाहीं; बरें न सोडावें तर, केवढा बरें बिचाऱ्याला अन्याय होत आहे, असें त्यांना वाटूं लागलें. मला तर कसेंसेंच होऊं लागलें, पण त्यावेळीं देखील एकाद्या गोष्टीची विनोदात्मक बाजू पाहण्याची माझी प्रवृत्ति मला सोडून गेली नाहीं. मला काळजी वाटली, दुःख झालें, पण मनांत थोडेंसें हंसूंहि आलें!

हंसूं येण्याचें एक कारण असें कीं, दप्तरांतल्या कागदानें कांहीं म्हटलें तरी हाच वामन मल्हार जोशी हें आतां नाहीं, दोन चार घटकांनीं, सुपरिंटेंडेंटला कबूल करावें लागेलच, त्यानें किती जरी आव आणला तरी त्याचें महत्त्व पण तेवढेंच, असें मी समजत होतों. पण दोन तास झाले तरी तो जेव्हां सोडीना तेव्हां मात्र मी मनांत थोडासा चरकलों. पुनः जेलचे कपडे घालण्याचें नशिबांत आलें म्हणावयाचें! बरें, जेलचे तरी माझे कपडे मला मिळणार आहेत का? नाहीं, कारण मी सुटणार म्हणून ते दुसऱ्या कैद्यांना देऊन त्यांचे घाणेरडे कपडे ऑफिसांत देण्यापुरते मी घालून आलों होतों. टिनपॉट, थासरी ( वाडगा ) हीं माझीं भांडीं देखील मीं लोकांना देऊन टाकलीं होतीं, कारण तीं चांगलीं होतीं आणि एकानें सुटावयाच्या आधींच दोन तीन महिने त्यांची मागणी करून ठेविली होती. त्याला, मी तीं सुटण्याच्या आदल्या दिवशीं देऊन टाकलीं होतीं आणि त्याचीं घाणेरडीं भांडीं ऑफिसांत देण्याकरितां घेतलीं होतीं. "मग काय? वामना, तुझ्या नशिबीं

पुनः जेलचे, आणि ते पुनः घाणेरडे कपडे घालण्याचें येणार, आणि पुनः टिनपॉट आणि थासरी घासून त्यांतून पाणी पिण्याचें आणि भत्ता खाण्याचें काम करावें लागणार ! दैवच फिरलेलें दिसतंय्, तेव्हां तुझ्या नशिबीं काय काय आहे कोणास ठाऊक ? आई वारल्याचें दोन महिन्यांपूर्वी ऐकलेंस, सुटण्याच्या दिवशीं हा असा प्रकार, तेव्हां तुझ्या नशिबीं काय आहे तें दिसतच आहे ! ”

अशा प्रकारचे विविध विचार मनांत येऊन मन उद्विग्न झालें. काय करावें, काय बोलावें हें सुचेना. इतक्यांत एक कारकून कोल्हापूर जेलकडून आलेले मूळचे कागद घेऊन आला. या कागदांची नक्कल करतांना कोणा तरी कारकुनानें चूक केली होती, आणि म्हणून कागदांत लिहिलेल्या व माझ्या अंगावरच्या खाणाखुणा जमत नव्हत्या. कोल्हापुराहून आलेले अस्सल कागद सांपडल्यावर सगळा उलगडा झाला, आणि पांच दहा मिनिटांच्या आंतच जेलच्या मोठ्या दरवाजांतून मी बाहेर पडलों. बाहेर पडल्यावर हैद्राबादेहून निघतांना पुनः चार घटका जी ट्रॅजेडी झाली व नंतर लगेच पुनः जी कॉमेडी झाली तिची हकीगत सांगण्यासारखी आहे, पण ती आतां नको. तसेंच पाहूं गेलों तर माझें काय, किंवा दुसऱ्या कोणाचें काय, सबंध आयुष्यच मुळीं शोक, हास्य, शृंगार, वीर, करुण, इत्यादि रसांनीं भरलेलें आहे, तेव्हां वर्णन करण्यासारखे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत पुष्कळच असतात. त्या सर्वांचें वर्णन झालेंच पाहिजे असें कोठें आहे ?

❧ ❧ ❧

**मा**नवी जीवित म्हणजे गमतीचा खेळ नव्हे किंवा गमतीचे खेळ पाहणें नव्हे. मनुष्याच्या जन्माला गहन अर्थ आहे, त्याचें साध्य फार गंभीर स्वरूपाचें आहे, मार्गहि कठीण आहे; कांटेकुटे आणि खांचखळगे जागोजाग आहेत, कष्ट फार पडतात, सहनशीलतेची, धैर्याची व धिम्मेपणाची फार जरूर आहे. तथापि हा मार्ग आक्रमितांना विश्रान्तीकरितां घटकाभर बसून वाटेंत दिसलेल्या मौजांचें, ओलांडलेल्या संकटांचें, भोगलेल्या आपत्तीचें सिंहावलोकन व कथन करून आपली व इतरांची घटकाभर करमणूक करून घेऊं नये असें नाहीं. याच दृष्टीनें कांहीं आठवणी ‘ विविधवृत्ता ’ करितां लिहिण्यास आरंभ केला, त्या आतां लिहून झाल्या, तेव्हां पुनः विहित मार्गाचें गांभीर्यानें आक्रमण करण्यास आरंभ करावा हेंच उचित.

# मी जेव्हां भविष्यकाळांत नजर टाकतों— ८

'भविष्यकाळ' म्हणजे अति लांबचा–कोट्यवधि वर्षांनंतरचा–भविष्यकाळ असा अर्थ घेतला तर आजकालचे बहुतेक सर्व प्रश्न आपोआपच सुटलेले मला दिसतात. कारण त्या अत्यन्त दूरच्या भविष्यकाळांत सूर्य हा देखील चंद्राप्रमाणें मोठा थंड गोळा होऊन राहिलेला असेल, आणि पृथ्वीवर मनुष्यजाति किंवा कोणताहि प्राणी जिवंत राहणारच नाहीं ! मग आपले लहानमोठे प्रश्न उरताहेत कशाला ? त्या काळीं पृथ्वीवर प्राणिवर्गच काय कोणतीहि वनस्पति जिवंत असूं शकणार नाहीं; सर्वत्र बर्फ किंवा बर्फासारखा थंडपणा पसरलेला असेल असें ज्योतिःशास्त्रज्ञ सांगतात. अशा वेळीं तुमच्या आमच्या नोकरीचे किंवा मानापमानाचे, फार काय जातीचे, धर्माचे, स्वराज्याचे, साम्यवादाचे सर्वच प्रश्न आपोआप सुटलेले दिसतील, म्हणजे ते शिल्लकच राहणार नाहींत. प्रश्न विचारणाराच कोणी नाहीं, फार काय मनांत प्रश्न येईल असा कोणताहि प्राणी कोणी नाहीं, अशा काळीं भयानक शान्तता, शीतता आणि शून्यता यांचें साम्राज्य असणार. 'भयानक' शान्तता म्हटलें मीं, पण 'भयानक' म्हणण्यांतहि अर्थ नाहीं. कारण भय वाटेल असा कोणीहि प्राणीच नसेल त्यावेळीं ! भय नाहीं, आनंद नाहीं, दुःख नाहीं. सुख नाहीं, प्रश्न नाहीं, उत्तर नाहीं, अशी ती स्थिति कल्पनेनें डोळ्यांपुढें आणली म्हणजे आतां या वेळीं असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, हा असाच जर जगाचा शेवट व्हावयाचा असेल तर सृष्टि निर्माण करण्याचा हा उपद्व्याप तरी कोणी कशाला केला ? बरें, देवानें किंवा दुसऱ्या कोणीहि हा उपद्व्याप केलेला नाहीं, तर 'प्रकृति' धर्मामुळें ही सृष्टि निर्माण झाली असें मानलें तरी असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, आपण सर्वजण स्वदेहाकरितां, कुटुंबाकरितां, देशाकरितां, साम्राज्याकरितां, किंवा अखिल मानवजातीकरितां म्हणा पाहिजे तर, किंवा त्याच्यापुढें जाऊन गीतेंतल्याप्रमाणें 'सर्व–

भूत-हिता ' करितां म्हणा वाटलें तर, जें जें करीत आहोंत त्याचा शेवट जर असाच व्हायचा असेल तर खटपट करण्यांत तरी फायदा काय किंवा अर्थ काय ?

अत्यन्त दूरच्या भविष्यकाळाचें हें काल्पनिक दृश्य निरुत्साह आणि नैष्कर्म्य उत्पन्न करणारें आहे असें पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे. पण मला तें तसें वाटत नाहीं. ऊहापोह करीत न बसतां, कारणें वगैरे न देतां, ' माझं आपलं असं मत आहे ' अशा सरळ आणि विनयी वृत्तीनें मी एवढेंच सांगतों कीं, कोट्यवधि वर्षांनीं काय परिस्थिति असेल ती असो, आज मला माझ्या स्वतःच्या किंवा आप्तेष्टांच्या किंवा देशबांधवांच्या सुखाची अपेक्षा आहे आणि त्याकरितां मी बऱ्या-बुऱ्या मार्गानें खटपट करीत राहाणारच. उद्यां मला कोणी फांशीं देणार आहेत असें कळलें तरी आज स्नान करण्याची संधि मला मिळाली तर मी स्नान करीन. स्नान करून फायदा काय, असा कोणीं प्रश्न विचारला तर त्याला समर्पक किंवा प्रत्यय-कारक उत्तर देतां आलें नाहीं, तरी ' मला स्नान करावेसें वाटतें ' हें उत्तर माझ्या स्वतःपुरतें पुरेसें आहे. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, हा प्रश्न वाद-विवादानें किंवा चर्चेनें सुटण्यासारखा नाहीं. अत्यन्त दूरच्या ज्योतिःशास्त्रीय कालीं परिस्थिति कशीहि असो, मनुष्याची सहज प्रवृत्ति त्याला बऱ्यावाईट कर्मांना प्रवृत्त करीत राहणारच, याच्यापेक्षां अधिक समर्पक उत्तर वरील प्रश्नाला देतां येईल असें मला वाटत नाहीं.

आतां नजीकच्या भविष्यकाळाकडे आणि जरा दूरच्या भविष्यकाळाकडे मी वळतों. या भविष्यकाळाकडे, म्हणजे त्या काळीं कल्पनेला दिसणाऱ्या परिस्थिती-कडे, मी पाहूं लागलों, म्हणजेहि मला भीति, निराशा, उद्वेग, कांहीं वाटत नाहीं. येथेंहि मी कारणें देत नाहीं आणि साधक-बाधक ऊहापोह करीत बसत नाहीं. एवढेंच सांगतों कीं, माझा अनुभव, माझें वाचन, आणि माझें मनन मला असें सांगतें कीं, त्या त्या काळचे लोक त्या त्या परिस्थितीला आपलें वर्तन जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असतात; आणि यशापयशाचें किंवा सुखदुःखाचें माप बहुतेक सर्व कालांना सरासरीनें सारख्याच प्रमाणांत बहुधा मिळतें ! मागच्या पिढीला आपण उगीच चांगली म्हणतों आणि पुढच्या पिढीबद्दल उगीचच काळजी करीत बसतों. एका पिढीच्या सुखदुःखाच्या, मानापमानाच्या, नीति-अनीतीच्या, औचित्य-अनौचित्याच्या कल्पना दुसऱ्या पिढीहून भिन्न असतात आणि म्हणून एका पिढींतील लोकांनीं बारीकसारीक गोष्टींवरून दुसऱ्या पिढींतील लोकांबद्दल अनुमानें करीत

बसण्यांत विशेष अर्थ नाहीं. उदाहरणार्थ, मुलींनीं कुंकू लावलें नाहीं म्हणजे मला तें आवडत नाहीं आणि थोडेंसें तें अमंगल वाटतें. पुढील पिढीला तें तसें विशेष वाटतच नाहीं असें माझ्या अनुभवाला येत आहे. आम्हीं लहानपणीं गंध लावलें नाहीं. म्हणजे आमच्या आईला फार वाईट वाटायचें, पण आम्हांला त्यांत विशेष कांहीं वाटलें नाहीं आणि हल्लींच्या पिढीला तर हा प्रश्नच समजायचा नाहीं. त्यांतलाच वरचा कुंकवाचा प्रकार. पतिपत्नींनीं कसें वागावें याबद्दलच्या माझ्या किंवा माझ्या पिढींतल्या लोकांच्या कल्पना अशा कीं, पत्नीनें चहा, सैंपाक वगैरे करून पतीची तब्येत संभाळावी, नम्रतेनें वागावें वगैरे वगैरे. नवीन पिढींतील, कांहीं थोड्या कां होईना पण, लोकांना अशी पत्नी अगदींच 'हिंदु,' 'सनातनी' वाटेल. नवीन पिढींतील तरुणांना निराळ्या प्रकारच्या पत्नी पाहिजे आहेत. हा निराळा प्रकार आम्हांला असंमत असेल, घातुक वाटत असेल, पतीला तापदायक होईल अशी आम्हांला भीति वाटत असेल, पण नवीन पिढीला त्यांत विशेष गैर दिसत नसलें तर आपण उगीच कां रडावें किंवा कुंथावें? वागण्यासवरण्याच्याच नव्हे तर नीतिअनीतीच्या कल्पनांबद्दलहि बरेंचसें असेंच आहे. या कल्पनाहि कालमानानुसार बदलत आहेत. पण नवीन कल्पनांना अनुसरूनच नवीन पिढी वाढत आहे आणि त्यामुळें त्या पिढींत त्यांत भिण्यासारखें किंवा लाजण्यासारखें कांहींच दिसत नाहीं. तरुणांबरोबर तरुणीनें फिरणें, हंसणें, खेळणें, हें जुन्या पिढींतल्या लोकांना कसेंसेंच वाटलें तरी नवीन पिढींतल्या लोकांना तें यथायोग्यच वाटतें! चुंबनालिंगनादि प्रकारांबद्दलहि अशीच थोडीथोडी कल्पना बदलत चाललेली आहे, असें स्पष्ट दिसतें; पण या गोष्टींना भिण्यांत किंवा त्यांचा नसता बाऊ करण्यांत अर्थ नाहीं. वैवाहिक नीतीबद्दलहि भाव–भावना बदलत आहेत. हे बदल पूर्व–संस्कारारूढ वा. म. जोशीला विशेष पसंत नसले तरी नव–मननारूढ वा. म. जोशीला त्यांत भिण्यासारखें कांहीं वाटत नाहीं.

माझ्या या आशावादाबद्दल किंवा संग्राहक वृत्तीबद्दल गैरसमज मात्र कोणी करून घेऊं नये. मला कोणतीच गोष्ट अनुचित किंवा अनीतीची वाटत नाहीं असें नाहीं. माझीं कांहीं एतद्विषयक मतें आहेत आणि मला जें अनुचित किंवा अनीतीचें वाटतें तें मी योग्य प्रसंगीं बोलूनहि दाखवितों आणि अधिकार असल्यास गैरवर्तनाबद्दल योग्य दिसेल तें शासनहि करतों, पण मनांतल्या अंतस्थ कोशांत मनाची अशी एक घडी बसून गेली आहे कीं, बाहेरच्या वृत्तिलहरींना अनुसरून माणसानें बोलावें,

चालावें! पण त्या त्या कालाला आणि परिस्थितीला अनुसरून प्रत्येक पिढी वागण्याचा प्रयत्न करीत असते आणि तिचें वागणें आपणास कितीहि अप्रशस्त वाटलें तरी त्याबद्दल वैतागून जाण्यांत किंवा रडत-कढत बसण्यांत अर्थ नाहीं. बरें आपण वैतागलों, रागावलों, जाजावलों, रडलों-रुसलों, तरी नवीन पिढी तत्कालीन प्रवाहाच्या लोंढ्याबरोबर वाहत राहणारच, तेव्हां रुसून, रागावून, आपण आपला मनस्ताप करून घेऊं, यापेक्षां अधिक कांहीं साध्य व्हावयाचें नाहीं. अर्थात् हें सगळें म्हणजे मनांतल्या अगदीं गाभ्यांतल्या कोशांतली वृत्ति! एरव्हीं माझ्या बोलण्या-चालण्यावरून, लिहिण्यावागण्यावरून विशिष्ट रीतभात मला प्रिय आहे किंवा अप्रिय आहे, संमत आहे किंवा असंमत आहे, हें दिसून येतेंच, आणि यावेंहि. किंबहुना दिसून यावें असा प्रयत्नहि करावा. आपला एतद्विषयक राग-लोभ लपविण्यांत कांहीं अर्थ नाहीं, किंबहुना लपविणें हें पाप आहे. पण राग-लोभ दर्शवितांना उगीच अकांड-तांडव करणें योग्य नाहीं, आपणांसच सर्व समजतें असें मानण्यांत अर्थ नाहीं, नवीन पिढी आतां नीतिदृष्ट्या रसातळाला जाणार इतकी भीति बाळगणें अज्ञानाचें लक्षण आहे, इत्यादि गोष्टी मनांत वागवाव्यात एवढेंच माझें म्हणणें आहे.

ही मनोभूमिका स्पष्ट केल्यानंतर भविष्यत्कालीन राजकारणासंबंधीं व समाज-कारणासंबंधीं माझीं मतें दिग्दर्शित करतों. वास्तविक भविष्यत्कालासंबंधानें शास्त्रीय दृष्टया विवेचन करणें फार धोक्याचें, किंबहुना मूर्खपणाचें आहे; कारण असें कीं, अनुमान करण्याला पुरेशी प्रमाणसामुग्री ( data ) कोणाजवळहि नाहीं. तथापि भविष्यत्कालासंबंधीं विचार आल्याशिवाय राहात नाहींत. या विचारांची योग्यता किंवा सत्यता प्रमाणांनीं ठरविणें अशक्यप्राय असतें. तेव्हां तीं प्रमाणभूत समजूं नयेत, तशीं समजलीं जावींत अशी लेखकाची इच्छा नाहीं, एवढें सांगून मतें दिग्दर्शित करण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील राजकारणासंबंधीं बोलाव-याचें म्हणजे मला आपलें असें वाटतें कीं गांधीयुगाच्या उपयुक्ततेचा काळ संपत आला आहे. पुढील निवडणुकीचा लढा ते जिंकतील, आणि जनहिताचीं कामें कॉंग्रेसकडून केलीं जातील. पण ढोंगबाजी आणि असहिष्णुता हीं वाढतील आणि गांधीवादाला पुष्कळशी कलाटणी मिळाली नाहीं तर तो १०-२० वर्षांत अधोगतीलाहि जाईल असें वाटतें. हिंदु-मुसलमान प्रश्न लवकरच सुटेल असें नाहीं. पण मुसलमानांचा चढेलपणा उतरून २०-२५ वर्षांत कांहीं तरी उभयपक्षांना

संमत असा मार्ग निघेल अशी मला अशा आहे. हिंदुस्थानांतल्या राजकारणावर साम्यवादाचा पगडा अधिकाधिक बसेल हें उघड दिसतें आणि तें हितकरहि आहे. पण रशिआमध्यें स्टॅलिनचा कारभार पाहून सद्यःकालीन स्टॅलिन–छाप रशिअन साम्यवाद कितपत हितकर होईल, याबद्दल शंका आणि भीति वाटते. तत्त्वें पुष्कळ चांगलीं असतात, पण मनुष्यस्वभाव बदलणें कठीण असतें आणि उच्च तत्त्वांची अंमलबजावणी करतांना नीच वृत्तींनादेखील वाव मिळतो, हें मला विसरतां येत नाहीं. पण लगेच माझा आशावाद मला सांगतो कीं, मनुष्यस्वभावांतील लोभादि सहजविशेष यांतदेखील परिस्थितीनें बदल होऊं शकेल आणि पुष्कळ कालानंतर साम्यवादी लोकांचें स्वप्न सत्यसृष्टींत उतरूं शकेल,—पूर्णतेनें नाहीं, तरी बरेंचसें उतरूं शकेल, अशी मला तरी आशा आहे.

समाजकारणासंबंधीं बोलतांना प्रथम मागसलेल्या आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांची स्थिति लवकरच सुधारेल असें मला दिसतें. ऐतखाऊ मध्यम वर्ग खालावेल, पण त्यांत वाईट काय आहे ? कांहीं नाहीं. ( पण आहे, थोडेंसें वाईट आहे. उच्च अर्थाची जी संस्कृति तिचें रक्षण आणि वर्धन करण्यास फुरसत असलेला एक वर्ग लागतो. हा वर्ग साम्यवादी समाजांत उत्पन्न होणें अशक्य नाहीं, पण त्याची सोय होऊं शकली नाहीं, आणि स्टॅलिनछाप साम्यवाद प्रबल झाला तर उच्च संस्कृतीला आपण कदाचित् मुकूं अशी भीति वाटते ).

स्त्रियांच्या सुखांत आणि दुःखांतहि पुढें भर पडणार नाहीं. विवाह होणें कांहीं काळपर्यंत तरी कठीण होत जाणार, पण त्यांतूनहि मार्ग निघूं शकेल. शिक्षणाबरोबर, ज्ञानाबरोबर आणि समान हक्कांच्या प्राप्तीबरोबर, त्यांच्या जबाबदाऱ्याहि वाढतील आणि दुःखेंहि वाढतील. पण सुख होईल तें उच्च दर्जाचें होईल. आणि दुःखेंहि उच्च दर्जाचीं होतील. सामाजिक प्रश्नासंबंधीं अनेक भविष्यें मला वर्तवितां येतील, आणि धनुर्धारीच्या कीर्तीत ‘ भविष्य–कथनां ’ चा एक हिस्सा असल्यामुळें माझ्यासारख्या ‘ जोश्या ’ ला भविष्यकथनांत भर घालण्याची इच्छा होणें साहजिक आहे. पण कांहीं वाचकांना तें रुचणार नाहीं, म्हणून हा बौद्धिक खेळ बंद करतों आणि रजा घेतों.

# विद्यार्थी व राजकारण

९

अलीकडे राजकीय धामधुमींचा जो प्रकार सुरू झाला आहे, त्यासंबंधानें कांहीं तरुण विद्यार्थ्यांची व माझी जी संवादात्मक चर्चा झाली तींत तरुण लोकांची आजची मनःस्थिति काय आहे हें कळून येण्यासारखें असल्यामुळें तीं ‘ मौजे ’ च्या वाचकांस देत आहें.

ही मनःस्थिति योग्य आहे का अयोग्य आहे, हा मुद्दा अर्थात् अलाहिदा ! वस्तुस्थितीचें प्रतिबिंब या दृष्टीनेंच ह्या संवादात्मक चर्चेकडे पहावयाचें आहे.

चर्चेकरितां आलेल्या मुलांमध्यें चार विद्यार्थी व दोन विद्यार्थिनी होत्या. दोन विद्यार्थी व एक विद्यार्थिनी शाळेंतील होती. कॉलेजमधील एका विद्यार्थ्यानें एकदमच प्रश्न केला कीं, “ आम्हीं ह्या चळवळींत पडावें कीं नाहीं यासंबंधीं तुमच्याशीं मोकळेपणानें चर्चा करण्यासाठीं आम्ही आलों आहोंत, तरी तुम्ही आमच्याशीं आमच्या प्रश्नांची मनमोकळेपणानें चर्चा करण्यास तयार आहां काय ? ”

“ होय ” असें उत्तर दिल्यावर त्यानें मला विचारलें, “ राष्ट्रीय लढा चालू असतांना आम्हीं त्यांत भाग न घेणें योग्य आहे काय ? ”

मीं उलट प्रश्न केला, “ योग्य आहे याला तरी समर्पक कारणें आहेत काय ? समर्पक कारणें आहेत असें तुम्हांला वाटतें, हें मला माहीत आहे; परंतु मी तुम्हांला जे प्रश्न विचारतों त्यांचीं सरळ उत्तरें द्या. ”

असें म्हणून मी शाळेंतील विद्यार्थिनीकडे बोट दाखवून म्हटलें,—

“ या मुलीला राष्ट्र म्हणजे काय, लढा कशासाठीं आहे, लढ्याला अनुकूल-प्रतिकूल कोणकोणते लोक आहेत, आपल्या शत्रूचें व आपलें बलाबल काय, लढा अयशस्वी झाला तर लढ्यांत पडणाऱ्या व्यक्तीचें आणि राष्ट्राचें नुकसान किती होईल, याची अस्पष्ट तरी कल्पना आहे काय ? ”

त्या मुलीचें नांव घेऊन व त्या शाळेंतील मुलांकडे वळून, " बोला, तुम्हाला या प्रश्नांचीं उत्तरें देतां येतील काय ? " असें मीं विचारलें. तेव्हां ती मुलगी म्हणाली, " मला ह्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येणार नाहींत हें खरें; पण त्याचीं उत्तरें गांधी–जवाहरलाल वगैरे तज्ज्ञांना देतां येतील. व्यवहारांत कुठल्याहि क्षेत्रामध्यें तज्ज्ञाचेंच म्हणणें आपण ऐकितों. रोगाचें निदान आपल्याला करतां येत नसलें तरी तें काम व औषधयोजना आपण डॉक्टरवर सोंपवितों; त्याप्रमाणेंच हिंदुस्थानाला जो राष्ट्रीय रोग जडला आहे, त्या बाबतींत राजकीय डॉक्टरांचेंच म्हणणें आम्ही मान्य करतों."

मीं म्हटलें,–" पण कोणता डॉक्टर केव्हां आणावा, शस्त्रक्रिया कोणाकडून करून घ्यावी, हें तरी आपण विचार करून ठरवतोंच ना ? शस्त्रक्रिया करण्यासाठीं न्हाव्याला कोणी आणीत नाहीं. "

मीं असें म्हटल्याबरोबर कॉलेजांतील एक तरुण उसळला आणि म्हणाला, " गांधी व जवाहरलाल यांना तुम्ही न्हावी म्हणतां काय ? "

मीं उत्तर दिलें, " माझ्या प्रश्नाचा अर्थ चटकन आणि उत्कटतेनें ध्यानांत यावा एवढ्याकरितांच न्हाव्याचा दाखला मीं दिला. तुम्हाला वाईट वाटत असल्यास तो दाखला मी परत घेतों. कारण तुम्हाला काय किंवा मला काय, वाद जिंकण्याची इच्छा नाहीं, तर खरें काय आहे हें पहावयाचें आहे. माझ्या म्हणण्याचा भावार्थ, तुमचें मन न दुखवतां, मी असा सांगेन कीं, राजाजीसारखे कॉंग्रेसभक्त, सावरकरांसारखे स्वातंत्र्यवीर, रॉय व त्यांचे अनुयायी, कम्युनिस्ट वगैरे लोक या लढ्याला अनुकूल नाहींत. त्यांचें मत खोटें आणि गांधी, जवाहरलाल यांचेंच खरें हें ठरविण्याची पात्रता तुमच्यामध्यें किंवा ह्या शाळेंतील मुलांमध्यें आहे काय ? आणि खरेंच, महत्त्वाचा मुद्दा मी विसरलोंच ! गांधी आणि जवाहरलाल सध्यांच्या जाळपोळीच्या धामधुमीला अनुकूल आहेत हें तुम्हांला कोणीं सांगितलें ? "

हा मुद्दा काढल्याबरोबर ती मंडळी गडबडली व एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागली. अर्ध्याएक मिनिटानें शाळेंतील एक मुलगा म्हणाला कीं, " बुलेटीनमध्यें ते अनुकूल आहेत असें म्हटलें आहे. "

यावर मीं म्हटलें, " बुलेटीनमध्यें जें जें येतें तें तें खरें असतें असें तुम्हीं गृहीत धरलेलें दिसतें. "

" अर्थात् " शाळेंतील मुलगी उद्गारली.

मीं म्हटलें, " अर्थात् हा उद्गार म्हणजे प्रमाण नव्हे. " तेव्हां इतका वेळ

स्वस्थ बसलेली कॉलेज विद्यार्थिनी म्हणाली, " ह्या गोष्टी नाजुक आहेत. त्या आमच्या आम्हांला ठाऊक. त्या विश्वासांतील माणसाला समजतील आणि सांगतां येतील. तेव्हां हा मुद्दा आपण सोडून देऊं या. "

" कबूल. " मीं म्हटलें, " आपण गांधी आणि जवाहरलाल या चळवळीला अनुकूल आहेत हें तुमचें म्हणणें चूक नसलें तरी असिद्ध आहे, असें मी मानतों आणि त्यांचीं नांवं वगळून चर्चा करतों. राजकारण तुम्हाला समजत नसलें तरी तुमचा राजकीय तज्ज्ञ डॉक्टर कोण, हें तुम्हाला समजतें हें मीं खरें कां मानावें ? सावरकर, रॉय किंवा राजाजी यांचें नेतृत्व तुम्हाला कां नको याचीं कारणें तुम्ही सांगाल का ? "

यावर शाळेंतील मुलगा उत्तरला, " हे पुढारी आपापल्या परीनें एकेकाळीं चांगले होते; पण आतां ते मागासलेले झाले आहेत. ते भित्रे आहेत. बुरसलेले आहेत. ते आतां म्हातारे झाले आहेत. " तो आणखी कांहीं शिव्या देणार होता, पण कॉलेजमधील विद्यार्थिनीनें त्याला दाबलें व म्हटलें,

" पुढारीपण कुणाचें स्वीकारावयाचें हा ज्याच्या त्याच्या मनाचा प्रश्न आहे. "

मीं म्हटलें, " मनाचाच प्रश्न असेल आणि कारणें कांहीं सांगण्यासारखीं नसतील तर मग चर्चाच थांबली. मग माझ्याकडे येऊन तरी फायदा काय ? "

यावर त्या विद्यार्थिनीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं, व चर्चा थांबल्यासारखीच झाली व सर्व मुलें हिरमुसल्यासारखीं झालीं. कोणीच कांहीं बोलेना. हें पाहून मीं दुसराच मुद्दा काढला आणि विचारलें,

" तुम्ही स्वतः तरी याबद्दल कितीसा विचार केला आहे ? राष्ट्राचें क्षणभर सोडून द्या. तुमचें स्वतःचें नुकसान या चळवळीमुळें किती होईल याचा तरी तुम्हीं आपल्या मनाशीं विचार केला आहे काय ? एखादे वेळेस तुमच्या जन्माचें नुकसान होईल याची तुम्हाला कल्पना आहे काय ? "

" झालें तर झालें " त्यांतले दोन चार जण उद्गारले. " नाहीं तरी आम्ही जगून काय मोठे पराक्रम करणार आहोंत ! "

मीं उत्तर दिलें,—" हें म्हणणें सोपें आहे. पुढें तुम्हाला याचा पश्चात्ताप होईल याचा विचार करा. असा पश्चात्ताप झालेल्या मुलांमुलींचीं उदाहरणें मला माहीत आहेत. बरें, तुम्हीं वडिलांची तरी संमति घेतली आहे काय ? "

" नाहीं. " त्यानें कबूल केलें.

" बरें तुमच्या गुरूंची ? "

" नाहीं " कॉलेजमधल्या प्रौढ विद्यार्थ्यानें सांगितलें व तो लगेच म्हणाला, " ही सगळी मंडळी जुन्या पिढीची आहेत. ती विरुद्ध असणारच. "

मीं उत्तर दिलें, " जुन्या पिढीचीं सर्वच माणसें बरोबर नाहींत, असें का तुम्हाला म्हणायचें आहे ? "

" तसें नाहीं " कॉलेजमधील विद्यार्थिनी म्हणाली, " पण असल्या बाबतींत मुलांबद्दलचें व विद्यार्थ्यांबद्दलचें प्रेम त्यांच्या खऱ्या अंतःकरणप्रवृत्तीला आडवें येत असावें असें मला वाटतें. "

" हें कशावरून तुम्ही म्हणतां ? " मीं विचारलें, तेव्हां शाळेंतील मुलगी म्हणाली, " जाळपोळीचीं वर्णनें वाचतांना आणि बरोबरीच्या मंडळींशीं बोलतांना त्यांची जी वृत्ति दिसून येते त्यावरून आम्ही असें म्हणतों. "

ह्या तिच्या उत्तरामुळें मी थोडासा अडला गेलों. कारण तिच्या म्हणण्यांत तथ्यांश होता. पण चळवळींत पडण्यामध्यें किती धोका आहे याची स्पष्ट जाणीव त्यांना करून देण्याच्या उद्देशानें मी त्यांना ज्या अनेक मुलांमुलींचें पूर्वीच्या चळवळींत जन्माचें नुकसान झालें त्यांची नांवनिशीवार व तपशीलवार माहिती सांगितली आणि अविचार करूं नका, आणखी महिना दोन महिने तरी वाट पहा, माझ्यासारख्या दुसऱ्या अनेक लोकांशीं चर्चा करा, अशा आशयाचा उपदेश केला.

" तुमच्याशीं आणखी चर्चा करावयाची आहे " असें मंडळी म्हणाली.

तेव्हां मीं म्हटलें, " सध्यां मी कामांत आहें. पुन्हां केव्हां तरी या. अजून मला पुष्कळ बोलायचें आहे, व तुम्हांलाहि पुष्कळ सांगायचें असेल; पण सध्यां नको. दोन दिवसांनीं या. "

त्यांना आणखी कांहीं वेळ चर्चा करावयाची होती. कारण त्यांचें कुठल्याहि प्रकारचें समाधान झालें नव्हतें, असें त्यांच्या चर्येवरून मला स्पष्ट दिसलें. तेव्हां मीं म्हटलें, " हा प्रश्न खरोखरच जिव्हाळ्याचा आहे. तुमचीं मनें मी ओळखतों. पण एका बैठकींत व अर्ध्या पाऊण तासांत सगळी चर्चा कशी होईल ? आतां तर मला वेळ नाहीं. वाटल्यास उद्यांच या. "

ह्या मंडळीची जाण्याची इच्छा नव्हती, परंतु मी बैठकींतून उठल्यामुळें व कपडे घालूं लागल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला आणि ती मंडळी गेली.

" उद्यां अगत्य या " असें मीं त्यांना बजावलें. " आठ वाजतां मी मोकळा आहें; वाट पहातों. " असेंहि त्यांच्या समाधानाकरितां मीं अगत्यपूर्वक म्हटलें.

दुसऱ्या दिवशीं नऊ वाजेपर्यंत वाट पाहिली तरी ती मंडळी आलेली नव्हती. नऊ वाजतां ' सकाळ ' हातीं पडला. तेव्हां कारण कळलें कीं, त्यांना मिरवणुकींत भाग घेतल्याबद्दल आदल्या दिवशीं संध्याकाळीं पोलिसांनीं पकडलें होतें !

# मला आलेलीं पत्रें १०

‘ आधुनिक काळांतील पत्रें ’ या विषयावर बोलण्याविषयीं मुंबईतील रेडिओच्या चालकानीं मला विनंति केली होती. मी कांहीं कारणांमुळें हें भाषण करूं शकलों नाहीं; पण त्याविषयीं विचार करूं लागलों तेव्हां कांहीं विचार सुचले ते देण्याचें योजिलें आहे.

* * *

“ तुम्हांला पत्रें पुष्कळ यावींशीं वाटतात का नाहीं ? ” असा जर मला कोणीं प्रश्न केला तर माझ्या स्वभावप्रवृत्तीप्रमाणें ( किंवा स्वभावदोषाला अनुसरून म्हणा पाहिजे तर ! ) ‘ होय ’ आणि ‘ नाहीं ’ असेंच मी उत्तर देईन. संसार जसा हवासा वाटतो आणि कित्येक वेळां नकोसाहि होतो; किंवा पत्नी जशी हवीशी आणि नकोशीहि वाटते, तसेंच येणाऱ्या पत्राचेंहि आहे. बँकेंतील आपल्या खातीं जमा असलेल्या रुपयांच्या संख्येप्रमाणेंच, आपणांला येणाऱ्या पत्रांच्या संख्येवर आपला मोठेपणा शेजारीपाजारी अजमावीत असतात, हें पुष्कळ पत्रें यावींत असें वाटण्याचें एक कारण आहे. आपण फार मोठे आहोंत हें शेजाऱ्यांना वाटावें म्हणून एक गृहस्थ आपणच पुष्कळसे कोरे कागद निरनिराळ्या आकारांच्या आणि रंगांच्या पाकिटांत घालून आणि त्या पाकिटांवर आपलें नांव आणि पत्ता लिहून पोस्टांत टाकीत असे, असें मीं एका कादंबरींत वाचल्याचें आठवतें आणि माझ्या अनुभवावरून बोलायचें म्हणजे माझ्याजवळ राहणाऱ्या एका गृहस्थाला नेहमीं पुष्कळ पत्रें येत असतात याचा मला मनांत थोडासा हेवा वाटतो; पण विचार करूं लागल्यावर दुसऱ्या एका शेजाऱ्याला महिन्यांतून एक-दोनदेखील पत्रें येण्याची मारामार हें लक्षांत येऊन तारतम्यानें आपण मध्यम स्थितींतले तरी आहोंत या विचारानें त्यांतल्या त्यांत मी समाधान मानून घेतों.

* * *

पत्रें येऊं नयेत असें मला कां वाटतें हें सांगण्यापूर्वी, तीं कां यावींशीं वाटतात याचीं आणखी कांहीं कारणें सांगतों. एक कारण असें कीं त्यांमुळें मनुष्यस्वभावांतील कांहीं कांहीं मौजा मला कळून येतात. वर्तमानपत्राच्या धंद्यामध्यें काम करीत असतांना मला एकाचें रागाचें पत्र आलें होतें. माझा गुन्हा काय होता, तर त्या गृहस्थानें एका सभेंत अध्यक्षांचे एका वाक्यांतच आभार मानले होते, पण त्या सभेची हकीकत देतांना मीं त्याचें नांव घातलें नाहीं! तें पत्र वाचल्यानंतर खूण-गांठ बांधून ठेविली, सभेची हकीकत देतांना महत्त्वाचे मुद्दे गळले तरी हरकत नाहीं, पण किरकोळ लोकांचीं नांवें मात्र प्रामुख्यानें द्यावयाला चुकावयाचें नाहीं! दुसऱ्या एका गृहस्थाचें दोन-तीन वर्षांपूर्वी एक दिवस मला रिप्लाय कार्ड जोडलेलें एक पत्र आलें. त्यांत त्यानें धनंजयराव गाडगिळांचा पत्ता मला विचारला होता. धनंजयराव गाडगिळांचा पत्ता त्याला ठाऊक असलाच पाहिजे हें मला माहीत होतें आणि जरी ठाऊक नसला तरी धनंजयरावांचें पत्र त्यांचें नुसतें नांव लिहिलें तरी पुण्यास पोंचेल इतके ते प्रसिद्ध आहेत हें कोणीहि सांगेल. मग त्यानें जोडकार्ड लिहून त्यांचा पत्ता विचारण्याचें कारण काय? कारण असें होतें, कीं त्या गृहस्थाला साहित्यक्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींना पत्रें लिहून आणि साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष कोण व्हावा असल्या प्रकारचे प्रश्न पत्रद्वारें विचारून आणि त्यांचीं उत्तरें इतरांना दाखवून, अमक्या अमक्या साहित्यिकाशीं माझा परिचय आहे, त्यांचें असें असें मत आहे वगैरे गोष्टी मित्रमंडळीला सांगून स्वतःचें महत्त्व वाढवून घेण्याची हौस होती. पूर्वानुभवामुळें त्याची ही खोड मला ठाऊक होती आणि मीं, त्याचीं सातआठ पत्रें आलीं तर उत्तर देण्याचें अजीबात टाळलें होतें. माझ्याकडून एकहि पत्र नाहीं हें त्या गृहस्थाला आपल्याला आपल्या मित्रमंडळींत कमीपणा आणणारे आहे असें वाटूं लागलें आणि कांहीं तरी करून माझ्या सहीचें पत्र मिळवावयाचेंच आणि तें पत्र मित्रमंडळीला दाखवावयाचें या हेतूनें त्या गृहस्थानें धनंजयरावांच्या पत्त्याबद्दलचें पत्र लिहिलें आणि माझ्या सहीचें पत्र मिळविलें! तो गृहस्थ भेटल्यावर त्याच्याशीं ही गोष्ट मीं काढल्यावर त्यानें हें सर्व कबूलहि केलें. मनुष्यस्वभावाचा हा नमुना विचारार्ह नाहीं काय?

* * *

मनुष्यस्वभावाची दुसरी एक मौज एका शिक्षकाच्या पत्रावरून कळली. हा गृहस्थ मान खालीं घालून शिकवावयाचा. मुलींना प्रश्न विचारणें, सावकाश

बोलणें, फळ्यावर लिहिणें वगैरे तांत्रिक गोष्टी त्याला चांगल्याशा जमावयाच्या नाहींत म्हणून त्याची मुदत संपल्यानंतर पुढच्या वर्षाकरितां त्याची नेमणूक करण्याविषयीं मीं शिफारस केली नाहीं. सर्टिफिकेट मागण्यास आल्यावर त्याला बऱ्यापैकीं सर्टिफिकेट दिलें. हेतु हा, कीं त्याचें नुकसान होऊं नये. आणखी एक-दोन वर्षें शिकविण्याचा अनुभव आल्यावर तो चांगला शिक्षक होईल हें मला ठाऊक होतें आणि पुढें तो चांगला शिक्षक म्हणून प्रसिद्धहि झाला; पण एकदोन वर्षें आणखी जो अनुभव घ्यावयाचा तो आमच्या शाळेच्या खर्चानें नको म्हणून त्याची नेमणूक पुन्हा न करतां सर्टिफिकेट मात्र बरें दिलें. या गृहस्थानें या सर्टिफिकेटाचाच आधार घेऊन मला पत्र लिहिलें, कीं तुम्ही मला सर्टिफिकेट चांगलें देतां आणि नेमणूक करीत नाहीं हा मोठा अन्याय आहे वगैरे वगैरे. वरिष्ठांकडे त्यानें तक्रारहि केली. त्याचें कांहीं चाललें नाहीं, पण त्याच्या पत्रावरून एक धडा शिकलों, कीं एखाद्याचें बरें व्हावें म्हणून चांगलें सर्टिफिकेट देणेंहि धोक्याचें आहे. ' ज्याचं करायला जावं बरं, तो म्हणतो आपलंच खरं ' ही म्हण मीं ऐकली होती. या वेळेपर्यंत या म्हणीच्या सत्यतेचा अनुभव आलेला नव्हता तो मात्र त्याच्या पत्रानें आला, हा मी स्वतःचा मोठाच फायदा समजतों. आणि मनुष्यस्वभावांतील विशेष पटवून देणारीं आणखी अशींच पत्रें यावींत असें इच्छितों !

❧ ❧ ❧

कांहीं पत्रें मला अशीं येतात कीं तीं वाचून मला घटकाभर तरी मूठभर मांस चढल्यासारखें वाटतें. आपली अमुक कादंबरी वाचून फार आनंद झाला अशा आशयाचीं पत्रें वाचून कोणत्या कादंबरीकाराला आनंद वाटणार नाहीं ? माझी ' रागिणी ' प्रसिद्ध झाल्यावर लगेच एका गृहस्थानें अशा आशयाचेंच पत्र, पण बायकी अक्षर काढून मला अनामक लिहिलें होतें आणि माझें काय उत्तर येतें ही मौज पाहण्याची इच्छा धरली होती ! मला तें पत्र पाहून अर्थात् आनंद झाला, पण सुदैवानें मीं पत्राचें उत्तर लिहिलें नाहीं. उत्तर लिहिलें असतें तर त्यानें माझी फारच टिंगल केली असती. ज्या गृहस्थानें मला हें पत्र लिहिलें तो माझा मित्र झालेला आहे आणि एका संस्थानांत आतां मोठा पगारदार आणि हुशार असा अधिकारी आहे; पण त्याच्यामधें थोडी वात्रटपणाची छटा जी होती ती अद्यापिहि त्याच्यामध्यें दिसून येतेच !

❧ ❧ ❧

सं. नं. ता.

माझें 'नीतिशास्त्रप्रवेश' वाचून पुष्कळांनीं मला उत्तेजनपर आणि प्रशंसात्मक पत्रें लिहिलीं. त्यांतल्या त्यांत दोघांच्या पत्रांचा मात्र उल्लेख करावासा वाटतो. एकाच्या नांवाचा उल्लेख करतों, पण दुसऱ्याला तें आवडणार नाहीं म्हणून मनांतच त्याचें ऋण स्मरून त्यांच्या पत्रांचा आशय सांगतों. गुणवर्णन सांगण्यांत अर्थ नाहीं. सांगण्यासारखा मुद्दा असा होता, कीं त्यांनीं माझ्याकडून कांहीं प्रती मागविल्या आणि त्या मित्रमंडळींत खपविण्याचें आश्वासन दिलें. दक्षिण हैदराबादेंतील सुप्रसिद्ध पुढारी आणि न्यायाधीश नामदार केशवराव यांनीं आपण होऊन, माझी विशेष ओळख नसतां, माझें पुस्तक खपविण्याचें काम अंगावर घ्यावें, या मोठेपणापुढें कोणाची मान आदरानें नम्र होणार नाहीं? दुसरेहि असेच एक थोर गृहस्थ एका संस्थानांत पेन्शनदार आहेत, पण त्यांचें नांव आतां प्रकट करीत नाहीं. 'नीतिशास्त्रप्रवेश' या पुस्तकामुळें किंवा इतर पुस्तकांमुळें थोडीबहुत जी द्रव्यप्राप्ति आणि यशःप्राप्ति झाली त्यामुळें आनंद व्हावयाचा तो मला होतोच, पण वरच्यासारखीं पत्रें वाचून आणि मनुष्यस्वभावांतील थोरपणा मनांत येऊन हृदय खरोखर अद्यापिहि भरून येतें.

❦ ❦ ❦

विद्यापीठांतील परीक्षांच्या परीक्षकांना 'अमुक नंबर ध्यानांत ठेवा' अशा अभिप्रायाचीं पत्रें येतात असें म्हणतात. मला कांहीं तसलीं पत्रें आलेलीं नाहींत. पण एक मात्र सांगण्यासारखें आलें होतें. बनारस हिंदु विद्यापीठाच्या एका परीक्षेला एक उमेदवार बसला होता. त्यानें पत्रांत मला लिहिलें होतें, कीं "या परीक्षेला मी अनेकदां बसून अयशस्वी झालों आहें आणि आतां अशी परिस्थिति आली, कीं यंदा पास झालों नाहीं तर मला आत्महत्या करावी लागेल. तरी आत्महत्येचें पातक लागूं नये अशी इच्छा असल्यास मला पास करावें." हा उमेदवार एप्रिलमध्यें भर उन्हामध्यें एकदोन वाजतां हिंगण्यास मला लगेच भेटलाहि आणि त्यानें आपली हृदयद्रावक हकीकत सांगितली. त्याची ती अवस्था पाहून आणि हकीकत ऐकून मार्क वाढविण्याचा मोह मला कदाचित् झाला असता; पण माझ्या सुदैवानें आणि त्याच्या दुर्दैवानें मार्कांची यादी आणि उत्तरपत्रकेंहि मीं अगोदरच बनारसला पाठवून दिलीं होतीं. त्याचें तें पत्र 'सुशिक्षितां'च्या (?) बेकारीवर आणि शिक्षणांतील उणीवांवर चांगलाच प्रकाश पाडणारें होतें, यांत शंका नाहीं.

❦ ❦ ❦

आत्महत्येचा आतां उल्लेख केला त्यावरून दुसऱ्या एका आत्महत्या-वादी पत्राची आठवण होत आहे. एकादोघांनीं कांहीं वर्षांपूर्वी मला आपली परिस्थिति पत्रद्वारें कळवून अशा परिस्थितींत आत्महत्या कां करूं नये असें मला विचारलें होतें. हा प्रश्न मलाच विचारण्याचें कारण म्हणजे माझें 'नीतिशास्त्र-प्रवेश' हें पुस्तक ! या पुस्तकामुळें नीतिविषयक प्रश्नांसंबंधीं कांहीं लोक मला तज्ज्ञ समजतात. सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान बरोबर असो किंवा नसो, सत्याग्रहाचे बाबतींत गांधी हे निःसंशय तज्ज्ञ आहेत, तसा मी नीतिविषयक प्रश्नाबाबत खात्रीनें नाहीं. पण कांहीं लोक माझ्यावर या गुणाचा आरोप करतात, हें प्रथमदर्शनीं जरी मनाला आनंददायक वाटलें तरी विचारांतीं तें दुःखदायकच होतें. विशिष्ट प्रेमविषयक पेंचप्रसंगांत कसें वागावें याविषयींहि कांहीं पत्रें मला आलीं आहेत. पण अशा पत्रांना मी काय उत्तर देणार ? आत्महत्या करणाऱ्याची परिस्थिति सुधारण्याचें माझ्या हातांत नाहीं, आणि मनःस्थिति सुधारणें हें उपदेशामुळें होऊं शकेल असें मला वाटत नाहीं. अमक्यावर प्रेम करणें किंवा करण्याचें थांबविणें हें सुद्धां उपदेशावर फारसें अवलंबून नसतें. त्या त्या परिस्थितींतल्या त्या त्या व्यक्तीनें हे प्रश्न सोडवावयाचे असतात; दुसऱ्याच्या सांगण्यानें प्रेम कोणी करूं शकत नाहीं किंवा आवरूंहि शकत नाहीं, असें मला वाटतें. निदान पत्रांत वर्णिलेले पेंचप्रसंग ज्यांचेवर आलेले असतात ते इतके बिकट असतात, कीं तेथें माझ्यासारख्याला तरी उपदेश करण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. हीं पत्रें वाचून या लोकांच्या साध्याभोळ्या, सरळ, सात्त्विक स्वभावाचें कौतुक वाटतें. त्यांच्या मनाचा मोकळेपणा पाहून आनंद होतो. आपल्यावरची त्यांची श्रद्धा पाहून स्वतःला क्षणभर धन्यता वाटते, पण विचारान्तीं आपल्या व्यावहारिक ज्ञानाच्या आणि नैतिक योग्यतेच्या आणि अधिकाराच्या मर्यादा ध्यानांत येऊन मनाला विषण्णता मात्र येते !

❧ ❧ ❧

प्रथमदर्शनीं आनंद आणि नंतर असेंच दुःख देणारीं पत्रें म्हणजे खांडेकर किंवा माडखोलकर यांच्या अमुक कादंबरींतील अमुक प्रसंगाबद्दल किंवा घटनेबद्दल तुमचें काय मत आहे वगैरे विचारणारीं पत्रें. आमच्या कादंबरीला किंवा पुस्तकाला तुम्ही प्रस्तावना लिहाल काय किंवा त्यावर अभिप्राय द्याल काय असें विचारणारीं पत्रेंहि याच सदरांत येतात हें आपणांला भूषणावह आहे

असें तर वाटतें; पण अनेक कारणांमुळें विनंति अमान्य करावी लागत असल्यामुळें आणि त्यामुळें गैरसमज होण्याचा संभव असल्यामुळें वाईटहि वाटत असतें !

* * *

" मग खरोखरीच तुम्हांला पुष्कळ पत्रें येऊं नयेत असें वाटतें काय ? " असें जर मला कोणी विचारलें तर उत्तर देणें मात्र, अगदीं पहिल्या प्रथम म्हटल्याप्रमाणें, कठीण आहे. मुलें अंगाशीं बिलगून त्रास देऊं लागलीं म्हणजे तीं नकोशीं वाटतात, पण घरांत नसलीं तर चैन पडत नाहीं. तसेंच पत्रांचेंहि आहे. बरेच दिवसांत कोठूनहि पत्र आलें नाहीं म्हणजे जनाशीं आपला संबंध तुटत चालला, आपली जगाला फारशी जरूर वाटत नाहीं, आपल्याबद्दल अगत्य कोणाला वाटत नाहीं, असें वाटूं लागतें आणि डाकवाला आपल्या घरावरून आपल्याला पत्र न देतां गेला म्हणजे वाईट वाटूं लागतें. पण पत्र आल्यावर एखादे वेळेस इन्कम्-टॅक्स तुमच्यावर इतका बसविला आहे असें पत्र येतें, किंवा विम्याच्या हप्त्याची आठवण केली जाते किंवा अमक्याला एखादा लेख देण्याचें अभिवचन दिलेलें असतें तो लेख पाठवून देण्याबद्दल तगादा लावलेला असतो; किंवा अमक्या मासिकाची किंवा संस्थेची वर्गणी पाठवून द्यावी, नाहीं तर व्ही. पी. करण्यांत येईल अशी सौम्य शब्दांत धमकी दिलेली असते ! कोणी आदरणीय गृहस्थ संस्थेंत अमक्या अमक्या मुलीला नादार घ्यावी म्हणून शिफारस करतो आणि न कळत मला संकटांत घालतो; तर दुसरा संस्थेंतली एखादी विधवा विवाह करण्यास मिळाली तर लांच म्हणून संस्थेला अमुक अमुक रक्कम ' देणगी ' म्हणून देणेचें अभिवचन देऊन संताप उत्पन्न करतो ! बरें, हे त्रास आणि मनस्ताप अगदींच नको असतात असेंहि नाहीं ! त्यांतहि आनंद मानण्याची कला मनुष्याला साधलेली आहे; इतकेंच नव्हे तर असले त्रास आणि मनस्ताप, पत्रें अजीबात न येण्यानें बंद पडले, तर त्याला चुकल्याचुकल्यासारखें होतें आणि ' यशवन्त ' कवीनें आईविषयीं आपल्या सुंदर कवितेंत असें म्हटलें आहे कीं, " ये रागवावयाही परी येइ येइ वेगें " त्याप्रमाणेंच येणाऱ्या पत्रांबद्दल मला रूक्ष गद्यांत म्हणावेंसें वाटतें कीं, " पत्रांनो, तुमच्या लेखकांच्या मनाचा थिल्लरपणा व्यक्त करा, भाबडेपणा सिद्ध करा, क्षुद्रपणाचा पुरावा द्या, मूर्खपणा नजरेस आणा, किंवा तुमच्या

आगमनामुळें माझ्या द्रव्य-दारिद्र्याची आठवण करून या, बुद्धिदारिद्र्याची जाणीव उत्पन्न करा, किंवा ताप–संताप उत्पन्न करा, पण या; अगत्य या, ताप–संताप उत्पन्न करण्याकरितां या. ” मानवी मन हें असें आहे.

## स्वतःचा स्वयंवर ११

' स्वयंवर ' हा शब्द उच्चारला म्हणजे नल–दमयंती, कृष्ण–रुक्मिणी, राम–जानकी इत्यादि पौराणिक युग्मांची आपणांस आठवण होते. यांच्या स्वयंवराच्या कथा चांगल्याच आहेत; पण आज ज्या स्वयंवराविषयीं मी लिहिणार आहें तो मला तरी सर्वांपेक्षां अधिक महत्त्वाचा वाटतो. कारण तो माझा स्वतःचा आहे. रुक्मिणी, जानकी वगैरे स्त्रियांनीं आपल्या स्वयंवरांची या आपल्या सखीजवळ हकीकत सांगितली त्याप्रमाणेंच मला जो स्वयंवर करावयाचा आहे त्याची हकीकत मी सांगणार आहें. विवाहकथांना कंटाळलेल्या वाचकमित्रा, वरील वाक्य वाचल्याबरोबर तूं पान उलटून पुढील लेखाकडे वळूं पाहशील, पण तसें करूं नकोस. मी आपल्या खऱ्या लग्नाची गद्यात्मक हकीकत सांगत नाहीं. मला शारीरिक लग्नाविषयीं लिहावयाचें नाहीं तर योजिलेल्या आत्मिक लग्नाविषयीं. प्रत्येकाचा आत्मा हा ' वर ' आहे, पण बिचाऱ्याच्या गळ्यांत कधीं माळ पडत नाहीं. कारण तो ज्याचा त्यालाहि सांपडत नाहीं. माझा आत्मा कोठें आहे ? कसा आहे ? मी कोण ? माझ्या मनांत अनेक ' मी ' वावरत आहेत, त्यांतील खरा ' मी ' कोणता ? इन्द्रादि देवांनीं नलराजाचें हुबेहूब सोंग घेतल्यामुळें स्वयंवरकालीं बिचाऱ्या दमयन्तीची जशी शोचनीय अवस्था झाली, व ती जशी ' देवहो, मी पायां पडतें, पदर पसरतें, खरा नल कोणता हें कृपा करून मला दाखवा ' असें काकुळतीनें म्हणूं लागली, तशी प्रत्येक मननशील संसारी आत्म्याची स्थिति होते. माझा खरा आत्मा कोणता ? खरा मी कोणता ? पोटाकरितां नोकरी करणारा मी खरा, का देशभक्तीचीं व्याख्यानें देणारा मी खरा, का बायकोशीं घरगुती गोष्टी बोलणारा मी खरा, का मित्रांशीं गप्पागोष्टी सांगणारा व पाचकळपणाहि करणारा मी खरा ? का यांपैकीं कोणताहि मी खरा नाहीं ! हीं सर्व सोंगेंच म्हणावयाचीं कीं काय ? मग माझा खरा मी कोठें आहे ? सांगा, कोणी तरी सांगा !

सीतेला रावणानें समुद्रापलीकडे नेऊन ठेविली, म्हणून ती रामाला सांपडली नाहीं; ऊर्वशी एका शापाच्या प्रभावानें लताच होऊन गेली, म्हणून ती पुरूरवराजाला सांपडली नाहीं; पण माझा आत्मा मलाच सांपडूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? माझी ओळख मला असावयाची नाहीं, तर मग कोणाला असावयाची ? परक्याला ? माझी मला ओळख नसेल, तर मला कांहींच कळत नाहीं म्हटलें पाहिजे. ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटीस यानें केलेला ' Know thyself ' हा गुरूपदेश, किंवा 'आत्मा वाऽरे मन्तव्यः श्रोतव्यः निदिध्यासितव्यः ' हा उपनिषदांतील उपदेश एका अर्थी चमत्कारिक दिसत नाहीं का ? Know thyself ! जणूं काय मी म्हणजे कोणी परका पुरुष आहे आणि त्याची नि माझी महाप्रयासानें ओळख करून घ्यावयाची आहे. उपनिषदें सांगतात ' आत्म्याचें चिंतन करा. ' कशाला तें ? आपलें स्वतःचें चिंतन करण्यापेक्षां लोकांचें चिंतन केलें तर ? सृष्टिसौंदर्य पहात राहिलें तर ? सत्पुरुषकथांचें श्रवण करीत राहिलें तर ? आत्मचिंतन करण्यांत काय फायदा ? तसेंच जर पाहूं गेलों तर मी मी असा कोण आहे ? इतर पदार्थांचा–अनात्म्याचा–अत्यन्ताभाव कल्पिला तर आत्म्याचाहि अभाव सिद्ध होतो. कारण इतर पदार्थांच्या किंवा गुणांच्या अभावीं आत्म्याला तुम्ही कोणतें विशेषण देणार आणि कोणतें क्रियापद लावणार ? अनात्म्याच्या अभावीं ' आत्मा आहे ' एवढें फार तर म्हणतां येईल; पण काय आहे, कसा आहे हें कांहीं एक सांगतां येणार नाहीं. मग ' आत्मा आहे ' या केवळ अस्तित्वदर्शक विधानांत काय अर्थ आहे ? तेव्हां सांगण्याचा भाव काय, तर केवळ आत्म्याचें-अनात्म्याशीं असंबद्ध असलेल्या आत्म्याचें–चिंतन किंवा मनन किंवा निदिध्यासन केल्यानें कोणतें बौद्धिक किंवा पारमार्थिक कल्याण साधणार आहे ?

'आत्म्याचें चिंतन कर' याचा अर्थ कदाचित् असा असेल–असेल कां—आहेच, कीं तुझा खरा आत्मा कोणता आणि तुझ्या आत्म्याचें सोंग घेणारे आत्मे कोणते, याचा विचार कर. इंद्र गौतमऋषीचें सोंग घेऊन अहल्येकडे गेला असतां ती जशी फसली तसे आपण सोंगाड्या आत्म्यांना फसतों. खरा, शुद्ध, सात्त्विक, परमार्थप्रिय आत्मा जरासा सुप्त झाला रे झाला, कीं लागलीच खोटा, विषयलोलुप, राजसी, सुखप्रिय आत्मा ' मीच खरा आत्मा ' असें म्हणूं लागतो, व अहल्येप्रमाणें आपण या आत्म्याला भुलून त्याच्या पापवासनेला बळी पडतों. दुर्दैव हें कीं, गौतमऋषि जसा स्नान करून लवकर परतला व त्यानें इंद्राला व अहल्येला शापिलें तसा आपल्या

दुरात्म्याला आपला सदात्मा शापदग्ध करीत नाहीं. उलट तो बहुधा सुप्त राहातो व त्यामुळें आपल्या हृदयांत दुरात्म्यांचा बराच सावळागोंधळ चालतो,—इतका कीं कधींकाळीं खरा आत्मा जागृत झाला तर त्याची आपल्या घरींहि सत्ता चालणें कठिण पडतें ! तेव्हां उपनिषत्कार म्हणतात कीं, बाबा रे, तुझा खरा आत्मा, तुझा खरा यजमान, तुझा खरा प्राणसखा कोण, याचें मनन कर, त्याचा निदिध्यास लागूं दे, त्याचें सौम्य, सात्त्विक व उज्ज्वल स्वरूप आपल्या डोळ्यांत सांठवून ठेव, म्हणजे राजसी, सुखाभिलाषी, ढोंगी, नाटकी आत्म्यांच्या सोंगांना तूं फसणार नाहींस. 'नाटकी'! होय, नाटकी, सोंगाड्या आत्मा. प्रत्येक मनुष्य नट आहे. कोणी म्हणतात कीं, नटाचें काम फार कठिण आहे; पण प्रत्येकजण तें अहर्निश करीत आहे ! मित्रांशीं, मुलांशीं, बायकोशीं बोलतांना मनुष्याचा खरा आत्मा आपलें स्वरूप प्रगट करीत नाहीं; खरें स्वरूप प्रगट करीत असता तर आपण असंतुष्ट कां असतों ? संसारांत कशांतहि आपणांस पूर्णसंतोष होत नाहीं याचें एक कारण हेंच नाहीं का, कीं आपण जें जें करितों तें तें आपल्या खऱ्या उच्चतम आत्म्याला पूर्णपणें संमत किंवा प्रिय नाहीं. ही जाणीव आपल्या मनाच्या एका कोपऱ्यांत दडून राहिलेली असते, जो आत्मा संतुष्ट–आत्मरत–झाला तो पशु तरी असला पाहिजे किंवा खरोखरीच स्थितप्रज्ञ, किंवा ब्रह्मवेत्ता असला पाहिजे. कोणी आत्मसंतुष्ट नसला तर त्याचा साधारणपणें हाच अर्थ समजावा कीं, त्याच्या खऱ्या आत्म्याला खोट्या आत्म्याचीं सोंगें व ढोंगें आवडत नाहींत.

हें सर्व खरें; पण खऱ्या आत्म्याची प्राप्ति कशी करून घ्यावयाची ? आत्म्यासारखी जवळची वस्तु कोठें नसेल, पण आत्मप्राप्ति थोड्यांनाच होते. एक तर मनुष्याचीं ध्येयें वारंवार बदलत असतात. 'मीं कोण असावें' हें स्थिर नसल्यामुळें 'मी कोण आहें' हें समजत नाहीं. किंबहुना 'कोण असावें' हें स्थिर होणें याचेंच नांव आत्मलाभ. साधारण मनुष्याला आज 'संसार करावा नेटका' असें वाटतें, तर उद्यां दुसरीच कांहींतरी इच्छा होते; कधीं देशसेवा करावीशी वाटते, तर कधीं इंद्रियपूजेची आवड वाटूं लागते; कधीं मुलाबाळांचें संगोपन करणें कर्तव्य वाटतें, तर कधीं त्यांची व आपली राखरांगोळी झाली तरी हरकत नाहीं, पण परमार्थप्राप्ति करून घ्यावी अशी इच्छा प्रबळ होते. ज्या क्षणीं जी इच्छा प्रबळ होते, त्यावेळीं तिचे खेळ आपल्या आत्म्याला असंतुष्ट प्रेक्षकाप्रमाणें पहात बसावे लागतात. हृदयाच्या रंगभूमीवर नाच करणारे औट घटकेचे राजे 'मीच

खरा हृदयाचा राजा, सखा, यजमान,' असें म्हणत असतात. पण आत्मा जरी देहबद्ध असला तरी तो दमयन्तीप्रमाणें या औट घटकेच्या सोंगी राजांना माळ घालीत नाहीं व 'माझा खरा प्राणसखा वेगळाच आहे' असें म्हणून तो केव्हां येईल आणि मला आपल्या खऱ्या स्वरूपांत केव्हां भेटेल याची मार्गप्रतीक्षा करीत असतो.

कोणी म्हणतात, पुष्कळ विद्या मिळविली म्हणजे 'आत्मा' आपल्याला वरतां येईल; कोणी म्हणतात, बुद्धिमत्तेशिवाय हें भाग्य प्राप्त व्हावयाचें नाहीं, पण उपनिषत्कार सांगतात—

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुना श्रुतेन।**
**यमेवैष वृणुते तेनैव लभ्यः तस्यैष आत्मा वृणुते तनूं स्वाम्॥**

"हा आत्मा प्रवचनानें म्हणजे त्याविषयीं पुष्कळ बोलल्यानें प्राप्त होत नाहीं, बुद्धिमत्तेनें प्राप्त होत नाहीं, बहुश्रुतपणानेंहि नाहीं, तर ज्याला तो वरील त्याला वरील; आणि एकदां त्यानें वरलें म्हणजे मात्र आपलें खरें स्वरूप तो व्यक्त करतो आणि मग त्या दोघांमध्यें कांहीं एक आडपडदा राहत नाहीं."

या बोधांतील पहिला भाग खरा वाटतो. कारण आत्मलाभाचा आणि विद्वत्तेचा, वक्तृत्वाचा किंवा बुद्धिमत्तेचा विशेष निकट संबंध नाहीं हें कबूल केलें पाहिजे. पण दुसऱ्या भागावरून एखादा मनुष्य निराश व दैववादी बनण्याचा संभव आहे. आत्म्याचा स्वयंवर कशावर अवलंबून आहे हें त्यांत सांगितलें नसल्यामुळें मन घोंटाळून जातें. आत्मप्राप्ति विद्वत्तेनें मिळणार नाहीं, बुद्धिमत्तेनें मिळणार नाहीं, हें खरें; पण मिळणार कशानें? का कशानेंहि नाहीं? त्याला जेव्हां वाटेल तेव्हां तो आपला प्राणसखा आपणाला भेटेल, असा तो निष्ठुर आणि एककल्ली का आहे?

नाहीं, तो तसा नाहीं. तसा असता तर मग त्याच्या प्राप्तीकरितां एवढा कोणी उत्सुक झालाच नसता—आपला प्राणसखा दुराग्रही नाहीं, लहरी नाहीं, क्रूर नाहीं; तसा असता तर मग त्याची आपण एवढी मार्गप्रतीक्षा कशाला केली असती? तो आपणांला अभिसारिकेप्रमाणें एखादे वेळेसच भेटतो, आणि परमानंद देऊन जातो याचें कारण त्याचें चंचलत्व नव्हे, तर आपलें चंचलत्व. आपलें मन यत्किंचित्‌हि चळलेलें त्याला खपत नाहीं; आपल्या मनांत परक्याचा प्रवेश

झाला कीं, तो लगेच आपली मिठी सोडून रुसून निघून जातो. परक्याचा एवढा वास देखील जर त्याला खपत नाहीं तर तो एखादे वेळेस तरी कशाला भेटीला येतो, असें आपणांला वाटतें, पण क्षणभरच वाटतें. कारण त्या प्राण-सख्याशीं ज्याची थोडा वेळ तरी गांठ पडली आहे, ज्यानें त्याच्या संगतीचें क्षणभर तरी निरतिशय सुख भोगलें आहे, तो मोहानें त्याच्यावर कदाचित् रुसेल, रागावेल, पण त्याला कधीं विसरणार नाहीं, किंवा त्याचें ' दर्शन नको ' असें म्हणणार नाहीं.

या अशा आत्म्याची निरंतर प्राप्ति करून घ्यावयाची असेल तर त्याला उपायहि आपल्याला सुज्ञ शास्त्रकारांनीं सांगितलेला आहे. हा स्वयंवर सीतेच्या किंवा दुसऱ्या अशाच स्वयंवरांपेक्षां दुर्घट आहे. कारण शिवाचें धनुष्य वांकविणें या पराक्रमानें किंवा अशाच बाहुबलाच्या पराक्रमांनीं आत्मा आपणांस माळ घालीत नाहीं. मन वांकवितां येणें हें शिवधनुष्य वांकविण्यापेक्षांहि कठिण काम आहे. हें काम वैराग्या-नंतर–खऱ्या वैराग्यानंतर–व सतत अभ्यासानें साध्य होईल. या उपायांनीं मन वांकवितां आलें म्हणजे मग स्वयंवराकरितां उमेदवारी करण्याची पात्रता येते. याच्या-पुढें श्रवण–मनन–निदिध्यासाच्या पायऱ्या सांगितलेल्या आहेत. या ओलांडून गेल्यावर मग आत्म्याच्या महालांत प्रवेश होतो व तेथें एकमेकांची दृष्टादृष्ट झाली म्हणजे मग स्वयंवराला अवकाश लागत नाहीं.

# माझ्या अनुभवाचें व विचाराचें सार १२

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम्
धर्माभासप्रसक्तैर्यत्सद्धर्मो नाशितः खलु १
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्
यज्जातिधर्ममोहेन हन्तुं स्वजनमुद्यताः २
सत्य–सौंदर्य–सौजन्यासक्तिधर्मो हि तात्त्विकः
वेष–भाषा–जाति–वर्णा गौणाश्चैवानुषंगिकाः ३
न श्रोष्यति जनः कश्चिज्जानन्नपि विरौम्यहम्
जनतानामके देवे भक्तिर्योजयते हि माम् ४

—उद्बाहु **वामन**

**सिंध** हैद्राबाद येथील तुरुंगांत असतांना मला पुढील अनुभव आला. रोज ४० पौंड जोंधळे पिसण्याचें [ दळण्याचें ] सक्त काम माझ्याकडे आलें असतां माझ्यावर देखरेख करण्याकरितां जो मुकादम–कैदी ( Convict Overseer ) नेमलेला होता तो पठाण होता व त्याला हिंदुस्थानांतील कोणतीहि भाषा मुळींच येत नव्हती. हिन्दीचें त्याचें आणि माझें ज्ञान 'इधर आव, उधर जाव' अशा प्रकारच्या पांचदहा वाक्यांपलीकडे विशेष कांहीं नव्हतें. तो त्यावेळीं रमजानच्या उपासांमुळें व दीडदोन वर्षें कैद अनुभवल्यामुळें अत्यन्त कृश झाला होता. त्याचा वेष निराळा, भाषा निराळी, आवडीनिवडी निराळ्या, जाति निराळी, धर्म निराळा, तथापि तो त्या अशक्त स्थितींत मला आपली पोळी देत असे व चक्की पिसण्यास मदत करीत असे. नको नको म्हटलें तरी ऐकत नसे. त्याचें हें करणें जेलच्या नियमांच्या विरुद्ध असे. जर का तो हें करतांना पकडला गेला असता तर त्याची पगडी गेली असती, म्हणजे त्याची मुकादमी गेली असती आणि सामान्य कैद्याप्रमाणें

त्याला पुनः सख्त काम करावें लागलें असतें. हा इतका धोका असतांना तो मला इतक्या आग्रहानें कां मदत करीत असे? पुष्कळ दिवसांचा उपवास, दिवसा पोटांत अन्न नाहीं, अशा स्थितींत तो चक्की पिसूं लागला म्हणजे घामाघूम व्हावयाचा, दीर्घ श्वास घेऊं लागावयाचा आणि जोंधळ्याची ती भली मोठी रास आपल्या मदतीनेंहि संपणें शक्य नाहीं असें पाहून व मला पुढील क्रमप्राप्त शिक्षा होणार हें मनांत आणून तो हळहळत असे आणि पुनः जोर करून रास कमी करण्याचा प्रयत्न करीत असे. शेवटीं दळलेलें पीठ नेण्याकरितां जेव्हां दुसरा मुकादम येई तेव्हां तो मला पुरतें काम न झाल्याबद्दल माफी व्हावी याबद्दल कांहीं तरी सबबी सांगून रदबदली करीत असे. असें तो कां करीत असे याचा विचार करूं लागल्यावर मला पुस्तकांच्याद्वारां नव्हे तर स्वानुभवानें असें दिसून आलें कीं सौजन्य हें वेष, भाषा, जाति, किंवा धर्म यांवर अवलंबून नसून तें 'माणुसकी'वर अवलंबून आहे, आणि ही माणुसकीच मनुष्याला मनुष्यत्व देते, निदान मनुष्यत्वामध्यें ही माणुसकी हेंच प्रधान अंग आहे. तो पठाण अगदीं अशिक्षित होता व त्याची सौंदर्याभिरुचि विशेष विकसित नव्हती म्हणून मनुष्याचें पूर्णत्व त्याचे अंगीं नसेल, पण ज्याचा बौद्धिक विकास पुष्कळ झाला आहे आणि कलाजन्य आनंद ज्याला पुष्कळ उपभोगितां येतो पण वरील माणुसकी ज्यामध्यें नाहीं, अशा माणसापेक्षां तो पुष्कळ बरा असें मी तरी म्हणेन!

ह्या कैदी मुकादमानें आणि मीं तुरुंगाचे नियम मोडले हें गैर केलें किंवा काय हा प्रश्न प्रस्तुत प्रसंगीं गौण आहे. मुद्दा असा कीं, माणुसकी ही शिक्षण, वेष, भाषा, धर्म इत्यादिकांवर विशेष अवलंबून नाहीं. आणि या प्रश्नासंबंधीं महत्त्वाचा असा दुसरा एक माझा अनुभव—जेलमधलाच अनुभव—असा कीं, एका अधिकारारूढ 'सुशिक्षित' डॉक्टरानें मी त्याचा समानधर्मी असतांना व आमांशानें आजारी असतां स्वच्छतेच्या दृष्टीनें अत्यन्त आवश्यक असलेली लंगोटी देखील देण्याचें नाकारलें आणि आरोग्याला अपायकारक व अत्यन्त गलिच्छ झालेल्या अशा लंगोट्यांवर लज्जारक्षणाचें काम मला भागवावयास लावलें! वास्तविक डॉक्टरांचें स्वच्छतेकडे अधिक लक्ष असावयाचें आणि अधिकारारूढ डॉक्टरानें आरोग्याच्या दृष्टीनें अमुक एक गोष्ट आवश्यक म्हटली असतां कोणालाहि ती नाहीं म्हणतां यावयाची नाहीं. पण या डॉक्टरबहाद्दरानें भर पावसाळ्यांत गळत असलेल्या खोलींत ओल्या जागेवर निजावयास लावून व दांत दुखत असल्यामुळें चर्वण करणें अशक्य

असतां भाकऱ्या खावयास देऊन हा आमांश अप्रत्यक्षपणें आपणच उत्पन्न केला असतां आणि सर्व गोष्टी समजत असतां व पूर्ण अधिकार असतां, दीडदोन हात लांब अशी साधी लंगोटी देण्याचें नाकारलें ! तेव्हां येथें भाषैक्य, धर्मैक्य वगैरे सर्व होतें, पण ' माणुसकी ' तेवढी नव्हती असें म्हणावयाचें नाहीं तर काय ?

माझ्या पन्नास एक वर्षांच्या आयुष्यांत असे अनेक प्रसंग आले आहेत. त्या सर्वांचा निष्कर्ष असा कीं, 'माणुसकी' ही ब्राह्मणब्राह्मणेतर, हिन्दु-मुसलमान-ख्रिश्चन, स्त्री–पुरुष, शिक्षित–अशिक्षित—अशा प्रकारच्या भेदांवर अवलंबून नाहीं तर ती एक निराळी व स्वतंत्रच चीज आहे. मला ब्राह्मणेतरांनीं, ख्रिश्चनांनीं, मुसलमानांनीं, भंग्यांनीं ( होय भंग्यांनींहि ) मदत केली आहे व सजातीयांनीं, सधर्मीयांनीं, सुशिक्षितांनीं फसविलें आहे आणि एकदां नव्हे अनेकदां.

स्वतःच्या विशिष्ट अनुभवाची भाषा सोडून सामान्य दृष्टीनें आतां विचार करूं या. मनुष्यत्व कशांत आहे ? वेषविशेष, आहारविशेष, भाषाविशेष यांवर तें अवलंबून नाहीं हें कोणीहि कबूल करील. पण शिक्षणविशेष, मतविशेष, धर्मविशेष इत्यादिकांना मीं ' वेषां'च्याच योग्यतेचें ठरविलें तर तें मात्र प्रथमदर्शनीं तरी पुष्कळांना गैर वाटेल. पण विचारांतीं माझें मत असें होत चाललेलें आहे ही गोष्ट खरी. इतिहास, काव्य, गद्य वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, मानसशास्त्र इत्यादि विषयांसंबंधीं मीं जें अल्पस्वल्प वाचलें आहे त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे कीं, पूर्ण सत्य कोणत्याहि एका कवीच्या, इतिहासकाराच्या, दर्शनकाराच्या, किंवा धर्मस्थापकाच्या हातीं लागलेलें नाहीं. आपले जुने ऋषि त्रिकालज्ञ व पूर्ण ज्ञानी होते आणि त्यांनीं सांगितलेलें खरें मानावयाचें तर कपिल ऋषीचेंच खरें कां मानावयाचें आणि कणादाचें कां नाहीं ? ( **कपिलो यदि सर्वज्ञः कणादो नेति का प्रमा ॥** ) अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. धर्मस्थापकांना ईश्वरी साक्षात्कार होतो व त्यांचें ज्ञान पूर्ण होतें म्हणावें तर मग धर्मस्थापकांत एवढा मतभेद कां ? आणि नवीन नवीन धर्म स्थापण्याची त्यांना जरूर कां वाटली ? बुद्धिवान् व विद्वान् तत्त्वज्ञांचें खरें मानावयाचें असें ठरविलें तर शंकराचार्यांचें मत खरें मानावें कां रामानुजाचार्यांचें, प्लेटोचें कां आरिस्टॉटलचें, 'नवोन्मेषी विकासवाद' ( Creative Evolution ) लिहिणाऱ्या बर्ग्सनचें कां ' वर्तनवादाचा ' ( Behaviourism चा ) पुरस्कार करणाऱ्या वॉटसनचें—हे प्रश्न मनांत विकल्प उत्पन्न करतात.

तत्त्वद्रष्टे किंवा साक्षात्कारी ( Mystic ) असें ज्यांना म्हणतां येईल अशा

ज्ञानेश्वर तुकारामादि लोकांची कास धरावी तर त्यांचें म्हणणें काय आहे तें स्पष्ट कळत नाहीं, आणि थोडेंबहुत कळतें त्यांत मतभेद दिसतो व कित्येक स्थळीं तर तें अनुभवाच्या व विचाराच्या अगदीं उलट दिसतें. यांचे मतभेद गौण मानले आणि मतैक्यावर भर दिला तरी स्वतःला द्रष्टे किंवा साक्षात्कारी समजणाऱ्यांशिवाय इतरांना तें समजतच नाहीं असें मानणें बरोबर दिसत नाहीं. प्रो. रामभाऊ रानडे "महाराष्ट्रांतील साक्षात्कार पंथ" ("Mysticism in Maharashtra") या नांवाच्या आपल्या इंग्रजींत लिहिलेल्या उत्तम पुस्तकांत म्हणतात कीं, हे साक्षात्कार सर्व देशांत व सर्व कालखंडांमध्यें अत्यंत सात्विक व बुद्धिमान् लोकांना झाले आहेत, तेव्हां ते सत्यस्वरूप मानले पाहिजेत. पण जडवाद किंवा दुसरे वाद यांसंबंधीं देखील असाच युक्तिवाद करतां येणार नाहीं का? सार्वत्रिकता, सार्वकालीनत्व किंवा सुजनाभिमतत्व यांवरून एवढें फार तर म्हणतां येईल कीं त्या त्या वादामध्यें सत्याचा अंश आहे. बाकी हें देखील म्हणणें युक्तीला पूर्णपणें धरून नाहीं. कारण वरील गुण असलेलें 'दर्शन' सर्वस्वीं चूक असण्याचा संभव नाहींच, हें तत्त्वज्ञानाचा किंवा कोणत्याहि शास्त्राचा इतिहास जाणणाऱ्याला छातीठोकपणें सांगणें कठीण पडेल. तत्त्वज्ञानाचा इतिहास सोडूनच द्या. ज्योतिःशास्त्र किंवा पदार्थविज्ञानशास्त्र यांसारख्या शास्त्रांतील देखील सार्वत्रिक व विद्वदभिमत मतें चूक ठरलेलीं नाहींत काय? गणितशास्त्रांतल्या सिद्धांतांबद्दल वास्तविक मतभेद नसावा, कारण त्यांत भावनांचा संबंध येत नाहीं व तर्क्य विषयांत जास्तींत जास्त स्पष्टता व निश्चितता असते आणि कमींत कमी संमिश्रता असते. पण आइनस्टाइन पूर्वींच्या सार्वत्रिक, सार्वकालीन व सर्वतज्ज्ञाभिमत कल्पना आज एका विशिष्ट अर्थानें तरी चूक ठरल्याच ना?

गणित, रसायनशास्त्र, ज्योतिःशास्त्र इत्यादिकांतील भेद किंवा सामाजिक व राजकीय प्रश्नाबाबतचे मतभेद विशेष महत्त्वाचे नाहींत असें कबूल करण्यास कांहीं लोक तयार होतील. पण आध्यात्मिक किंवा धार्मिक प्रश्न हे अत्यन्त जिव्हाळ्याचे आहेत, कारण त्यांत मनुष्याचे अंतरात्म्याचाच संबंध येतो असें कांहीं लोक म्हणतील आणि या बाबतींतील प्रामाणिक मतभेदांना वेषभेदाइतकें गौणत्व देण्यास ते तयार होणार नाहींत. पण खोल विचार केल्यास या विषयांतीलहि प्रामाणिक मतभेदांचें विशेष स्तोम माजविण्याचें कारण काय? हें समजत नाहीं. हे विषयच मुळीं असे आहेत कीं, त्यांविषयीं मतभेद असणें साहजिकच नव्हे तर अपरिहार्य

आहे. कारण अज्ञात व अज्ञेय अशा विषयांबद्दल कोणता समंजस मनुष्य अमुकच सत्य असें निश्चयानें सांगेल? फार झालें तर तो एकंदर उपलब्ध पुरावा पाहतां मला आपलें असें असें वाटतें, असें सांगेल. पण तो प्रांजल असेल तर लगेच असेंहि म्हणेल कीं या बाबतींत दुसरेंहि मत असणें व तें बरोबर असणें संभवनीय आहे, कारण निश्चयानें बोलतां येईल इतका भरभक्कम पुरावा उपलब्ध नाहीं व निकटवर्ती भविष्यकालांत उपलब्ध होण्यासारखाहि नाहीं. आत्म्याचें अमरत्व, त्याचें प्रवृत्तिस्वातंत्र्य, ईश्वराचें अस्तित्व इत्यादि धार्मिक किंवा आध्यात्मिक प्रश्नांना अनेक तत्त्वज्ञांनीं व धर्मज्ञांनीं जीं उत्तरें दिलेलीं आहेत त्यांना आधारभूत असलेले युक्तिवाद व पुरावे पाहतां शेवटीं असेंच म्हणावें लागतें. या बाबतींत निश्चित व दुसऱ्याला पटलाच पाहिजे असा युक्तिवाद किंवा पुरावा उपलब्ध नाहीं.

ईश्वरास्तित्वच उदाहरणाकरितां घेऊं या. कांहीं सांख्य व बौद्ध निरीश्वरवादी आहेत व अद्वैतवेदान्ती शंकराचार्यहि प्रच्छन्न बौद्ध व प्रच्छन्न निरीश्वरवादी आहेत. या गोष्टी जुन्यापुराण्या म्हणून सोडून दिल्या व जुन्यांच्या खांद्यावर बसणाऱ्या आणि अधिक पुरावा असलेल्या आधुनिक तत्त्वज्ञांकडे पाहिलें तर त्यांत निरीश्वरवादी नाहींत कां? युरोपीय आधुनिक प्रमुख मानसशास्त्रज्ञांपैकीं शेंकडा ७५ हून अधिक लोक निरीश्वरवादी आहे, असें कोठेंसें वाचलें तें जरी संशयित म्हणून सोडलें तरी ही गोष्ट धादान्त स्पष्ट नाहीं का कीं आधुनिक तत्त्वज्ञांमध्यें अज्ञेयवादाचा अधिकाधिक प्रसार होत आहे? मी असें म्हणत नाहीं कीं, निरीश्वरवादांत किंवा अज्ञेयवादांत अन्तिम सत्य आहे. जीवशास्त्रांतील व पदार्थविज्ञानशास्त्रांतीलहि नवे नवे प्रयोग व नवीं नवीं मतें (Vitalism, वगैरे) पाहतां जगांत कांहीं तरी योजना दिसते असें मला स्वतःला म्हणावेंसें वाटतें. पण जडवादाचेंहि बल वर्धिष्णु आहे व वृत्ति जयिष्णु आहे. तो जीवान्तर्गत एक एक कार्य दिवसेंदिवस आपल्या क्षेत्रांत आणीत आहे आणि त्याची प्रगति अशीच कायम राहिली तर मनुष्याचे शारीरिक व्यापारच नव्हेत तर मनाचे म्हणून ज्यांना आपण म्हणतों ते व्यापारहि कार्यकारणभावाच्या कक्षेंत पूर्णपणें कधींच येणार नाहींत असें म्हणणें धाडसाचें वाटतें. तात्पर्य असें कीं, परमाणू व प्रेरणा (Force) याबद्दलचीं कांहीं पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांचीं मतें 'अजडवादा' कडे झुकत आहेत, आणि जीवशास्त्रज्ञांचीं मतें तर त्याहूनहि अधिकच योजनावादाकडे झुकत आहेत असें जरी मला दिसत असलें तरी जडवादाला मूठमाती देण्याची वेळ आली आहे असें मात्र मला म्हणतां येत नाहीं.

अशा स्थितींत अमुकच सिद्धान्त खरा असा आग्रह धरण्यांत फायदा काय ? शिवाय, आपलीं मतें हीं खरोखर पुष्कळ वेळां आपल्या पूर्वशिक्षणावर, आपल्या सहजप्रवृत्तींवर, आपल्या गूढ व सुप्त वासनांवर अवलंबून असतात [ —आपण निर्विकार चित्तानें विचार करावयाचें ठरविलें तरी आपल्या भावना, आपले हितसंबंध, आपल्या अंतःकोशांतील गूढ, सुप्त व बोधरहित ( Unconscious ) वासना यांचा परिणाम नकळत होत असतोच असतो— ] हें सर्व ध्यानांत घेतलें म्हणजे विशिष्ट मताबद्दलचा आग्रह किती दुराग्रहस्वरूप आहे हें ध्यानांत येतें आणि अशी वृत्ति होऊं लागते कीं ईश्वरास्तित्वादि गूढ गहन प्रश्नांबद्दल ज्यानें त्यानें आपलीं प्रामाणिक मतें स्वतःपुरतीं अवश्य स्वीकरणीय मानावींत, लोकांनाहि स्वीकारण्यास सांगावीत, पण त्यांबद्दल आग्रह धरूं नये. आणि दुसऱ्यांचा मतभेद दिसल्यास माणुसकीच्या दृष्टीनें ते त्याज्य किंवा निंद्य आहेत असें तर मुळींच मानूं नये.

लौकिकदृष्ट्या ज्यांना आपण हिंदु, ख्रिश्चन, बौद्ध, महंमदी वगैरे धर्म म्हणतों त्यांचा लौकिक तारतम्याच्या दृष्टीनें विचार केला तरी देखील हाच निष्कर्ष निघतो. ख्रिश्चन लोक मुसलमानी किंवा हिंदु धर्माला कमी लेखतात, आपण मुसलमानांना कमी लेखतों, मुसलमान हिंदूंना तुच्छ मानतात. वास्तविक पाहतां प्रत्येक धर्मांत अंधश्रद्धेचा भाग आहे. प्रत्येक धर्माच्या कांहीं आचारांत खुळचट प्रकार आहेत, आणि प्रत्येक धर्माच्या लोकांचें मूर्खपणाचेंच नव्हे तर नीचतेचेंहि पुष्कळ वेळां अनुकरण झालेलें आहे. उलटपक्षीं प्रत्येक धर्मांत स्वीकरणीय भाग असतो, धर्माच्या कांहीं कांहीं विधींत व आचारांत पावित्र्यादि सद्भावना जागृत करण्याची शक्ति असते आणि प्रत्येक धर्माच्या अनुयायांनीं सौजन्य उत्कटत्वानें दाखविल्याचीं उदाहरणें आहेत. प्रत्येक धर्माचे संस्थापक सद्धेतुप्रेरित होते, प्रत्येक धर्माच्या अधिकारी उपाध्यायवर्गांत साधुपुरुष होऊन गेले–आणि खलपुरुषहि होऊन गेले. ख्रिश्चन लोक क्राइस्टच्या मातेला–मेरीला–'अदूषित कुमारी' मानतात, बाप्तिस्मा देतांना अर्भकाला थंड पाण्याच्या कुंडांत, बुडवून काढतात,-क्रिश्चनेतर व अबाप्तिस्मित लोक कायमचे नरकांत जाणार असें मानतात, पण हेच लोक हिन्दूंच्या वगैरे धर्मांतील खुळचट आचार–विचारांची कुचेष्टा कित्येक वेळीं करतांना आढळतात. हिन्दु, मुसलमान, पारशी, शीख वगैरे सर्व लोक स्वेतर धर्मांविषयीं बोलतांना असेंच धोरण कित्येकवेळां स्वीका-

रतात. एखाद्या चांगल्यां कुटुंबांतील सदाचारी हिन्दु मुलीनें एखाद्या चांगल्या युरोपिअनाशीं, पारशाशीं किंवा मुसलमानाशीं लग्न केलें आणि हा विवाह केवळ धर्मभेदाशिवाय इतर सर्व दृष्टींनीं अभिनन्दनीय मानण्यासारखा असला तरी देखील कांहीं हिन्दु लोक अशी ओरड करूं लागतात कीं ती मुलगी अगदीं पतित झाली, तिनें आपल्या कुटुंबाला कालिमा आणिला आणि तिच्या धर्माची अवनति होऊन तो लयास जाण्याच्या मार्गाला लागला ! एखाद्या पारशी स्त्रीनें असेंच केलें तरी त्या समाजांत देखील अशीच ओरड चालते. असें कां ? ती स्त्री इतर दृष्ट्या सर्वतोंपरी सद्वृत्तनी असतां केवळ तिच्या धर्मान्तरामुळें तिचा व तिच्या समाजाचा अधःपात होऊन जिकडे तिकडे हाहाःकार व्हावा असें त्यांत काय आहे ? मिश्र विवाहाची गोष्ट सोडून देऊन स्वेतर धर्मांतील समाजांत अनीति फार असते असें मानण्याची जी कांहीं लोकांत प्रवृत्ति आहे तिचा विचार क्षणभर करूं या. मिस मेयोसारख्या स्त्रियांना हिन्दु समाजांत अनीतीचा आणि खुळचटपणाचा बाजार भरलेला दिसतो, आणि कांहीं हिन्दु लोकांना अमेरिकेंत घटस्फोटादि प्रकार सर्रास चालून तेथील स्त्री–पुरुष पशुतुल्य स्वैर आचार करीत असतात असें वाटतें. असें वाटतें हा मोठा दोष तर खराच, पण यापेक्षां अधिक मोठा दोष असा कीं परकी समाजांत अनीतिमत्ता आहे हें पाहून पुष्कळांना आनंद होतो ! वास्तविक हिन्दु समाजांत जर खरोखरीच मिस मेयोनें सांगितल्याप्रमाणें अनीतिमत्ता असेल तर त्याबद्दल सर्व विचारी ख्रिश्चन लोकांना हळहळ वाटली पाहिजे, पण तसें न होतां मिस मेयोचें पुस्तक कांहीं ख्रिश्चन लोक मिटक्या मारीत वाचतात ! आमचेंहि असेंच ( Uncle Sham ) हें अमेरिकेंतील सामाजिक गटारें उपसणारें पुस्तक आपणहि मोठ्या हौसेनें वाचतों व त्यांतील गोष्ट इतरांना तिखटमीठ लावून सांगतों ! खरें म्हटलें म्हणजे कोठेंहि वाईट प्रकार असेल तर त्याबद्दल नीतिप्रिय मनुष्याला खेद व्हावा, पण स्वेतर समाजाविषयीं व धर्माविषयीं मनुष्याचें मन इतकें पूर्वग्रह-दूषित असतें आणि सापेक्षतः आपला समाज व धर्म हे श्रेष्ठ आहेत असें सांगण्यांत व ऐकण्यांत असा कांहीं आनंद असतो कीं परधर्मीयांची निंदा ही मेवामिठाईप्रमाणें आपणांस वाटते आणि ती ऐकण्यास किंवा वाचण्यास मिळाली असतां त्यांतील अंश आपण इतरांना प्रसाद म्हणून वाटतों ! ब्राह्मण–ब्राह्मणेतरांतील भांडणें व हिंदुमुसलमानांतील मारामाऱ्या अशाच प्रकारच्या

दुरभिमानामुळें व दुःप्रवृत्तीमुळें उत्पन्न होतात. समाजकारणांत व राजकारणांत जातिभेदांमुळें व धर्मभेदांमुळें जे बिकट प्रश्न उत्पन्न झालेले आहेत त्यांच्या बुडाशीं असलाच दुरभिमान व असलीच दुःप्रवृत्ति बऱ्हंशीं आहे, व हे प्रश्न कधीं सुटावयाचे असतील तर धर्मभेदांना व सामाजिक भेदांना जें फाजील महत्त्व आलें आहे तें नाहींसें होईल तेव्हांच ते सुटतील. खरा सदाचार व खरें सौजन्य हें विशिष्ट जातींत जन्म घेतल्यानें प्राप्त होत नाहीं किंवा विशिष्ट धर्माचे आपण आहोंत असें म्हणवून घेतल्यानेंहि तें अंगीं येत नाहीं. सामाजिक जाति व लौकिक धर्म इत्यादिकांतील भेद खरोखर व वेष–भाषादिकांप्रमाणें बाह्य आहेत, अंतरात्म्यांतील चांगुलपणा त्यांवर विशेष अवलंबून नाहीं. त्यांना आजकाल जें भलतें महत्त्व प्राप्त झालेलें आहे तें नाहींसें होईल तो सुदिन !

लौकिक धर्मभेदच नव्हे, तर नीतिविषयक कल्पनांतील व आचारांतील भेदांनाहि मी विशेष महत्त्व देत नाहीं. स्त्री–पुरुष आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें नीतीनें वागत आहे किंवा नाहीं या प्रश्नालाच मी महत्त्व देतों. उदाहरणें घेऊन बोलावयाचें म्हणजे मांस खाणें निषिद्ध व अविहित असें वाटत असून जो मांस खाईल तो पापी, मांसभक्षणामध्यें पापपुण्याचा कांहीं संबंध नाहीं असें ज्याला प्रामाणिकपणें वाटत असेल त्यानें मांस खाल्लें असतां त्याला मुळींच पाप लागत नाहीं असें मी मानतों. अशनपानादि क्षुल्लक गोष्टींबद्दलच नव्हे तर संततिनियमन, घटस्फोट, पुनर्विवाह इत्यादिकांसंबंधीं माझ्या विचाराचें असेंच धोरण आहे. एतद्विषयक कल्पना व आचार यांमध्यें देशभेद, कालभेद, परिस्थितिभेद, ज्ञानभेद इत्यादिकांमुळें फरक होत असतो हें धादांत स्पष्ट आहे. यांतील नीतिमत्व व अनीतिमत्व कालस्थलपरिस्थिति–सापेक्ष आहे; व अमुक एक कल्पना किंवा आचार नित्यत्वानें व कालस्थलादि–निरपेक्षतेनें सत् किंवा असत् ठरविणें चुकीचें आहे हें नीतिशास्त्रज्ञांना व समाजशास्त्रज्ञांना माहीत आहे. इतिहास असें सांगतों कीं बाल–हत्या करणें, अनेक स्त्रिया करणें, अनेक पति करणें इत्यादि गोष्टी नीतीच्या म्हणून कांहीं ठिकाणीं गणल्या गेल्या होत्या ! लोकांच्या बायका पळवून नेऊन ‘ राक्षसी विवाह ’ वीरांनीं किंवा विभूतींनीं लावलेले आहेत व त्यांपैकीं कांहीं देवकोटीप्रतहि गेलेले आहेत ! तात्पर्य काय तर नीतिविषयक आचारविचार हे परिस्थितिसापेक्ष आहेत, त्यांतील नित्य व निरपेक्ष भाग एवढाच कीं स्वतःला जें खरोखर अशिष्ट व अनीतीचें

वाटतें तें करणें पाप होय व स्वतःच्या मनाला जें खरोखर योग्य व नीतीचें वाटतें तें करण्यांत पाप नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं पाहिजे त्यानें पाहिजे तसें वागावें. स्वतःच्या मनाला 'पूत' वाटेल तें करावें म्हणजे "मनःपूतं समाचरेत्," याचा जो लौकिक अर्थ आहे त्याप्रमाणें वागावें असा अर्थ नाहीं. आपल्या समाजांतील शिष्ट लोकांची चालरीत, सत्पुरुषांची शिकवणूक, स्वतःच्या मनाशीं शांतपणें केलेला सर्वांगीण विचार, इत्यादि गमकांवरून ज्यानें त्यानें आपलें कर्तव्य-अकर्तव्य ठरवावें व त्याप्रमाणें वागावें एवढाच याचा अर्थ. कर्तव्या-कर्तव्य ठरवितांना आपल्या मनोविकारांना आपण बळी तर पडत नाहीं ना, आत्मवंचना तर आपण करून घेत नाहीं ना, प्रचलित शिष्टाचार, धर्मवचनें वगैरेंचा त्याग करणें आपणांस प्रशस्त वाटत असल्यास असा त्याग करण्यापूर्वीं आपण पूर्ण व सर्वांगीण विचार निर्विकार चित्तानें केलेला आहे ना, अशा प्रकारचे प्रश्न मनाला अर्थात् विचारलेच पाहिजेत, पण हे विचारून झाल्यावर आणि मन व मत निश्चित झाल्यावर आपला 'सदसद्विवेक' म्हणा किंवा 'आत्मतुष्टि' म्हणा किंवा '**स्वस्य च प्रियमात्मनः**' म्हणा, हीच शेवटीं नीती-अनीतीची कसोटी आहे हें ओळखावें आणि त्याप्रमाणें वागावें. नीती-अनीती-आचाराविचारांच्या बुडाशीं गेल्यावर मनुष्य आपल्या प्रामाणिक बुद्धीला अनुसरून स्वतःचें व दुसऱ्याचें हित साधण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा नाहीं एवढेंच महत्त्वाचें तत्त्व हातीं लागतें. हें स्वहित व परहित [ स्वसुख किंवा परसुख नव्हे हें ध्यानांत धरावे ] साधण्याची जी इच्छा आहे ती किती दृढ, प्रबल, विचारयुक्त व निर्विकार आहे एवढ्यावर मनुष्याची नीतिमत्ता अवलंबून असते— तो कोणतीं वस्त्रें परिधान करतो, तो काय खातो-पितो, तो मक्केकडे तोंड करून अल्लाची प्रार्थना करतो का पूर्वेकडे तोंड करून सूर्याला अर्घ्य देतो, तो जातीनें ब्राह्मण आहे का अब्राह्मण आहे, तो स्वजातीय स्त्रीशीं विवाह करतो का परजातीय स्त्रीशीं, इत्यादि गोष्टींवर त्याची नीतिमत्ता अवलंबून नाहीं. या गोष्टी बाह्य, गौण व आनुषंगिक आहेत. खरें सौजन्य, खरी नीतिमत्ता, खरें धार्मिकत्व यांहून महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या व आंतर लक्षणांवर अवलंबून आहे.

लौकिक धर्माचे आचार-विचार नीतिविषक बाह्य आचार-विचार यांनाच असें हें गौण स्थान दिल्यावर पदार्थविज्ञानादि भौतिक शास्त्रें, कला, वाङ्मय, सामाजिक सुधारणा, राजकीय चळवळ, इत्यादिकांतील मतभेदांना व वर्तनप्रकारांना सौजन्याचा

विचार करतांना विशेष प्राधान्य देण्याचें माझ्या मतें कारण नाहीं हें ओघालाच येतें. पण माझा अनुभव तर असा आहे कीं या मतभेदांना व वर्तनभेदांना आजकाल अवास्तव महत्त्व देण्यांत येतें आणि त्यामुळें पक्षभेद व पंथभेदच नव्हे तर पक्षद्वेष आणि पंथद्वेष उत्पन्न होऊन असलीं हीं हरतऱ्हेचीं भांडणें करण्यांत गुंतलेल्या व या भांडणांत आनंद मानणाऱ्या समाजांत राहणें नको असें कित्येक वेळां वाटूं लागतें. मतभिन्नता, जातिभिन्नता किंवा धर्मभिन्नता असतांना सलोख्यानें, गुण्यागोविंदानें व दुसऱ्याच्या प्रामाणिक आचारविचारांबद्दल आदर मनांत बाळगून महाराष्ट्रीयांना काय, हिन्दवासियांना काय, वागणें शक्यच नाहीं काय ? ४०–५० वर्षांपूर्वी रानडे, आगरकर, गोखले यांनीं आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें समाजसुधारणा करण्याचे प्रयत्न केले. त्याबद्दल त्यांचा जो छळवाद झाला तो काय महाराष्ट्राला शोभला ? हल्लीं देखील एखाद्याचें प्रथम माहात्म्य कबूल करून त्यानें अस्पृश्योद्धाराची चळवळ हातीं घेतल्याबरोबर त्याचें ‘ माहात्म्य ’ नाकबूल करून त्याची वाटेल तशी निर्भर्त्सना करावी आणि वारंवार भाल्यानें भोसकल्यासारखें करून त्याला छळावें हें काय महाराष्ट्राला उचित आहे ? बरें एखाद्यानें कौन्सिल–प्रवेशाची तरफदारी केली आणि असहकारिता अशक्य म्हणून सांगितलें, म्हणून त्याला शाळेंतल्या पोरांकडून खादीच्या टोपीचा जाहीर अहेर करण्यांत यावा, हें तरी काय योग्य झालें ? असे प्रकार पाहिले म्हणजे असें वाटूं लागतें कीं महाराष्ट्राला अद्यापि सौजन्याचा अंतरात्माच कळलेला नाहीं आणि म्हणून त्याला लहान मुलांप्रमाणें पोषाखावरूनच मनुष्याची ओळख पटते, रानटी लोकांप्रमाणें काचेच्या मण्यांनाच तो अलंकार समजतो व एखाद्या अडाणी स्त्रीप्रमाणें पोषाखाच्या व अलंकाराच्या फाजील आवडीमुळें अंतरात्म्याच्या शुद्धाशुद्धतेकडे तो दुर्लक्ष करतो !

मला कोणी येथें असें विचारील कीं प्रामाणिक मतें जर तुम्हांला मान्य आहेत तर प्रामाणिक मतविरोध तुम्हाला अमान्य कां असावा ? खरी गोष्ट अशी आहे कीं मला मतविरोध नको आहे असें मुळींच नाहीं. प्रत्येकानें आपल्या मताचा पुरस्कार केलाच पाहिजे. अर्थात् विरोध हा अपरिहार्यच आहे. पण हलकटपणाचा विरोध आणि सौजन्ययुक्त विरोध यांत फरक आहे. पौराणिक दाखला द्यावयाचा म्हणजे अर्जुनानें भीष्माशीं व द्रोणाशीं युद्ध केलें तसें युद्ध देखील मला चालेल, मग केवळ विरोधाची गोष्टच बोलावयास नको. या जगांत पूर्ण

सत्य कोणाच्याच हातीं न लागल्यामुळें ( तसेच गैरसमज, भिन्न भावना, भिन्न हितसंबंध, भिन्न कर्तव्यें इत्यादि गोष्टींमुळें ) प्रामाणिक विरोधाची शक्यताच नव्हे तर अपरिहार्यता कोणाच्याहि ध्यानांत येईल. पण विरोधामध्यें बालिशता, कुत्सितपणा, कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविण्याची बुद्धि, एखाद्याला एकदां शत्रु म्हटल्यानंतर त्याच्या पाठीस लागून व जें हातीं येईल तें फेंकून किंवा मारून त्याची जणूं काय शिकार करावयाची अशा प्रकारची रानटी प्रवृत्ति— इत्यादि गोष्टींचा अभाव असला पाहिजे.

भीष्म-द्रोण व अर्जुन यांच्या विरोधाचा वर उल्लेख केला तो पौराणिक म्हणून सोडून दिला तरी आधुनिक कालांतहि उपरिनिर्दिष्ट भारती योध्यांच्या सारखीं आदरयुक्त युद्धें आयर्लंडच्या इतिहासांत अलीकडे दिसून आलीं आहेत. इंग्लंडचा आयर्लंडशीं तह झाल्यानंतर डी व्हॅलेरा याचे कांहीं अनुयायी यांना तो तह मान्य नव्हता आणि निर्भेळ स्वातंत्र्याकरितां पूर्वी जे इंग्लिशांशीं लढले त्यांना आतां तह मान्य करणाऱ्या स्वकीयांशीं लढणें प्राप्त झालें. म्हणजे तह होण्यापूर्वी इंग्लंडशीं लढतांना ज्यांनीं खांद्याला खांदा लावून साहसाचीं अनेक कामें केलीं आणि एकमेकांच्या प्राणरक्षणार्थ आपले प्राणहि धोक्यांत घातले त्यांनाच तह झाल्यावर एकमेकांना तुरुंगांत टाकण्याचें, गोळ्या घालून ठार मारण्याचें काम करण्याची पाळी आली. अशा प्रसंगीं कित्येक बापांना मुलांशीं भावांना भावांशीं, मित्रांना मित्रांशीं लढावें लागलें पण या कालखंडाच्या इतिहासांत भारतीय युद्धांतल्याप्रमाणें कांहीं उज्ज्वल देखावे दिसून आले. त्यांतलें एक उदाहरण आठवतें. तें असें कीं डी व्हॅलेराच्या एक अनुयायाला त्याच्या मित्रानेंच पकडून तुरुंगांत टाकल्यावर त्याची रीतसर चौकशी होऊन गोळी घालून त्याला दुसरे दिवशीं बारा वाजतां ठार करण्याचें ठरलें. आपणाला अत्यन्त प्रिय असलेल्या मित्राला तुरुंगांत ठार करविण्याचें कटु कर्तव्य त्याच्या नशीबीं आलें, व त्यानें तें बजावलेंहि. तुरुंगांतून त्याला सोडविण्याचे हरतऱ्हेचे बरेवाईट प्रयत्न होत होते. ते विफल करण्याकरितां त्याचा मित्र रात्रीं डोळ्यांत तेल घालून पहारेकऱ्यांवर वगैरे देखरेख करीत होता. दुसऱ्या दिवशीं बारा वाजेपर्यंत त्यानें सक्त पहारा केला. बरोबर बाराच्या ठोक्याला आपल्या मित्रावर गोळी झाडली जाऊन तो मृत झाला हें ऐकेतोंपर्यंतच कर्तव्यनिष्ठुरता त्याला स्वीकारतां आली, कारण तो लगेच स्वतः रडूं लागला व थोडक्याच अवधींत निश्चेष्ट पडला. कालान्तरानें लोकांनीं त्याला,

सावध केल्यावर त्याच्या मृत मित्रानें लिहिलेल्या मृत्युपत्राचा कागद त्याच्या हातांत देण्यांत आला. या मृत्युपत्रांत असें लिहिलें होतें कीं कर्तव्यनिष्ठेमुळें माझ्या सारख्या मित्राला देखील मारण्यास तूं कमी केलें नाहींस हें पाहून तुझ्याबद्दल माझा आदर पूर्वींपेक्षांहि अधिक झाला आहे आणि म्हणून माझी सर्व इस्टेट मी तुझ्या स्वाधीन करतों. तिचा विनियोग तूं पाहिजे तसा कर.

युद्धें व्हावयाचींच असलीं तर अशा प्रकारचीं **धर्म्य युद्धें** मला पाहिजे आहेत, **धार्मिक युद्धें** नको आहेत. धार्मिक युद्धेंहि चालतील—जर तेवढी खरीखुरी धर्मश्रद्धा असेल तर. पण मी मुंबईस होणारे जे दंगे पाहिले व त्यांचीं वर्णनें जीं ऐकिलीं त्यांवरून या दंग्यांच्या बुडाशीं खुळचट व अचरट समजुती, गैरसमज, दुरभिमान, स्वार्थसाधुत्व, इत्यादि गोष्टीच असतात असें दिसून आलें आहे. अशा दंग्यांपासून तसेंच सामाजिक, राजकीय वगैरे पक्षापक्षांमधील क्षुद्र भांडणापासून लोकांना शक्य तर निवृत्त करावें अशा हेतूनें वरील लेख लिहिला आहे, आणि त्यांत खरें सौजन्य हें विशिष्ट वेष, भाषा, जाति, धर्म, पक्षोपपक्ष, पंथ, मतें इत्यादिकांवर अवलंबून नसून तें सद्बुद्धीवर अवलंबून आहे आणि ज्यानें त्यानें आपल्या प्रामाणिक समजुतीला अनुसरून वागावें आणि इतरांच्या प्रामाणिक समजुतीबद्दल आदर बाळगावा इत्यादि गोष्टी यथाप्रसंग सांगितल्या आहेत. त्यांतील ग्राह्यांश घेऊन इतर अंशाची उपेक्षा करावी [ किंवा विरोध करावयाचा असल्यास तोहि करावा, पण कुचेष्टेच्या दृष्टीनें किंवा वैरभावानें करूं नये. ] एवढीच विनंति आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२३९

# माझ्या आयुष्याचा माझ्या लेखनावर परिणाम १३

प्रत्यक्ष माझ्या लेखनावरतीं कुठल्याहि लेखकाचा विशेष परिणाम झालेला नाहीं. जर झालेला असेल तर इंग्रजी लेखकांचा झाला आहे. परंतु अप्रत्यक्षपणें ज्या लेखकांचा परिणाम झालेला आहे असें म्हणतां येईल ते म्हणजे श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे होत. मी पुण्यास 'न्यू प्रिपेरेटरी क्लासेस' मध्यें दुसऱ्या तिसऱ्या इयत्तेंत शिकत असतांना यांनींच माझ्यांत प्रथम वाङ्मयाची आवड उत्पन्न केली. पुढें त्यांचे व माझे विचार भिन्न झाले, ती गोष्ट निराळी. टिळक व आगरकर यांच्या लेखनांचा माझेवर विशेष परिणाम झालेला नाहीं; परंतु मी लहान असतांना टिळक विरुद्ध आगरकर किंवा गोखले वाद पुष्कळ जोरांत होते, व आमच्या घरीं जे आम्ही चवघे पांचजण विद्यार्थी होतों, त्यांत दोघे वडील बंधू व त्यांचे मित्र यांचेमध्यें जे वाद होत, ते ऐकून व थोडासा भाग घेऊन वादाच्या प्रश्नाबद्दल माझे मनांत खरी कळकळ उत्पन्न झाली, व हरतऱ्हेच्या बाजू कळल्या. माझे वडील बंधू महादेव मल्हार जोशी यांच्या सान्निध्यामुळें विविध संस्कृत इंग्रजी व मराठी पुस्तकें वाचावयास मिळून ती आवड वृद्धिंगत होणें सुलभ झालें. ते व मी डेक्कन कॉलेजमध्यें शिकलों व तेथें प्रोफेसर 'बेनच्या' विचारामुळें अप्रत्यक्षपणें लेखनावर बराच परिणाम झाला. प्रिन्सिपल सेल्बी, प्रिन्सिपल शार्प यांचा व्यक्तिविषयक नीतीवर परिणाम झाला असेल. पण वाङ्मयदृष्ट्या त्यांचा काहीं फारसा लाभ झाला नाहीं. हरिभाऊ आपटे यांच्या कांहीं कादंबऱ्या मीं वाचल्या होत्या व वाचतांना रंगूनही गेलों होतों. पण वाङ्मयांतली त्यांची योग्यता व महत्त्व कळण्याचें सामर्थ्य त्यावेळीं माझ्यांत नव्हतें.

आयुष्यांतील कोणत्या प्रसंगांचा व परिस्थितीचा माझ्या लेखनावर परिणाम झालेला आहे, याविषयीं विचार करूं लागल्यास प्रथम माझी आई, बहिणी, भाऊ

वगैरे कुटुंबीय मंडळींची मला प्रथमतः आठवण होते. संसाराकडे पाहण्याची जी माझी एक बरी वाईट, सदोष निर्दोष दृष्टि व वृत्ति आहे, व जी अर्थात् माझ्या लेखनामध्यें प्रतिबिंबित झाली असलीच पाहिजे, त्या वृत्तीचें मूळ माझ्या कौटुंबिक अनुभवांत आहे. माझी आई, माझ्या बहिणी व भाऊ ही मंडळी फार प्रेमळ असल्यामुळें व माझें लहानपणचें तरी कौटुंबिक आयुष्य फार सुखांत गेल्यामुळें मुलाबाळांनीं व इतर माणसांनीं गजबजलेल्या कौटुंबिक जीवनाची मला मनापासून आवड आहे. अलिकडील अनुभवामुळें व विचारामुळें एकत्र कुटुंबपद्धतीचे दोष जरी मला दिसूं लागले आहेत, व ती नष्ट व्हावी असें विचारांच्या दृष्टीनें म्हणण्या-पर्यंत जरी माझी पाळी आलेली आहे, तरी माझे मनाचा खोल ठाव घेतल्यास तें एकत्र कुटुंबांतच रममाण होणार आहे असें आढळून येईल. अलीकडे अलीकडे तर केवळ न्यायनिष्ठुर व तर्ककर्कश विचारांच्या दृष्टीनेंच मी जेव्हां पाहूं लागतों, तेव्हां एकत्र कुटुंबपद्धतिच काय, पण साक्षात् कुटुंबपद्धतिच नष्ट होणार व नष्ट व्हावी असें मला वाटूं लागलेलें आहे. व ह्या मतांचे अस्पष्ट पडसाद माझ्या अलीकडील कांहीं लेखनांत ऐकूं येत असतील. 'सुशिलेचा देव' सारख्या पुस्तकांत नि माझ्या संभाषणांतहि ते ऐकावयास मिळतीलच. तथापि माझ्या हृदयांत खोल दडून राहिलेली व पक्कें घर करून राहिलेली, कौटुंबिक जीवनाची आवड त्यांतहि दृग्गोचर झाल्या-शिवाय रहात नसावी अशी माझी कल्पना आहे.

* * *

माझ्या लेखनांत स्त्रियांच्याविषयीं आदरभाव व सहानुभूतिहि दिसून येत असावी अशी माझी कल्पना आहे. याचें मूळ पाहूं गेल्यास लहानपणीं माझी आई व माझ्या बहिणी व मोठेपणीं याशिवाय माझी पत्नी, भावजया वगैरे नातलग मंडळी व अलीकडे १५-१६ वर्षें माझ्या विद्यार्थिनी यांच्या सहवासांत मला जे त्यांच्या सात्विक स्वभावाचे हरतऱ्हेचे अनुभव आले त्यांत सांपडेल. हे अनुभव जर कटु असते तर माझें लिखाण निराळ्या प्रकारचें झालें असतें अशी माझी खात्री आहे.

* * *

आतां विशिष्ट प्रसंगांचा माझे लेखनावर काय परिणाम झाला हें मी पाहूं लागलों कीं, प्रथमतः तुरुंगांतील माझ्यावर आलेल्या प्रसंगांची प्रथम आठवण होते. त्यांचा

माझ्या जीवनावर, ध्येयावर व एकंदर वृत्तीवर बराच परिणाम झालेला आहे व अर्थात् तो लिखाणांत प्रतिबिंबित झाला आहे. विशिष्ट स्थलांचा निर्देश करावयाचें कारण नाहीं. परंतु माझ्या कादंबऱ्यांतून कांहीं विशिष्ट प्रसंगांचीं वर्णनें आहेत तीं अनुभवावर आधारलेलीं आहेत. तुरुंगांत असतांना ब्राह्मण–ब्राह्मणेतर, ब्राह्मण–अस्पृश्य, हिंदु–मुसलमान, हिंदी–युरोपियन यांतील भेद, वाद व तेढ याची निरर्थकता माझ्या अनुभवावरून मला कळूं लागली. माझ्यावर कांहीं दिवस एक भंगी कॉन्व्हिक्ट ओव्हरसियर होता. त्यांनीं मला फार चांगल्या तऱ्हेनें वागविलें. त्याचप्रमाणें एक पठाण ओव्हरसियर होता त्यांनीं मला किती तऱ्हेनें तरी, स्वार्थत्यागपूर्वक, आपलें अधिकाराचें स्थान धोक्यांत घालून अनेक वेळां उपकृत करून ठेवलें आहे.

त्याचप्रमाणें युरोपियन अधिकाऱ्यानेंहि मला चांगल्या तऱ्हेनें वागविलें आहे. उलटपक्षीं कांहीं हिंदू अधिकाऱ्यांनींच मला वाईट तऱ्हेनें, निर्दयपणें व अन्यायानें वागविलें आहे. अशा प्रकारचे अनेक व विविध अनुभव घेतल्यामुळें चांगुलपणा, जातिधर्म वगैरेवर अवलंबून नसून तो त्या त्या व्यक्तींचा गुण आहे हें माझ्या चांगलें प्रत्ययाला आलें. तुरुंगांतून सुटून आल्यानंतर राजकारणासंबंधीं मला जे अनुभव आले व माझें जें वाचन झालें व जो मीं विचार केला त्यावरून जाती, पंथ, धर्म वगैरेमुळें उत्पन्न होणारीं वैरें, भांडणें, राष्ट्राला अत्यंत हानिकारक आहेत याविषयीं माझी बालंबाल खात्री झाली व या खात्रीची छाया माझ्या अलीकडील लिखाणांत कांहीं ठिकाणीं पडलेली दिसेल. दुसऱ्या अनेक प्रसंगांचा माझ्या लेखनावर परिणाम झाला आहे. इतका कीं, कांहीं कांहीं ठिकाणीं वर्णनें अनुभवावरच आधारलेलीं आहेत. परंतु ते प्रसंग निरनिराळ्या ठिकाणचे, निरनिराळ्या प्रकारचे असल्यामुळें त्यांच्या संबंधानें सामान्यत्वें करून मला विधानें करितां येणार नाहींत.

माझ्या कादंबरींतील कांहीं लहानसहान प्रसंग घेतले तर ते मला डोळ्यापुढें घडलेल्या कांहीं प्रसंगांवरूनच सुचलेले आहेत. आमच्या आश्रमाशेजारीं वडारी लोकांचीं लहान लहान पालें आहेत. तेथें एकदां औषध द्यावयास जाण्याचा प्रसंग आला. चारी बाजूंना डोळ्यास झोंबणारा धूर पसरलेला. झोंपडींत दोन तीन आजारी माणसें कशीं तरी आपलीं फाटकीं चिरगुटें गुंडाळून पडलेलीं. घरांत औषध देण्यासहि भांडें मिळेना. अवघीं दोनच मातीचीं भांडीं तेथें दिसलीं. त्या प्रसंगा-

वरून मला त्यांच्या गरिबीची कल्पना येऊन तो प्रसंग हृदयावर कोरल्यासारखा राहिला व त्याचेंच कांहींसें प्रतिबिंब सुशिलेच्या देवांत झोपडींतील कॉलऱ्याचें वर्णन करितांना पडलें आहे. तुरुंगांत माझे पाहण्यांत बरेचसे बेरड, पठाण वगैरे रानटी वृत्तीचे लोक आले. त्यांच्यावरूनच 'रागिणीं' तील तप्तकटोहाची कल्पना व त्या प्रदेशांतील लोकांचीं वर्णनें मला सुचलीं व 'नलिनींतील' 'फॅन्सी फेअरचें' वर्णन पुणें-मुंबईंत पाहिलेल्या प्रदर्शनें व फेटस यांचेवरूनच मला करितां आलें. तसेंच 'सुशिलेच्या देवांतील' लोणावळ्याच्या हॉटेलमधील कांहीं प्रसंगांचीं वर्णनें मला आमच्या आश्रमांतील वेळोवेळीं सभोंवार दिसणाऱ्या प्रसंगांवरूनच सुचलेलीं आहेत.

डेक्कन कॉलेज व समर्थ विद्यालय यांत घालविलेल्या दिवसांचीं कांहीं चित्रें पण माझ्या कादंबऱ्यांत पहावयास मिळतील. एकदां आम्ही सर्व मोठी मंडळी लहान मंडळींना घरीं ठेवून ट्रिपला निघालों, तेव्हां एक लहान मुलगा माझे जवळ येऊन म्हणाला 'तात्या लहान होण्यांत पाप आहे नाहीं? तुम्ही सर्व ट्रिपला जातां आणि आम्ही लहान म्हणून आम्हाला नेत नाहीं!' त्याच प्रसंगावरून माझ्या 'आश्रम-हरिणीं' तील ट्रिपला निघण्याच्या प्रसंगाचें मीं वर्णन केलें.

लेखाचा शेवट करतांना ही एक महत्त्वाची गोष्ट मला सांगावीशी वाटते. माझेवर जरी अनेक दुःसह प्रसंग आले असले तरी माझा एकंदरींत जगाचा अनुभव कटु नाहीं. जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं, जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात व तंटेभांडणें उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच, दुष्टपणा पण आहे. परंतु प्रयत्न केला तर, जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे व मला अशी आशा आहे कीं, पांच हजार, दहा हजार वर्षांनीं म्हणा किंवा लाख वर्षांनीं म्हणा असा एक दिवस येईल कीं, जेव्हां सर्वांना खाण्यापिण्यास पोटभर मिळेल. प्रत्येकाला राहण्यास घर मिळेल. क्षुल्लक तंटेबखेडे पुष्कळ कमी होतील. समाजांतील कृत्रिम भेद व त्यामुळें उत्पन्न होणारीं वैरें व युद्धें बंद होतील. ज्ञान व ज्ञानाची आवड तसेंच कला व कलेची आवड हीं वृद्धिंगत होतील आणि खऱ्या नीतीचीं व धर्माचीं तत्त्वें साहजिकपणेंच लोकांना इतकीं प्रिय व आदरणीय होतील कीं, त्यांचे अंमलबजावणीकरितां कृत्रिम निर्बंधांची, निषेधांची, कायद्यांची व तुरुंगाची आवश्यकता फारशी राहणार नाहीं.

या माझ्या आशेची छटा माझ्या लेखनांत प्रामुख्यानें दिसत नसली तरी ती अजिबात नाहीं असें मला वाटत नाहीं व यापुढें जर लिखाण झालें तर त्यांत ही अधिक दिसेल अशी माझी कल्पना आहे. मग यांत माझी आत्मवंचना होत असल्यास न कळे.

REFBK-0006381

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.